


# महाभारत

## खंड २७ : द्रोणपर्व २

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड सत्ताविसावा

## द्रोण पर्व भाग दुसरा

## अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० एप्रिल २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सत्ताविसावा खंड, द्रोण पर्व भाग दुसरा, आपण आता वाचणार अहात, प्रतिज्ञा पर्व, जयद्रथ वध पर्व, घटोत्कच वध पर्व, द्रोण वध पर्व, नारायण अस्त्र प्रयोग पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच

करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381 2350.html

## - द्रोणपर्व भाग दुसरा –

## प्रतिज्ञा पर्व (सुरू)

### भाग एकावन्नावा

स्थानू बोलतात, अहो देव, आपण हे विश्व उत्पन्न करण्यासाठी पुष्कळ मेहनत केली आहे. विविध प्रकारचे व प्रजातीचे प्राणी आपण उत्पन्न केले व त्यांना वाढवले आहेत. ते सगळे आपल्या क्रोधाने उत्पन्न केलेल्या अग्नीने भस्म केले. ते पाहून मला आपल्या बद्दल अनुकंपा झाली आहे. आपण शांत व्हा.

ब्रह्म बोलतात, मला माझे उत्पन्न केलेले विश्व अशारितीने नष्ट व्हावे हे मान्य नाही.

स्थानू बोलतात, तुम्ही फार काळजीपूर्वकपणे ते उत्पन्न केले आहेत हे खरे आहे, ते प्राणी तुमच्याच अग्नीमुळे नष्ट होत आहेत. त्याचेच मला वाईट वाटते आहे.

ब्रह्म बोलतात, मला सगळ्यांचे भलं व्हावे असें वाटते. त्यामुळें मला राग आला होता. पृथ्वी माता मला नेहमी सांगते कीं, तिला तो प्राण्यांचा भार सहन होत नाही. ती सांगते कीं, मी ते प्राणी नष्ट केले पाहिजेत. परंतु, मला ते कसे करावयाचे ते समजत नाही. त्यामुळें मला माझाच राग आला होता.

रुद्र बोलतात, "अरे ब्रह्मा शांत हो. तू क्रोधाला उत्तेजन देऊ नकोस. त्याना अशाप्रकारे नष्ट करू नकोस. कोणताही चर अथवा अचर प्राणी अशा प्रकारे मरता कामा नये. हे तीन पदरी (भूत, वर्तमान आणि भविष्य) विश्व तसेंच राहू दे. तुमच्या क्रोधातून अग्नी नांवाचा आणखीन एक प्रकार उत्पन्न झाला आहे. तो अग्नी अजून सुद्धा झाडे व दगड फोडत आहे. सगळ्या प्रकारचे वनस्पती तो जाळत आहे. तो सगळे चराचर जाळत आहे. त्यामुळे त्यांची राख होत आहे. कृपा करून अग्नीला असे मोकळे सोडू नका. असा वर मागत आपल्याकडे आहे. सगळे प्राणी आपले आहेत. आपण आपला क्रोध आवरावा त्या अग्नीला तुमच्यातच नष्ट करा. तुमच्या प्राण्याकडे कृपा दृष्टीने पहा. म्हणजे ते पुन्हा उत्पन्न होतील. त्यांच्यात परत चेतना उत्पन्न होईल. असे कांहीं करा कीं, ते पुन्हा अशारितीने मरणार नाहीत. अहो ब्रह्म आपण मला तुमचे संरक्षक म्हणून नेमले आहे, म्हणून मी असा सल्ला आपल्याला देत आहे". नारद पुढे सांगतात,

महादेवाचे ते ऐकून पवित्र ब्रह्मदेव सगळ्या चराचरांच्या भल्यासाठी स्वताला आवरतात, क्रोध कमी करतात, त्यामुळें सगळीकडे पसरलेला अग्नी एकदम विझतो. त्यानंतर ब्रह्मदेव सगळ्यांच्या कामाची व्यवस्था निश्चित करतात. त्यात निर्मिती व नाश ह्यांचे नियम ठरतात. जसा अग्नी ब्रह्माने बाद केला तशी एक काळी लालसर वर्णाची स्त्री त्याच्यातून उत्पन्न झाली. तिचे डोळे, जिभ आणि मुख रक्तवर्णी होते. तिच्या कानात दोन चमकणारी कर्णफुलं होती. त्याशिवाय इतर प्रकारचे विविध असे दागिने ती नेसलेली होती. ती ब्रह्माच्या अंगातून अशाप्रकारे उत्पन्न झाल्यानंतर त्यांच्या कडे स्मित करत दक्षिण दिशेकडे निघून जाते. ब्रह्मदेव तिला मृत्यू असें नांव देतात. ते तिला बोलतात, तू हे माझे चराचर मारून टाक, तू त्या अग्नीतून उत्पन्न झाली आहेस, तुझे काम हे चराचर मारावयाचे आहे. सगळ्या प्रकारचे प्राणी, शहाणे आणि मूर्ख कसेही असले तरी त्यांना तू मारशिल अशी माझी तुला आज्ञा आहे. तसे केलेस तर तुझा फायदा होईल. ती कमळासारखी दिसणारी स्त्री म्हणजे मृत्यू ती आज्ञा ऐकल्यावर थोडावेळ विचार करते व मग एकदम गळा काढून रडू लागते. ब्रह्मदेव तिचे अश्रू त्यांच्या दोनही हातात घेतात. ते तसे करतात सगळ्या चराचरांच्या हितासाठी. त्यानंतर ते तिला विनंती करतात,
प्रतिज्ञा पर्व भाग एकावन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग बावन्नावा

नारद पुढे सांगतात, ती हताश झालेली स्त्री तिचे दोन हात जोडून त्यांना विनंती करते व बोलते, "अहो आपण मला स्त्री रुपात केले आहे व असें क्रूर कार्य करावयाला सांगता हे चांगले आहे कां? कोणालाही मारणे हे वाईट कार्य आहे. ते मला चांगले वाटत नाही. माझ्यावर कृपा करा, आप्त नेहमीच सगळ्यांना प्रिय असतात. त्यांना मी मारत गेले तर त्यांचे आप्त मला दोष देतील, त्यामुळे माझे अहित होणार नाही कां? मृताच्या प्रिय आप्तांचे अश्रू मला भिववत आहेत. माझ्यावर कृपा करा व मला त्यांच्या शापांपासून मुक्त करा. मला यमाच्या घरी जावयाला सांगू नका. माझ्यावर कृपा करा. मला त्यासाठी आपण वैराग्यपूर्ण तपस्या करण्याची परवानगी द्यावी. मला असा वर द्या कीं, मी धनुकांच्या आश्रमात त्यासाठी जाईन. जे तुमच्या ध्यानात सदैव बसलेले असतात. तेथे जाऊन मी एक अतिकठोर तप करणार आहे परंतु, मला ते मारण्याचे काम करता येणार नाही अहो ब्रह्मा, माझ्यावर कृपा करा. मला त्या लोकांचे अश्रू पहाणे जमणार नाही. ते एक चांगुलपणाला न शोभणारे कार्य आहे असें मी समजते".

ते तिचे विनवणी करणारे बोलणे ऐकल्यावर ब्रह्मदेव तिला बोलतात, "तुझा जन्म इतरांना मारण्यासाठी मी केला आहे. जा आणि त्या जीवांचा नाश करण्याचे काम सुरूवात कर, उगाच रडत बसू नकोस. तुला त्यासाठी कोणीही दोष देणार नाही".

नारद पुढे सांगतात, ते त्यांचे दरडावणीचे बोलणे ऐकल्यावर ती बया घाबरलेली दिसते. ब्रह्माकडे पहात ती तशीच उभी रहाते. प्राणिमात्रांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने ती मारण्याचे काम करत नाही. ब्रह्मदेवसुद्धा तिला कांहीं बोलत नाहीत. लवकरच त्यांचे शंका समाधान होते व त्यांच्या कृपेने सगळे प्राणिमात्र अकाली मरावयाचे थांबते. ब्रह्माचा राग आता पूर्णपणे शमला होता. त्यानंतर ती मृत्यू देवता धनुकाच्या आश्रमाकडे तपस्या करण्यासाठी गेली. तेथे ती फार मोठे तपोश्चरण आरंभते. तेथे ती एका पायावर साठ अब्ज वर्षे उभी राहून तप करते. ते ती प्राण्यांच्या भल्यासाठी करत असते. त्या काळात ती सर्व प्रकारच्या लोभ व मोह वाटेल अशा गोष्टींचा त्याग करून रहात होती.

त्यानंतर ती पुन्हा एका पायावर उभी राहून दोनशे अब्ज वर्षे तपस्या करते. त्यानंतर ती एक लक्ष वर्षे जगभर फिरत राहून सगळ्या जीवाना तपासत असते, त्यानंतर ती नंद नावाच्या पवित्र जल असलेल्या तलावात आठ हजार वर्षे काढते. तिचे जीवन पूर्णतया व्रतस्थ होते. त्यानंतर ती पूर्णपणे शुद्ध झाली. त्यानंतर ती कौशिकी नावांच्या तीर्थक्षेत्री गेली. तेथे ती केवळ पाणी व हवा पिऊन रहात होती. त्यानंतर ती पंचगंगा तीर्थी गेली, त्यानंतर वेतसाला गेली, त्या विविध ठिकाणी ती निरनिराळ्या प्रकारचे तप करत होती. त्यामुळे तिचे शरीरसुद्धा मुक्त झाले होते. तेथून ती गंगेकडे गेली. तेथून ती मेरू पर्वतावर गेली. तेथे ती समाधी अवस्थेत रहाते जणू मृत झाली आहे. त्यानंतर ती हिमालयात जाते, जेथे देवांनी अतिप्राचीन काळी यज्ञ केले होते. त्या ठिकाणी ती ब्रह्माची सुलक्षणी कन्या तिच्या आंगठ्यावर एक अब्ज वर्षे उभी राहून तपस्या करते. त्यानंतर ती पुष्कर तीर्थी जाते. त्यानंतर नैमिषात जाते. त्या नंतर मलयात जाते, त्या प्रत्येक जागी ती तिच्या प्रवृत्तीनुसार तपस्या करत होती. त्या सर्व काळात तिचे ध्यान फक्त आणि फक्त ब्रह्मदेवावरच होते. तेवढे केल्यावर ब्रह्मदेव तिच्यावर प्रसन्न होतात. ते प्रेमांने बोलतात तिला, "माझ्या प्रिय मुली, तू इतके कठोर तप कां केलेस"? ते ऐकल्यावर मृत्यू देवता बोलते, "सगळे प्राणी सुखात रहावे, ते एकमेकांना दुःख देणार नाहीत, असें झाल्याने मी त्यांना मारू शकणार नाही. माझी इच्छा आहे कीं हासुद्धा तुम्ही मला वर द्यावा कारण मी कोणाला मारण्याचे पाप करू शकत नाही. त्यासाठी मी अशी घोर तपस्या केली आहे. कोणी मला घाबरू नये असे मला वाटते. मी एक स्त्री आहे, **नेहमी कांहीं दोष नसतांना जशा इतर स्त्रीया असतात तशी मी सुद्धा सदैव त्रासात रहात असते.** माझ्यावर कृपा करा व मला आपले संरक्षण द्या. त्यानंतर ब्रह्माने तिला विश्वाच्या तीन पदरांची माहीती सांगितली, भूत, वर्तमान व भविष्य असे ते असतात. तू कधी पाप करणार नाहीस, तरी निरिच्छपणे तू त्या प्राण्यांची हत्त्या करशिल त्यामुळे नवीन प्राणी जन्मू शकतील. जन्म मरण ही प्रक्रीया अव्याहतपणे चालण्यासाठी जन्माप्रमाणे त्या सगळ्या जीवांचा नाश होणे तितकेंच आवश्यक असते कारण वस्तुमात्रांनी बनलेला देह नश्वर असतो परंतु, ते निष्पापपणे झाले पाहिजे. ज्या मारण्याला क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे दोष कारणीभूत

नाहीत त्या मारण्याला निष्पाप हत्त्या समजले जाते तशी हत्त्या तू एक कर्तव्य (धर्म) म्हणून करणार आहेस. माझे वचन कधी व्यर्थ जात नाही. म्हणून तू आता त्या सगळ्या चराचरांना योग्य वेळी मृत्यू देण्याचे काम करशिल. अशाप्रकारे निष्पाप हत्त्या केल्याने तू निसर्गाला म्हणजे मला जन्म मरणाच्या प्रक्रियेत मदत करत असशिल, त्यामुळे त्या मारण्याने तुला पुण्य प्राप्त होणार आहे. त्या कामात मी व सगळे देव तुला मदत करतील. त्यामुळे तुला दिव्यगती प्राप्त होईल. तो लोकपाल यमदेव व विविध व्याधी देवता, तुला त्या कामात मदत करतील. नारद पुढे त्या राजाला सांगतात, "अरे राजा, ती मृत्यू देवता दोनही हात जोडून बोलते, "अहो पितामह, जर माझ्याशिवाय ते होणार नसेल तर ते काम मी आपली आज्ञा समजून एक धर्म म्हणून प्रामाणिकपणे करत राहीन. जे लोभ, मोह, क्रोध, मद व मत्सर ह्या दोषांत गुंतून जातात त्यांचा नाश मी निश्चितपणे करणार आहे. ते दोष त्यांचा नाश यथावकाश करतील". ते ऐकल्यावर ब्रह्मदेव बोलतात, "तथास्तु, तू जे बोलतेस तेंच होईल. तुझे अश्रू जे माझ्या ओंजळीत आहेत त्यांपासून रोग निर्माण होतील. ते माणसाला मारण्याचे काम करतील. त्यांच्यामुळे ते मेले तर तुला पाप लागणार नाही. म्हणून तू चिंता करू नकोस. तुझ्या उत्तम गुणांच्या मदतीने तू प्राण्यांना ते सगळे करावयाला लावशिल ज्यामुळें ते अखेरीस मरतील. जे लोक त्या सहा दोषात गुंततात (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) ते त्यामुळें मरण्यास प्रवृत्त होतील. तुला कांही करावे लागणार नाही. तुझ्या पुण्याईमुळे ते त्यांच्या पापकर्मात अडकतील व त्याचा परिणाम स्वरुप ते यथावकाश मरतील".

नारद पुढे सांगतात, "त्या मुलीला असे समजते कीं, ब्रह्मदेव तिला मृत्यूदेवी असें बोलतात, ते तिला आवडत नाही परंतु, आता ती त्याच्या आज्ञेत असते. ते काम तिला करावेच लागणार असते. लोकांचे पाप त्यात तिला मदत करणार असते. सगळे जसे आपसुक होत जाणार असते, तिला असे कांहीं विशेष करावे लागणार नसते. "जीवो जीवस्य जीवनं", हा नियम त्यापुढे रुढ झाला. कोणी नाही तर कोणी रोगजंतू प्राण्यांना मारून टाकणार असणार. त्यामुळे एक प्राणी अथवा वनस्पती दुसर्याचे खाद्य झाले. ते पशु खाण्यासाठी दुसरा प्राणी अथवा वनस्पती मारून खाऊ लागले. जन्म

मरणाची प्रक्रीया त्यामुळे सुलभ झाली. उगाच दुःख करत बसू नकोस कारण जन्म व्हावयाचे असतील तर मृत्यू होणे क्रमप्राप्त आहे हे लक्षात ठेव. मेलेल्या आत्म्याची संवेदना (लिंगदेह) त्याच्या बरोबर जाते व शरीर तेथेच रहाते. त्या देहाची विल्हेवाट वस्तुच्या नियमानुसार होत असते, कालांतराने जो आत्मा त्या सगळ्या संवेदना घेऊन परत येतो पुढच्या प्रवासासाठी. असे होत असणार आहे निरंतनपणे. जे त्या सहा दोषांत गुंततात त्या सगळ्यांना हा नियम लागू होतो. मग तो माणूस असेल अथवा देव, असुर, राक्षस, दैत्य अथवा दानव असेल. कोणाचीही त्यातून सुटका नसते. म्हणून अरे राजा, तुझ्या मुलाच्या मृत्यूमुळें तू असा शोक करत बसू नकोस. त्यांने कांहीं साध्य होणार नाही. तुझा मुलगा स्वर्गात मजेत आहे मग तू कां येथे चिंता करत आहेस"?

सगळ्यांना मरावे लागते जे जन्मले ते मरणार हा नियम आहे सृष्टीचा. तुला दुःख होते ते त्याचे तुला पुन्हा त्या अवतारात दर्शन होणार नाही ह्याचे असेल तर ते समजण्या सारखे आहे. परंतु ज्ञानी लोक म्हणून मरणाचे दुःख व जन्मणार्याचे सुख असे दोनही मानत नाहीत. कोणाचे तरी ते सहा दोष कोणाला तरी अशा युद्धात मारत असतात. म्हणून असें दुःख करण बंद कर. नारद राजा अकंपनाला सांगतात.

व्यास पुढे युधिष्ठीराला बोलतात, नारदाचे ते ऐकून राजा अकंपन नारदाला सांगतो कीं, त्याचे दुःख नाहीसे झाले आहे. जे अटळ आहे ते होणारच त्यावर काळजी करणे योग्य नसते हे तो समजतो. ते झाल्यावर नारद आपल्या नंदनवनी जातात. नारद व अकंपनातील हा संवाद जे ऐकतील त्यांचा सगळी दुःख जी मृत्यूच्या कारणाने उत्पन्न होतात ती नाहीशी होतात. ते ऐकल्याने तुमचे आयुष्यमान वाढते असें व्यासमुनी युधिष्ठीराला सांगतात. एक क्षत्रिय त्याचे कर्तव्य करत असतांना वीरगतीला गेला त्याचे दुःख करावयाचे नसते असें सांगतात. परंतु, अभिमन्यूचा मृत्यू कपटाने अन्यायांने व अधर्मयुद्धाने झाला त्याचा राग मात्र रहाणार होता. तो राग लक्षात घेऊन तुम्ही सगळे पांडव पुढच्या लढाईसाठी सज्ज व्हा असा आदेश व्यास देतात.

प्रतिज्ञा पर्व भाग बावन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग त्रेपन्नावा

संजय पुढे सांगत असतो, मृत्यूचे कारण समजल्यावर व त्या देवतेचे वागणे लक्षात आल्यावर युधिष्ठीर व्यासांना बोलतो, "अनेक राजे त्यांच्या देशात चांगुलपणाने राज्य करत असतात, तसेंच ते राजर्षी आहेत, कांहीं ब्राह्मण असतात, ते निष्पाप असतात, त्यांचे मृत्यूबद्दलचे विचार मला ऐकावेसे वाटते तरी ते मला सांगा. ते कोणत्या प्रकारचे यज्ञ करत असतं, त्या राजर्षींची नांवे काय होती? मला सगळे ऐकावयाचे आहे". व्यास बोलतात, "एक राजा होऊन गेला त्याचे नांव होते स्वैत्य. त्याला एक पुत्र होता, त्याचे नांव होते श्रींजय. ऋषी नारद व ऋषी पर्वत त्या राजाचे स्नेही होते. एके दिवशी ते दोघे ऋषी त्याला भेटण्यास जातात. राजा त्यांचे यथोचित स्वागत करतो. ते त्याचा पाहुणचार घेतात व तेथेंच त्याच्या सह राहू लागतात. त्याचा मुलगा त्या ऋषींची पुजा करतो त्यामुळे ते दोघे त्याच्यावर प्रसन्न होतात. एकदा श्रींजय त्या दोघा ऋषींबरोबर बसला असतांना त्याची मुलगी त्यांच्याकडे आली. ती आल्याने श्रींजयाला आनंद होतो. तिचे वागणे फारच चांगले होते. ऋषी पर्वती श्रींजयाला विचारतो कीं, "ही कन्या कोण आहे. काय ती सूर्याची कां अग्नीची कन्या आहे"? ऋषी विचारतात. कां, "श्री, ह्री, धृती, पुश्ती, सिद्धी कां सोम कोणाची आहे"? ते ऐकल्यावर श्रींजय त्यांना तिचा परिचय करून देतो कीं, ती त्याची कन्या आहे. तिला आपले आशिर्वाद द्या. तुला जर तुझे भले व्हावे असे वाटत असेल तर मला ती तुझी कन्या दान कर. ते ऐकून आनंदात तो त्यांना बोलतो कीं, मी तुम्हाला माझी कन्या दिली. ते ऐकून ऋषी पर्वती नारदाला बोलतात कीं, त्या मुलीची मी चौकशी केली प्रथम म्हणून ती माझी व्हावयाला पाहिजे. परंतु, ते नियम तू मोडला आहेस म्हणून तू आता तुझ्या इच्छेने स्वर्गात जाऊ शकणार नाहीस. त्यावर नारद त्याला बोलतात, पतीचे मन, देणार्याची इच्छा, दोघांचे त्याबद्दलचे आश्वासन, प्रत्यक्ष दान विधी, पतीने पत्नीचा हात धरणे, ही लग्न झाल्याची लक्षणं समजली जातात. तेच नाही तर त्या उभतांनी अग्नी समक्ष सात पावले टाकणे हे जास्त महत्वाचे असते. ते

सगळे झाले तरच तुझा विवाह त्या कन्येशी झाला असे मानावे लागेल. म्हणून मी तुला शाप देतो कीं, तू सुद्धा माझ्याशिवाय स्वर्गात जाऊ शकणार नाहीस. ते झाल्यानंतर ते दोघे ऋषी कांहीं काळ तेथे रहातात. मधल्या काळात श्रींजयाला वाटते कीं, त्याला पुत्ररत्न व्हावे. म्हणून तो पूर्ण शुद्ध मनाने त्या दोघा ऋषींची पुजा सेवा करू लागतो. कांहीं काळ ते झाल्यावर ते वेदाचा अभ्यास असलेले ज्ञानी त्याच्यावर प्रसन्न होतात. ते त्याला पुत्र होण्याचा वर देणार असतात. नारद तथास्तु असे म्हणतात. त्यानंतर नारद त्याला बोलतात, तुला कसा मुलगा पाहिजे ते सांग. राजा बोलतो कीं, त्याला असा पुत्र पाहिचे जो सगळ्या चांगल्या गुणांने परिपूर्ण आहे. शत्रूंचा नाश करणारा आहे, पुढे तो सांगतो कीं, त्या मुलाची लघवी, मळ, लाळ असे सगळे सोन्याचे असले पाहिजे. यथावकाश त्याला एक पुत्र होतो त्याचे नांव आहे सुवर्णनाष्थीवीन. त्याच्या विलक्षण गुणामुळें त्या राजाची संपत्ती झपाट्याने वाढू लागली. श्रींजय त्याच्या सगळ्या गोष्टी सोन्याच्या घडवू लागला. त्या राज्यातील ब्राह्मणांची घरं सोन्याने भरून गेली. एकदा त्याच्या राज्यावर दरोडेखोरांची नजर पडते. त्याना समजते कीं ह्या राज्यातील युवराज सोने हगतो, मुततो त्याच्या अंगात सोने भरलेले आहे, तेव्हां ते समजतात कीं, त्याला कापून सगळे सोने काढून घ्यावे. त्याने दुष्ट उद्देशाने ते दरोडेखोर त्या राजाच्या वाड्यात घुसतात. त्या युवराजाला जबरदस्तीने पळवून ते त्याला जंगलात नेतात. त्याची कत्तल करतात. त्याच्या शरीराचे तुकडे करतात. त्याना त्यात सोने मिळत नाही. तो युवराज मारला गेल्यानंतर त्याच्यातून जे सोने आले होते ते सगळे नाहीसे झाले. त्यानंतर ते दरोडेखोर एकमेकांना मारून सगळे मरून जातात. ते सगळे नरकात गेले. त्याचा मुलगा अशारितीने मारला गेल्यामुळें श्रींजय राजर्षी पुत्र वियोगाने दुःखी होतो. त्यावेळी स्वर्गीय ऋषी नारद त्याला भेटावयाला जातात. युधिष्ठीरा ऐक नारद श्रींजयाला काय बोलले ते, त्यावेळी श्रींजय पुत्र वियोगाने वेडापिसा झाला होता. ते त्याला सांगतात कीं, तुझी इच्छा अपूर्ण राहिल्यामुळे तू आता जीव दिला पाहिजेस. आम्ही ब्रह्माचे लोक तुझ्या घरात रहात असलो तरी. पूर्वी असेंच अविक्षिताचा पुत्रसुद्धा असाच वारला तेव्हासुद्धा आम्ही त्यांच्याकडे रहात होतो. बृहस्पतीला सतावल्यामुळे त्याच्या यज्ञात समवत्त अवतरला होता. त्या राजर्षीला महादेवाने स्वतः एक सोन्याचा हिमालया

एवढा दागिना भेट दिला होता. त्या धनाच्या मदतीने तो राजा मरुत, अनेक यज्ञ करून राहिला होता. त्या यज्ञाच्या पुर्णाहूतीला सगळे देव इंद्रासह आले होते व त्याचे नेतृत्व बृहस्पती करत होते. त्या यज्ञाच्या वेळी असलेले गालिचे व बसण्याचे आसन वगैरे सगळे सुवर्णाचे होते. तेथे आलेले सगळे हवे तेवढे खात होते. कोणाला कांहीं कमी नव्हते. सगळे खाद्य शुद्ध व चविष्ट होते. त्यान यज्ञाचे कठडे सोन्याचे होते. सगळ्या आमंत्रिताना उत्तम वस्त्र भेट दिले जात होते. सगळ्यांना सोन्याचे दागिने घालण्यासाठी दिले जात होते. संतुष्ट ब्राह्मण जे वेदाचे ज्ञानी होते आशिर्वाद देत होते. राजा मरुताच्या यज्ञ प्रसंगी देवच जेवणावळीत वाढप्याचे काम करत होते. विश्वदेव त्या राजाचे कारभारी होते. त्या राजाने स्वर्गातील रहिवाशांना लोण्याचे अर्घ्य दिले होते. त्यामुळे संतुष्ट झालेले देव त्याच्या राज्याचे उत्पन्न पाऊसपाणी नियंत्रित करून कितीतरी पटीने वाढवून देत होते. तो राजा पितर व ऋषी ह्यांचा नेहमी सन्मान करत असें. तो ब्रह्मचर्य (स्त्री बद्दल आत्यंतिक सन्मानाची भावना बाळगणे, हा ब्रह्मचर्य पालनाचा पहिला नियम असतो.) पाळत असें, वेदांचा अभ्यास करत असें, श्राद्ध विधी असे सगळे व्यवस्थितपणे तो करत असें. त्याच्या घरचे सगळे सामान सोन्याचे बनवलेले होते. ती अगणित संपत्ती ब्राह्मणांना दान केली गेली. इंद्र स्वतः त्याचे भले पहात होता. त्याची प्रजा त्याच्यामुळे संपन्न व सुखी होती. नेहमी दयाळूपणे वागणारा तो राजा अखेरीस त्याच्या निजधामाला गेला. मरुताचे वंशज त्याच्या नंतर हजार वर्षे राज्य करतात. जेव्हां तो मरुत श्रींजया तुझ्यापेक्षा चार बाबतीत श्रेष्ठ होता. त्या अशा, वैराग्यपूर्ण तपस्या, सत्य निष्ठा, कृपाळूपणा, स्वातंत्र्य आहेत. ते तुझ्या मुलापेक्षासुद्धा जास्त श्रेष्ठ होता तरी तो मेला. म्हणून कोणाच्या जाण्याने दुःख करणे इष्ट नसते. तुझ्या मुलांने कधी दान केले नाही कीं, कधी यज्ञ केले नाहीत.

प्रतिज्ञा पर्व भाग त्रेपन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग च्यौपन्नावा

नारद पुढे सांगतात, राजा सुहोत्र अरे श्रींजया, असाच मृत्यूच्या ताब्यात गेला. तो त्याच्या काळातील फार मोठा अजिंक्य योद्धा होता. देव त्याला भेटण्यास येत असतं. तो सद्गुणी राजकर्ता होता. आपल्या ऋग्द्वीजांच्या व पुरोहितांच्या सल्ल्याने त्याचे काम करत असें. त्यांचे ऐकत असे. यज्ञ करत असे व शत्रूंचा बिमोड करत असे जसे एका चांगल्या राजाने केले पाहिजे. राजा सुहोत्र श्रीमंत होण्याचे ठरवतो. त्यासाठी तो शास्त्रात दिलेले सगळे करतो. तो त्याच्या प्रजेचे कल्याण करत असतो. म्लेच्छ चोरांपासून तो प्रजेचे संरक्षण करतो. पर्जन्य देवता पावसाच्या रुपाने सोने त्याच्या शेतात टाकत होती. म्हणून त्या काळात असे म्हणतात कीं, नद्यांतून सोने वहात होते त्याच्या राज्यात. ते सगळ्यांना घेण्याची मुभा होती. त्याच्या राज्यातील नद्यातून खाण्याचे मांसे विपुल वाढत होते. कशाला कांहीं कमी नव्हते. त्याच्या राज्यातील तलावांतून जे कांहीं मैल लांब असतं, विविध प्रकारचे मांसे वाढत होते. तो राजा कुरुजंगलात एक यज्ञ करतो. ब्रह्मणांना दानं करत असतो. अनेक अश्वयज्ञ करतो. राजसूय यज्ञसुद्धा करत असतो. त्याशिवाय अनेक क्षत्रियांचे यज्ञ तो करत असतो. एवढे करूनही अखेरीस त्याचा अंत होतोच. म्हणून श्रींजया मृत्यूने असा हवालदील होऊ नकोस. तो सुहोत्र तुझ्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ होता. तो तुझ्या मुलापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ होता. तुझ्या मुलांने स्वैत्या कधी यज्ञ केले नाहीत कीं दान केली नाहीत.

प्रतिज्ञा पर्व भाग च्यौपन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग पंचावन्नावा

नारद पुढे सांगतात, आणखीन एक कथा सांगतो, राजा पौरव मोठा पराक्रमी असांच एके दिवशी मरतो. त्याने हजारो अश्वयज्ञ केले होते. तो स्वतः एक राजर्षी झाला होता. त्याच्या राज्यात असंख्य ब्राह्मण रहात होते व ते निरनिराळ्या देशांतून आले होते. त्या ब्राह्मणांना तो पौरव राजा अनेक भेटी देत असें. त्या ब्राह्मणांच्या मनोरंजनासाठी तो खास कार्यक्रम ठेवत असें. त्याच नृत्य गायन होत असें. प्रत्येक यज्ञात तो हजारो हत्ती दान करत असे ज्यांच्यावर सोन्याची शाल घातलेली असे. तो प्रत्येक यज्ञात हजारो सुंदर दास्या ज्या दागिन्याने मढलेल्या असतं ब्राह्मणांना दान करत असें. असंख्य गोधन दान करत असें. त्यांच्या पायाला सोन्याचांदीचे नाल लावलेले असतं.

स्त्रीपुरूष दास, उंट, खेचरं, शेळ्या आणि रत्न तो देत असें. तो सगळे यज्ञ शास्त्राप्रमाणे करत असें. त्याच्या उच्चश्रेणीनुसार त्याचे सगळे कार्य होत असे. त्यामुळें त्याला जे पाहिजे ते मिळत असें. असा राजा सुद्धा मृत्यूच्या तावडीतून सुटला नाही मग तुझ्या मुलांची काय कथा. तो तुझ्या पेक्षा कितीतरीपट श्रेष्ठ होता आणि तुझ्या मुलापेक्षा त्याहूनही जास्त मोठा होता तरी तो मेला जेव्हां त्याची वेळ आली. ती नियति आहे. अरे स्वैत्या तू ज्या मुलासाठी शोक करत आहेस त्याने कधी यज्ञ केलेला नव्हता. मग त्याचे दुःख कशाला करतोस.

प्रतिज्ञा पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग छप्पन्नावा

नारद पुढे सांगतात, आणखीन एक कथा सांगतो, उशिनर सिवीचा मुलगा, असे सांगतात कीं, मृत्यूच्या आहारी गेला. असें सांगतात कीं, त्या राजाने पृथ्वीला चांमडाच्या पट्ट्याने बांधले होते. तो सगळ्या शत्रूंचा पराभव करणारा होता. त्याच्यापुढे कोणाचे कांहीं चालत नसे. त्याने अनेक यज्ञ केले व मोठी दानं ब्राह्मणांना दिली होती. त्याने अगणित संपत्ती गोळा केली होती. युद्धात त्याने जिंकून सर्व क्षत्रियांच्या कडून कौतुकाची थाप मिळवली होती. त्याने सगळी पृथ्वी त्याच्या नियंत्रणा खाली आणलेली होती. त्याने असंख्य अश्वयज्ञ विनासायास केले होते. तो दानात हजारो कोटी सोन्याची नाणी ब्राह्मणांना देत असे. त्याशिवाय हत्ती घोडे व इतर उपयुक्त प्राणी तो दानांत देत असे. अशाप्रकारे त्याने पुष्कळ पुण्य जमा केले होते. त्याशिवाय तो ब्राह्मणांना जमिनीचे दान करत असें. त्याने किती प्रकारची दानं केली विविध गोष्टींची त्याची मोजदाद नव्हती. त्याची संपत्ती इतकी होती कीं, सगळे सामान सोन्याचे होते. त्याच्याकडे दान घेण्यास येणार्या ब्राह्मणांची संख्या मोजता येणारी नव्हती. जेथे तेथे त्याच्या दानाची वहाव्वा होत होती. त्याच्या राज्यात असलेली समृद्धी तेथे असलेल्या दह्याच्या टाक्या व भाताचे डोंगर सांगत होते. त्यामुळे रुद्र त्याला वर देतो. तो वर देतो कीं, तुझी संपत्ती व भक्ती अशीच वृद्धिंगत हो. तुला स्वर्ग प्राप्त हो. ते असले तरी यथावकाश त्याला मृत्यू उचलतोच. अरे श्रींजया, तो तुमच्यापेक्षा किती तरी उच्च होता तरी त्याला मृत्यूला सामोरी जावे लागतेच. म्हणून अरे स्वैत्या तुझ्या मुलाने कांही यज्ञ कले नाहीत वा दानं केली नाहीत तरी त्यासाठी तू कशाला दुःख करत आहेस.

प्रतिज्ञा पर्व भाग छप्पन्नावा संपला.

## प्रतिज्ञा पर्व

## भाग सत्तावन्नावा

नारद पुढे सांगतात, राम दशरथाचा तुला माहीत असेलच. श्रींजया, तो एकदा मेला होता असें सांगतात. त्याची प्रजा त्याच्यावर खूष होती. त्याच्या चांगल्या गुणांची किती तारिफ करावयाची. त्याची ख्याती किती सांगावयाची, असा लक्ष्मणाचा बंधू त्याच्या पित्याच्या आज्ञेने वनात जातो. तेथे चौदा वर्षे सपत्नीक रहातो. तेथे जनस्थानी तो चौदा हजार राक्षस मारतो. राक्षसांचा राजा त्याच्या पत्नीला पळवतो. त्यामुळें रागावलेला राम त्या पौलस्त्याच्या मुलाला, रावणाला, मारतो. ज्याला मारणे कोणाही देवाला शक्य नव्हते. रामाच्या प्रेमळ वागण्यामुळे देवसुद्धा प्रभावित झाले होते. त्याने एका चांगल्या राजा प्रमाणे त्याच्या जनतेची खूप सेवा केली होती. राम त्याच्या काळात अनेक अश्वयज्ञ करतो. त्यांने इंद्रालासुद्धा प्रसन्न केले होते. त्याच्या त्या वागण्यामुळे राम सगळ्या व्याघी रोगांपासून मुक्त झाला होता. तो सूर्यासारखा तेजस्वी दिसत होता. त्याच्या राज्यात देव आणि माणसे एकत्र रहात होती. त्याने जरुथ्य नांवाचा यज्ञ केला होता जो सहसा कोणी करत नाही. त्याच्या राज्यातील प्राण्यांचे चार श्वास (प्राण, अपान, समान, व्यान, उदान असें पंचप्राण) त्यांचे कामं व्यवस्थितपणे करत होते. त्या राज्यावर कधींच संकटं आली नाहीत. कोणीही अकाली मृत झाले नाही. त्याच्या राज्यात रोग पसरवणारे सुक्ष्मजीव वाढत नव्हते. हिंस्त्रश्वापद नव्हते, जहरी साप नव्हते. कोणी खोटे काम करत नव्हते, कोणी अज्ञानी नव्हते, चारही वर्णाचे लोक आपापल्या कामात व्यस्त रहात होते. कोणी आळशी नव्हते. जेव्हां जेव्हां राक्षस हल्ला करत तेव्हां ते राम उलटवत असे व राक्षसांचे निर्दालन करत असे. पितरांचे व देवांचे पिंड त्यांना मिळत होते. लोकांना हजार मुलं होत होती, त्यांची आयुष्य हजार वर्षे होती. ज्येष्ठ कधीच कनिष्ठाची श्राद्ध करत नव्हती. तशी वेळ येत नव्हती. तरूण, सावळा वर्ण, लाल डोळे, चिडलेल्या हत्तीची चाल, अजानुबाहू, रुंद खांदे, शक्तीमान, अशा रामाने अकरा हजार वर्षे राज्य केले. त्याची प्रजा त्याच्या नांवाचा जप करत असें. रामाचे राज्य होते तेव्हा सगळे जग सुंदर होते. असा राम अखेरीस त्याच्या

प्रजेला घेऊन स्वर्गात गेला. त्याच्या नावांची आठ कुळ त्याने पृथ्वीवर सोडली होती. तो गेला जो तुझ्यापेक्षा व तुझ्या मुलापेक्षा कितीतरी उच्च होता तरी कोणी शोक केला नाही.

प्रतित्रा पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

नारद पुढे सांगतात, आणखीन एक कथा सांगतो, भगिरथ राजा ज्याच्या नांवाने गंगा ओळखली जाऊ लागली तो मेला. जो सगळ्या राजांपेक्षा श्रेष्ठ होता. त्याने ब्राह्मणांना हजार कन्या दागिने घालून अशा दान केल्या होत्या. त्या सगळ्या त्यांच्या रथात असतं. त्या प्रत्येक रथाला चार घोडे होते. त्या प्रत्येक रथा मागून शंभर गोधन होते. राजा भगिरथ यज्ञात अगणित दानं करत असें. त्यामुळे त्याच्या यज्ञाला मोठा जनसमुदाय जमा होत असे. त्यांमुळें गंगा नदीला फार त्रास होत होता म्हणून ती त्याला सांगते कीं, ह्याचे कांहीं करावे. ती त्याच्या मांडीवर बसली म्हणून ती त्याची कन्या समजली गेली. ते सगळे गंधर्व ऋषींच्या समक्ष गाणी गाऊन सांगत होते. गंगेने त्या इश्वाकू वंशाच्या राजाला तिचा पिता मानले ज्याची स्तुती सगळे देव इंद्रसुद्धा करत असतात, जो एक महान विरक्त होता, त्याने ब्राह्मणांना जे पाहिजे ते दिले. अखेरीस तो स्वर्गात गेला मरून तरी कोणी त्याचा शोक केला नाही. म्हणून तू अरे स्वैत्या, कां शोक करत आहेस तुझ्या मुलाच्या मरणावर?

प्रतिज्ञा पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग एकोणसाठावा

नारद पुढे सांगतात, दिलीप राजा इलवाचा मुलगा, अरे श्रींजया, असे आम्ही ऐकतो कीं, तो सुद्धा मेला त्या आधी त्याने अनेक ब्राह्मणांना जे वेदाचे ज्ञानी होते, अनेक दानं केली होती. त्याला असंख्य मुल झाली होती, त्यांच्या बरोबर तो हजार यज्ञ करतो. त्याने पृथ्वीचे दान केले होते. त्याने यज्ञाकडे जाणारे रस्ते सोन्याचे केले होते. देव इंद्रसुद्धा त्याच्या कडे मार्गदर्शनासाठी जात होते. दिलीप पाण्यावरून त्याच्या रथाने जात असें तेव्हां त्याच्या रथाची चाकं पाण्यावरून जात असतं. ते पाहून सगळे आश्चर्य करत असतं. त्याच्या घराचे नांव होते खतांग. त्या गृहातून पांच प्रकारचे आवाज सदैव ऐकू येत असतं, वेदांचे ते असतं आणि धनुष्याचे टणत्कार, लोकांचे आनंदाचे बोलणे, व सोन्याचा खणखणाट. तो सुद्धा अखेरीस मेला. तो तुमच्या पेक्षा कितीतरी श्रेष्ठ होता तरी कोणी त्यावर शोक केला नाही. म्हणून अरे स्वैत्या तू तुझ्या मुलासाठी शोक करणे योग्य नाही.

प्रतिज्ञा पर्व भाग एकोणसाठावा संपला.

## प्रतिज्ञा पर्व

## भाग साठावा

नारद पुढे सांगतात, आणखीन एक कथा सांगतो, मंधत्री युवनस्वाचा मुलगा होता. अरे श्रींजया, आम्ही असे ऐकले आहे कीं, त्याचासुद्धा मृत्यू झाला ज्याने देवांना, असुराना व माणसांना हरवले होते. आश्विनीकुमार देवांचे वैद्य त्यांनी त्याला त्याच्या पित्याच्या उदरातून शस्त्र क्रिया करून बाहेर काढले होते. एकदा युवनस्व शिकार करण्यासाठी वनात भटकत असतांना त्याला तहान लागते. त्याचा घोडासुद्धा तहानलेला होता. त्याने लांबून धूर पाहिला व त्या दिशेने तो गेला त्याच्या घोड्याला घेऊन. तेथे गेल्यावर पहातो कीं, तेथे यज्ञ झाला होता त्या होमकुंडातून धूर येत होता . तेथे असलेले वापरलेल्या पाण्याचे व तुपाचे हंडे होते. त्यातून तो पाणी व तुप प्राशन करतो. ते खाल्यामुळें युवनस्वनाला दिवस जातात. ते पाहून तो आश्विनीकुमारांकडे जातो. ते त्या अर्भकाला बाहेर काढतात. ते बाळ दैवी असल्याचे त्यांना समजते. देव ते पहात असतात, ते एकमेकांना बोलतात, "ह्या बाळाला कोण सांभाळणार, दुध कोण देणार"? तेव्हां इंद्र बोलतो, "त्या मुलाला माझा आंगठा चोखू द्या. ते केल्यावर इंद्राच्या आंगठ्यातून त्या बाळाला अमृत प्यावयाला मिळते. त्यानंतर इंद्र सांगतो कीं, त्या बाळाची निगा मी पाहीन. त्या मुलावर कृपा दृष्टी टाकतो. म्हणून देव त्याचे नांव मंधत्री असें ठेवतात. त्यानंतर इंद्राच्या बोटांतून दुधाच्या धारा मंधत्रीच्या तोंडात पडू लागतात. बारा दिवसांत तो मोठा होतो. त्याच्या अंगात प्रचंड ताकद असते. त्यानंतर तो मंधत्री एका दिवसात सगळी पृथ्वी जिंकतो. त्याच्यात सगळे सात्त्विक गुण ओतप्रोत भरलेले होते. तो इंद्राचा भक्त होता. तो त्याच्या बाणांनी प्राचीन राजा जनमेजय व सुधन्व ह्यांचा पराभव करतो. त्याशिवाय जय, नृग व वृहद्रथ वगैरे सुद्धा हरवतो. त्यामुळें सगळ्या क्षितिजात त्याचे राज्य झाले. त्याने असंख्य अश्वयज्ञ केले. ब्राह्मणांना भरपूर दानं केली. त्याने शंभर राजसूय यज्ञ केले. ब्राह्मणांना त्याने एक सोन्याचा मासा ज्याचे नांव असते, रोहीत दान केला. त्याची लांबी दहा योजने व रुंदी एक योजन अशी होती. ब्राह्मणांच्या खाण्यानंतर इतर खात असतं. खाद्यांचे डोंगर होत होते,

विविध प्रकारची पेये त्यांचे तलाव होते त्यातून लोक त्यांच्या पसंतीचे खात पित होते. सगळे वैभव संपन्न होते. दही, मध, तुपाच्या मोठ्या टाक्या भरलेल्या होत्या. कशाचे कमी नव्हते. खाण्यासाठी तो ब्राह्मणांना असंख्य गाई दान करत असे.

देव, असुर, माणसे, यक्ष, गंधर्व, त्यांच्या बरोबर सर्प, पक्षी व ब्राह्मण जे वेदात प्रवीण होते तसेंच ऋषी होते. कोणी अज्ञानी नव्हते. मंधत्रीने पृथ्वी ब्राह्मणांना दान केली त्यानंतर तो सुर्यात विलीन झाला. तो गुणवंतांच्या लोकात गेला. अरे श्रींजया, त्याच्या जाण्यानेसुद्धा कोणी शोक केला नाही. ज्याच्या गुणांची काय तारिफ करावयाची. त्याच्या पुढे तू व तुझा मुलगा कोठेच रहात नाहीत. म्हणून तू शोक करणे चांगले नाही. अरे स्वैत्या, शोक करणे थांबव.

प्रतिज्ञा पर्व भाग साठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग एकसष्ठावा

नारद सांगत असतात, "आणखीन एक कथा सांगतो, ययाति नहुषाचा मुलगा, अरे श्रींजया, एकदा मेला हे आम्हाला समजले. ज्याने शंभर राजसूय यज्ञ केले होते. शंभर अश्वयज्ञ केले होते. शंभर वाजपेय यज्ञ, हजार अतिरत्र, अगणित चतुर्मास्य विविध अग्नीस्तोम असें यज्ञ केले होते. त्यांने पुण्याच्या राशी केल्या होत्या. त्यांने ब्राह्मणांना पृथ्वीवरील सगळी संपत्ती दान केली होती. त्याने ब्राह्मणांचा द्वेष करणार्या म्लेच्छ व इतर लोकांची संपत्ती काढून ती ब्राह्मणांना वाटली होती. जेव्हां देव व असुर लढावयास जात तेव्हां ययाति देवांच्या बाजूने असें, त्याने पृथ्वीचे चार भाग केले होते व ते चार प्रकारच्या लोकांना दिले होते. त्याला त्याच्या पत्नीपासून देवयानी पासून मुलगी उसना, शर्मिष्ठा झाल्या होत्या. त्याने इंद्राप्रमाणे वनात जाऊन तपस्या केली होती. तो वेदाचा चांगला जाणकार होता. माणसाच्या लोभाला मर्यादा नसते सगळ्या पृथ्वीवरील सगळे धान्य, सगळे सोने व सगळ्या बायका जरी त्याला मिळाल्या तरी त्याची वासनांची भूक शमत नसते म्हणून माणसाने समाधानाचा मार्ग अजमावयाचा असतो. त्या तत्त्वाप्रमाणे ययाति समाधानाचा मार्ग अजमावतो. तो स्वताच्या मुलाला गादीवर बसवतो व स्वतः वनात तपस्या करण्यास जातो व तेथे तो एकाद्या बैराग्यासारखा मरतो. त्याच्या मृत्यूवर कोणी शोक करत नाही. अरे श्रींजया, त्याच्यापेक्षा तू कांहीच नाहीस मग तू का मुलाच्या मरणाचा शोक करतोस"? शोक करणे सोडून दे. कारण मृत्यू जन्मा इतकाच महत्वाचा असतो. जर मृत्यू असेल तर जन्म होतो हे तत्त्व समजून घे. अरे स्वैत्या, शोक करत बसू नकोस.

प्रतिज्ञा पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग बासष्ठावा

नारद पुढे सांगतात श्रींजयाला, नभगाचा मुलगा अम्वरिष, अरे श्रींजया, असें आम्ही ऐकतो कीं, तो एकदा त्याची वेळ आली तसा मेला. त्याचे शौर्य असे होते कीं, तो एकटा हजार शत्रूंशी लढत असे. विजयासाठी तो लढत असें आणि त्याला विजय मिळत असें. तो जोराने ओरडत शत्रूंवर चाल करून जात असे. त्याच्या शस्त्राने तो त्याच्या शत्रूचा बिमोड करत असे. ते त्याचे प्रतिस्पर्धी आपले सामान आवरत त्याच्याकडे दयेची भीक मागत असतं. अशारितीने त्यांने सगळी पृथ्वी जिकली होती. शास्त्रानुसार तो यज्ञ करत असें. त्याच्या यज्ञात सगळ्या येणार्यांना भरपेट खाणे तो देत असे. त्याच्या यज्ञात ब्रह्मणांचा चांगल्या प्रकारे सन्मान होत असे. ब्राह्मणांना चांगले दान करत असे. त्यांना मिष्ठान्न तो देत असे त्यामुळे ब्राह्मणांची त्याच्यावर कृपा असे. पुर्या, मोदक, लाडु, श्रीखंड, असें गोडधोड त्याच्या यज्ञात आमंत्रितांना खाण्यासाठी मिळतक असें. जेवणात विविध प्रकारच्या भाज्या सागुत्या, आमट्या, रस्सम, मसाले भात, विविध प्रकारच्या मांसाच्या सागुत्या, साधा भात, सार, चटण्या कोशिंबीरी असें असतं. भातावर साजुक तूप असे. मसाले दुध, गोड दही, लस्सी, खरवस, तसेंच कंदमुळांचे पदार्थ, गोड फळं असतं. ज्यांना मदीरा आवडते त्यांना तीसुद्धा मिळत असें. यज्ञ काळात सगळे आनंदात असत. कोणाला कांहीं कमी नसे. त्यानंतर नाच गाणी, तमाशा असे कार्यक्रम आमंत्रितांच्या करमणूकीसाठी असतं. ते करमणूक करणारे अम्वरिषाची स्तुती करणारी गाणी गात असतं. नशेत गेलेले लोक चालता येत नाही म्हणून जमिनीवर कोसळत व त्यामुळे इतरांची करमणूक होत असे. असे सगळे मजेत होते त्याच्या राज्यात. त्याच्या यज्ञासाठी विविध देशांतून हजारो पुरोहित येत असत. अम्वरिष ब्राह्मणांना राज्यांबरोबर त्याना राजेसुद्धा दान करत असे. ते पाहून ऋषी बोलत कीं असा राजा "न भूतो न भविष्यती", असा आहे.

अरे श्रींजया, तो मेला तेव्हां कोणी शोक केला नाही. अरे स्वैत्या, तू तुझ्या मुलाच्या मरणांवर शोक करू नकोस. प्रतिज्ञा पर्व भाग बासष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व
## भाग त्रेसष्ठावा

नारद पुढे सांगतात, आणखीन एक कथा सांगतो स्वैत्या, ती ऐक, आम्हाला समजले कीं, कोणी कितीही बलाढ्य असो त्याच्यापेक्षा मृत्यू जास्त बलाढ्य असतो. राजा ससाविंदूची कथा ऐक. तो अतिसुंदर होता, त्याच्या सामर्थ्याला तोड नव्हती. त्याने अनेक यज्ञ केले होते. ब्राह्मणांना दानं केली होती. त्याच्या एक लक्ष बायका होत्या व त्या प्रत्येकांपासून त्याला एक हजार पुत्र झाले होते. ते सगळे राजपुत्र मोठे पराक्रमी होते. त्यांनी सगळ्यानी मिळून असंख्य विविध यज्ञ केले होते. तो वेदाचा ज्ञानी होता.
युद्धावर जातांना तो व त्याचे योद्धे सोन्याची चिलखत नेसत असतं, त्याचे सगळे योद्धे मोठे पराक्रमी होते. ससाविंदूने अनेक अश्वयज्ञ केले होते. अश्वयज्ञात त्याने आपली सगळी मुलं ब्राह्मणांना दान केली होती. त्या प्रत्येक मुलाबरोबर शेकडो रथ होते, हत्ती होते, दास्या होत्या सगळे दागिन्याने मढवलेले होते. घोडे, दुभती जनावरं, शेकडो शेळ्या व मेंढ्या होत्या.
त्याच्या यज्ञाच्या प्रसंगी अन्नाचे ढीग असतं. रस्समच्या टाक्या असतं, शेकडो पशु खाण्यासाठी कापले जात होते. त्यांच्या रक्ताच्या नद्या वहात होत्या. त्याचे यज्ञ झाल्यावर उरलेल्या खाद्यांचे डोंगर दिसत होते त्यावर इतर वैश्य माणसे, शुद्र वगैरे आणि पशु ताव मारत होते. त्याची प्रजा संतुष्ट होती. कोणतीही गैर गोष्ट त्याच्या राज्यात होत नसे. अखेरीस असा गुणी राजा ससाविंदू स्वर्गात गेला कारण मृत्यूने त्याला उचलले होते. तरी कोणी त्यावर शोक केला नाही. अरे स्वैत्या, तू कां शोक करत आहेस तुझ्या मुलाच्या मृत्यूबद्दल.
प्रतिज्ञा पर्व भाग त्रेसष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग चौसष्ठावा

नारद पुढे सांगतात, अमरतर्याचा मुलगा, गया तसांच एक महान क्षत्रिय होता तो मेला तेव्हां कोणी शोक केला नाही. कारण मरण हे क्रमप्राप्त आहे असं त्या काळात समजले जात होते. तो शंभर वर्षे यज्ञाच्या होमात तुपाची धार लावून बसला होता. त्यामुळे अग्नीदेव त्याच्यावर प्रसन्न झाले होते. देव त्याला विचारतात कीं, त्याला कोणता वर पाहिजे. तेव्हां तो विनंती करतो कीं, त्याला वेदाचे पूर्ण ज्ञान हवे आहे ज्याच्या मदतीने तो ह्या जगाचे ज्ञान संपादन करू शकेल. त्यासाठी तपस्या व ब्रह्मचर्य पालन करण्याची क्षमता त्याच्यात यावी असा वर तो मांगतो. त्याशिवाय त्याला गडगंज संपत्तीसुद्धा हवी असते. त्यांतून ब्राह्मणांना तो दानं करू शकेल. त्याशिवाय माझ्या पसंतीचे पुत्र माझ्या बायकांपासून व्हावेत असे वर तो मांगतो. माझ्या हातून अन्नदान होत रहावे सत्पात्र लोकांना असा आणखीन एक वर मांगतो. माझे मन नेहमी सन्मार्गी असावे, माझ्या सत्क्रमात कोणतेही विघ्न येता कामा नये. अग्नी त्यास "तथास्तु", असे सांगतो. त्यानंतर अग्नी अदृष्य होतो. ते वर प्राप्त झाल्यानंतर गया सत्मार्गाने राज्यकारभार करतो. त्यानंतर गया अनेक उपयुक्त यज्ञ करत रहातो शंभर वर्षे. त्यातून तो ब्राह्मणांना भरपूर दानं करत असतो. तो चतुर्मास पाळतो. दरवर्षी तो ब्राह्मणांना दहा हजार गाई खाण्यासाठी देत असतो. प्रत्येक शुभ प्रसंगी सुद्धा तो अशाप्रकारे दानं करत असतो. गया सोमा सारखे अथवा अंगिरसासारखे अनेक यज्ञ करत असतो. त्याचे अश्वयज्ञ प्रमुख होते. अशा यज्ञात तो भरपून खर्च करत असें. सत्पात्र लोकांना ब्राह्मणाशिवाय सुद्धा तो दान करत असे. रानावनात रहाणारे, बेटांवर रहाणारे, नद्यात रहाणारे, डोंगरावर रहाणारे, गरीब वस्तीत रहाणारे असे सगळे बायाबापडे त्याच्या कडून दान घेत होते व त्यांचे जीवन समृद्ध होत होते. ते सगळे त्याला दुवा देत व बोलत, गया सारखा याज्ञिक नाही. गयाच्या यज्ञाची वेदी कित्येक योजने लांब रुंद असे. ती सगळी सोन्याची असें. त्यावर रत्न जडवलेली होती. वेदात सांगितलेली प्रत्येक गोष्ट तो करत असें. त्याच्या अशा सर्वांना घेऊन यज्ञ करण्याच्या स्वभावामुळे तो तिनही जगात ख्यातनाम झाला.

शेवटी जसे सगळे मरतात तसा तो मेला. कोणीही शोक केला नाही, म्हणून स्वैत्या, तूसुद्धा तुझ्या मुलासाठी शोक करू नकोस.

प्रतिज्ञा पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग पासष्ठावा

नाकद पुढे सांगतात, तुला रन्तीदेव माहित असेल श्रींजया, तो सुद्धा असाच कालक्रमाने मृत झाला. त्याची ख्याती होती कीं, त्याच्या कडे हजारो स्वयंपाकी होते त्याच्याकडे येणार्या ब्राह्मणांना भोजन देण्यासाठी. चांगल्या प्रकारे मिळवलेली संपत्ती तो नियमितपणे ब्राह्मणांना दान करत असे. त्याचा वेदाचा अभ्यास चांगला होता. धर्मयुद्ध करून तो त्याच्या शत्रूंचा पराभव करत असें. असंख्य प्राणी ज्यांना स्वर्गात जावयाचे आहे ते त्याच्या यज्ञात आहुती होत होते. त्यांची संख्या इतकी होती कीं, त्यांच्या चामड्यातून वहाणारे स्त्राव वाहण्याने एक नदी तयार झाली होती. तिचे नाव चर्मनवती असे होते. तो ब्राह्मणाना सोन्याचे शिक्के भेट देत असे. मी देत आहे, मी देत आहे, असे बोलत तो ते देत असें, एकदा तो एक करोड शिक्के देतो तरी त्याला वाटते कीं, त्याना कमी दिले म्हणून तो आणखीन देत असें. त्याला वाटत असें कीं, जर दान नाही केले ब्राह्मणाना तर दुर्भाग्य पदरी पडेल. शंभर वर्षे तो ब्राह्मणांना सोन्याची वृषभ देत असे. ऋषीना जे लागते ते त्यांना तो देत असे. त्यात रहाण्यासाठी घर, बिछाने, वाहनं, भांडी वगैरी असत. रंतीदेवाची सगळी भांडी सोन्याची होती. जे त्या अतिप्राचीन काळाचे जाणतात ते रंतीदेवाची स्तुती करत असतात इतका तो सगळ्या ब्राह्मणांत व ऋषींत ख्यातनाम होता. कुबेरापेक्षा तो जास्त श्रीमंत होता. लोक गमतीने बोलत रंतीदेवाच्या राज्यात घरं सोन्याची होती. त्याच्य कडे येणार्या पाहुण्यांच्या जेवणासाठी दररोज एकवीस हजार पशु मारले जात होते. ते सगळे पशू स्वर्गात जात असत असें समजले जात असें. **कारण माणसाच्या खाण्यासाठी जे पशू मरतात ते सगळे स्वर्गात जातात व पुढच्या जन्मी मनुष्य रुपात जन्म घेतात असे समजले जात असे.** त्या पशूंना त्रास होणार नाही अशाप्रकारे ते मारले जात होते. तरी ते पुरत नव्हते. रंतीदेवाच्या कडे कांहीं सोने उरले तर ते तो ब्राह्मणांना दान करत असें. त्यानंतर ते ब्राह्मण त्यांच्याकडे असलेले जास्तचे सोने, पैसा अडका समाजातील गरीबांना देत असत. त्याच्या समक्ष देव यज्ञात दिलेले स्वीकारत असतं. पितरांना

सुद्धा भरपूर मिळत असें. कोणी असंतुष्ट नसे. शेवटी तो मरतो जसे नेहमी होते, तो त्याच्या उच्च जागी जातो. अरे स्वैत्या त्यासाठी मी सांगतो कीं, तू मुलाच्या मरणाचा शोक करू नकोस.

प्रतिज्ञा पर्व भाग पासष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग सहासष्ठावा

नारद पुढे सांगतात, तू जाणतोस दुश्यंताचा पुत्र भरत, लहानपणीच सिंहांशी खेळत असें. जेव्हां तो त्याच्या आईबरोबर वनात रहात असें. तो मोठ्या मोठ्या सिंहाना बांधून ठेवत असे. खेळ म्हणून तो ते करत असे. तो हिंस्र वाघांशी सुद्धा खेळत असें, तो हत्तीनासुद्धा पकडत असें, तो बलाढ्य रानरेड्यांना बांधत असें. त्याच्या त्या ताकदीमुळें त्याने अनेक सिंह, रानरेडे, गेंडे पाळले होते. त्याचे ते सामर्थ्य पाहून त्याच्या आजोबांनी त्याला नांव दिले होते सर्वदमन. त्याची आई त्याला प्राण्यांना अशा रितीने त्रास देऊ नये म्हणून सांगत असें. मोठा झाल्यावर तो अनेक अश्वयज्ञ करतो. ते सगळे यमुना व सरस्वती नदीच्या तीरावर केले गेले होते. त्याशिवाय चारशे यज्ञ गंगेच्या तटावर केले होते. त्याच प्रमाणे त्यांने एक हजार अश्वयज्ञ व शंभर राजसूय यज्ञ केले होते. त्यात त्यानी ब्राह्मणांना दानं केली होती. त्याशिवाय अग्नीस्तोम, अतिरत्र, उक्त, विश्वजीत, असें अनेक यज्ञ त्याने केले होते. त्याशिवाय हजारो वाजपेय यज्ञ केले होते. तो शकुंतलेचा पुत्र असे यज्ञ करून व ब्राह्मांना संतुष्ट करून खूप प्रसिद्ध झाला होता. त्याने अगणित सोन्याचा नाणी कण्वमुनीना दान केली होती. जे त्याच्या आईचे मानस पिता होते. देव, ऋषी ब्राह्मणांच्या सह त्याच्या यज्ञांना हजर रहात होते. त्याच्या यज्ञाच्या वेदी मोठ्या असतं व सगळे सोन्याचे असे. त्याला कधी कोणी हरवले नाही. तो नेहमी ब्राह्मणांना मोठी दानं करत असें. त्याशिवाय धान्यं, रत्नं, घोडे, उंट, हत्ती, शेळ्या मेंढ्या असें बरेच कांही देत असे. त्याच प्रमाणे ब्राह्मणांना जमिनी देत असे. किती त्याची गणती नाही. असा भरत राजा तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त महान होता परंतु, त्याच्या मृत्यूने कोणी शोक केला नाही. मग तू तुझ्या मुलासाठी कां शोक करत आहेस. ज्याने कधी दान केले नाही कां यज्ञ केले नाहीत.

प्रतिज्ञा पर्व भाग सहासष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग सदुसष्ठावा

नारद पुढे सांगतात, वेणाचा मुलगा राजा पृथू अरे श्रींजया असाच मेला, त्याची वेळ आली तसा. त्याने केलेल्या राजसूय यज्ञाच्या वेळी मोठे ऋषी आले होते. ते ऋषी त्याला सम्राट म्हणून जाहीर करतात. त्याने सगळी पृथ्वी जिंकली होती. त्यासाठी तो सगळ्या जगात प्रसिद्ध झाला होता. म्हणून त्याला पृथ्वी वरून पृथू असें नांव दिले गेले. तो खरा क्षत्रिय समजला गेला. त्या पाहून त्याची प्रजा बोलत असें, आम्ही त्याच्या राज्यात सुखी आहोत. प्रजेच्या त्या प्रेमामुळे त्याला राजा असा किताब मिळाला होता. त्याच्या काळात शेती न करताच पिकं येत होती. त्याच प्रमाणे जेथे तो स्पर्श करी तेथून दूध निघत असें. त्याच्या राज्यात कमळांतून मध वहात असें. कुस गवताची पाती सोन्याची होती. त्याच्या राज्यातील लोक त्याचे वस्त्रं बनवत असतं. झाडांना येणारी फळ गोड व अमृतासारखी असतं. लोक तेंच खात असतं. त्याच्या राज्यात कोणीही उपाशी नसे. सगळे धष्टपुष्ट होते. त्यांच्या सगळ्या कामना पूर्ण होत असतं. त्याना कशाची भिती वाटत नसे. लोक त्याना हवे तेथे रहात होते. कोणी झाडांवर तर कोणी गुहात असें ते रहात होते. त्याच्या राज्यात नगरं, गांव नव्हती. सगळे मजेत रहात होते. जेव्हां तो समुद्राकडे गेला, समुद्राच्या लाटा घट्ट झाल्या. त्यामुळें ते त्यांवरून चालत जाऊ शके. पृथू जाताना वाटेत डोंगर बाजूला होऊन त्याला जागाकरून देत होते. त्याच्या रथाचा स्तंभ कधी कशावर आदळला नाही कारण त्या गोष्टी आपसुकपणे बाजूला होत असतं. एकदा मोठे वृक्ष, पहाड, देव, असुर, माणसे, साप, सप्तर्षी, अप्सरा, पितर पृथूला भेटावयाला गेले होते. ते त्याला बोलले, "तू आमचा राजा आहेस. आमचा संरक्षक व जनक आहेस. तू आमच्यावर कृपा करावी". ते ऐकल्यावर वेणाचा मुलगा पृथू बोलतो, "तथास्तु",

त्यानंतर तो कांहीं बाण मारतो जसे आधी कधी कोणी मारले नव्हते. नंतर तो पृथ्वीला बोलतो, "पृथ्वी ह्या मंडळींना दूध दे. मी त्यांना धान्य देईन". ते ऐकून पृथ्वी बोलते, "अरे राजन, तू मला तुझी मुलगी समजलीस तरी चालेल ते तुला शोभते".

ते ऐकून पृथू बोलतो, "तथास्तु", त्यानंतर तो महान राजर्षी सगळ्या व्यवस्था करतो, त्यानंतर सगळे पृथ्वीतून दूध घेऊ लागतात. प्रथम उंच झाड दूध काढण्यासाठी येतात. पृथ्वी मोठ्या प्रेमांने त्यांच्यातील कोणी वासरू होते कां, कोणी गवळी होते कां, कोणा भांडे होते कां असें विचारते. साल वृक्ष वासरू बनतो. वड गवळी होतो, तुटलेले कोंब दूध बनतात. औदुबर भांडे बनतो. त्यानंतर पहाड तिचे दूध काढतात. त्यावेळी पूर्वदिशेचे पहाड वासरू बनतात, मेरू गवळी होतो, मौल्यवान रत्न व औषधी वनस्पती दुध बनतात. दगड भांडे बनतात. त्यानंतर देव गवळी बनले, सगळ्या सामर्थ्यवान गोष्टी दूघ बनल्या, असुर दूध काढतात. ते कच्च्या मातीच्या भांड्यात ते घेतले जाते. त्यामध्ये द्विमुर्धन गवळी बनला. विरोचन वासरू बनले व माणसे दूध काढतात. त्यात शेती आली. त्यात मनू वासरू बनला, पृथू स्वतः गवळी बनला. त्यानंतर साप पृथ्वीचे दूध काढतात. त्यांचे दूध जहर असते ते कडु फळात ते ठेवतात. धृतराष्ट्र गवळी बनतो, तक्षक वासरू होतो, त्यानंतर सप्तर्षी जे कांहींही करू शकतात ते दूध काढतात. त्यानंतर ते पृथ्वीतून वेदाच्या रुपात दूध काढतात. त्यानंतर बृहस्पती गवळी बनतो, छंद भांडे बनतात, सोम वासरू बनतो, यक्ष दूध काढतात. त्याना अदृष्य होण्याची सिद्धी मिळते. त्यानंतर वैश्रावण गवळी होतो, बृषध्वज वासरू होते, गंधर्व आणि अप्सरा दूध काढतात. त्या दूधाला सुगंध येत असतो. चित्ररथ वासरू बनतो, विश्वरुची गवळी बनतो, पितर पृथ्वाचे दूध काढतात. त्या दुधाला स्वाहा म्हणतात. ते चांदीच्या पात्रात असते. विवस्वाताचा मुलगा यम वासरू बनतो, अंतक (मृत्यू) गवळी बनतो, त्यावेळी जे प्राणी दूध काढतात त्यात त्यांना सगळे मिळते. त्यानी जी भांडी वापरली व जी वासरं होती ती आजही आहेत. शक्तीमान पृथू विविध यज्ञ करतो. त्याच्या त्या यज्ञांमुळें पृथ्वीवरील सगळ्या प्राणिमात्रांना जे हवे ते मिळत होते. त्याने पृथ्वीवरील सगळ्या चीजांच्या सुवर्ण प्रतिमा तयार केल्या होत्या. त्या त्याने नंतर ब्राह्मणांना अश्वयज्ञात दान केल्या.त्याने सहासष्ठ हत्ती सोन्याचे बनवले व ब्राह्मणांना दान केले. अगणित दान करणारा हा महान राजा नंतर मेला परंतु, कोणी त्यासाठी शोक केला नाही. "अरे श्रींजया, त्याच्या पेक्षा तू व तुझा मुलगा किती लहान असतांना तू कां शोक करत आहेस"? प्रतिज्ञा पर्व भाग सदुसष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग अडुसष्ठावा

नारद पुढे सांगतात, महान बैरागी भार्गव (राम) सुद्धा मेला ज्याची पुजा सगळे करतात. जो जमदाग्नीचा मुलगा होता. जगातून भ्रष्ट क्षत्रियांचा समुळ नाश करणारा व योग साधना सांगणारा ज्याला अतुलनीय अशी समृद्धी प्राप्त झाली होती, ज्याच्या मध्ये कांहीं दोष आढळत नव्हते, त्याच्या पित्याला भ्रष्ट क्षत्रियांना मारले होते. तो कार्तवीर्य क्षत्रियांचा संहार करतो, त्याच्या धनुष्य बाणाने तो चौसष्ट वेळी त्यांचा नाश करतो, त्यात ब्राह्मणांचा द्वेष करणारे दंतकुर देशांचे चौदाहजार क्षत्रिय होते. ते हैहय कुळाचे होते. ते त्याने मारले. कित्येकांना सोट्याने, कित्येकांना तलवारीने कित्येकांना गळफांस लावून असें मारले. मोठे शूरवीर क्षत्रिय त्यांच्या रथ, हत्ती, घोड्यासह त्याने ठार मारले होते. ते त्यांने कुर्हाडीने मारले होते म्हणून तो पुढे त्या परशूच्या नांवाने ओळखला जाऊ लागला. त्याला कोणी उलट उत्तर दिले कां सहन होत नसे. तो काश्मीरी, दर्द, कुंत्तीस , क्षुद्रा, मालव, अंग, वंग, कलिंग, विदेही, ताम्रलिप्तक, रक्षोवाह, वितहोत्री, त्रिगर्त, मर्तीकावस, अशांच्या हजारांना त्याने कुर्हाडीने ठार मारले. तो भार्गव ज्याला त्याच्या शस्त्रावरून परशुराम असे नांव पडले तो प्रांत प्रांत फिरून भ्रष्ट क्षत्रियांचा विनाश करत होता. त्यामुळ रक्ताचे पाट वहात होते व तळी रक्ताच्या पाण्याने भरली होती. त्यांचा रंग लाल झाला होता. अशारितीने त्याने मानव वस्ती असलेले अठरा प्रांत जिंकले. असा तो भृगुचा वंशज त्यानंतर हजारो यज्ञ करतो. त्या यज्ञाच्या निमित्ताने तो ब्राह्मणांना पुष्कळ दानं करतो. त्याच्या यज्ञाची बांधणी सोन्याची होती. त्यात विविध रत्न जडवलेली होती. त्यानंतर ती पृथ्वी जिच्यात सगळे प्राणिमात्र रहात आहेत ती त्यांनी काश्यप ऋषीला दान केली. असा तो जमदाग्नीचा मुलगा त्यांना अनेक विलक्षण गुण असलेले हत्ती देतो. त्याच्या राज्यात कोणी चोर नव्हते. एकवीस वेळा त्याने पृथ्वी भ्रष्ट क्षत्रियांपासून मुक्त केली होती. मरीच म्हणजे काश्यपांनी त्याच्या कडून पृथ्वी दान म्हणून घेतली. त्यावेळी काश्यप रामाला बोलतात, "माझी आज्ञा आहे कीं, तू ह्या पृथ्वीतून निघून जा". ती आज्ञा झाल्यावर

तो आज्ञाधारक महेन्द्र पर्वतावर गेला व तेथेंच राहिला आहे. त्याच्यात अनेक उत्तम गुण होते. तोसुद्धा एके दिवशी मरणार आहे. तो तुझ्या मुलापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. तो मेला तरी त्याच्या मृत्यूवर कोणी रडणार नाही. मग स्वैत्या, तू कां शोक करत आहेस तुझ्या मुलाच्या मरण्यावर, शोक करणे थांबव.

प्रतिज्ञा पर्व भाग अड्डुसष्ठावा संपला.

# प्रतिज्ञा पर्व

## भाग एकोणसत्तरावा

व्यास मुनी बोलतात, त्या सोळा पवित्र राजांच्या मृत्यूच्या कथा ऐकून राजा श्रींजय शांत होतो. तो गप्प बसतो. ते पाहून नारद मुनी त्याला बोलतात, "मी तुला त्या कथा सांगितल्या त्या पाठील उद्देश तुला समजला कां? कां त्या सगळ्या गेल्या जसे उपड्या घड्यावर घातलेले पाणी समजू"? ते ऐकल्यावर उत्तर देतो कीं, आपण ज्ञानी अहात, तुम्ही मला त्या कर्तृत्ववान राजांच्या कथा कां ऐकवल्या ते समजत नाही. कारण माझा मुलगा लहानपणी क्रूरपणे दरोडेखोरांनी मारला आहे. मला त्याचे दुःख आहे की, त्याला कांहीं करण्याची संधी मिळाली नाही. त्याच्यावर अन्याय झाला आहे. म्हणून त्यांची व माझ्या मुलांची व त्यांच्या मृत्यूची व माझ्या मुलाच्या मृत्यूची तुलना आपण कसे करता ते मला समजत नाही. ती दोन पूर्णपणे भिन्न आहेत. जर माझ्या मुलाला कांहीं करण्याची संधी मिळाली असती तर त्या राजांची व माझ्या मुलांची तुलना करणे योग्य होते. माझ्या मुलांचा मृत्यू अन्यायाचा आहे म्हणून मला दुःख होत आहे. नारद ते ऐकून श्रींजयाला बोलतात कीं, "तुला काय वर पाहिजे ते सांग मी तुला तो देणार आहे. मी दिलेला वर कधींच व्यर्थ जात नाही".

श्रींजय त्यावर बोलतो, "मला बरे वाटले कीं आपण मला वर देत अहात". ते ऐकून नारद त्याला स्वताहून वर देतात कीं, त्याचा मुलगा परत देह धारण करून त्याला मिळेल. ते बोलल्या बरोबर त्याचा मुलगा त्याच्या कडे सदेह परत येतो. ते पाहून श्रींजयाचा आनंद गगनात मावत नाही. नारद त्याला सांगतात कीं, त्याने जो वर मागितला होता त्यामुळे ह्या मुलाच्या अंगातून सोने निघत होते. त्या तुझ्या सोन्याच्या लोभामुळे हे कांड घडले म्हणून आता ह्या मुलाच्या मळातून मुतातून व लाळेतून सोने निघणार नाही. जे घडले त्याला तुझा सोन्याचा हव्यास कारणीभूत आहे. पुढे व्यास इतके सांगितल्यावर युधिष्ठीराला सांगतात कीं, तुझा अभिमन्यू श्रींजयाच्या मुला सारखा लहान नव्हता. त्यांने त्याचे कर्तव्य बजावले होते व तेसुद्धा उच्च श्रेणींने म्हणून, त्याच्या जाण्याचे दुःख करणे तुला शोभत नाही. तो क्षत्रियांसारखा मारत मारत मेला

होता. त्या मृत्यूचे क्षत्रिय दुःख करत नाहीत. तो स्वर्गात गेला आहे त्याला आता पुनः पृथ्वीवर येण्याचे कारण नाही. मोठ्या मोठ्या तपस्व्याना जे स्थान मिळते ते अभिमन्यूला मिळाले आहे. त्याला दैवी काया मिळाली आहे व त्यात तो चमकत आहे. अशांसाठी कोणी शोक करत नाही. ते लक्षात घेऊन तू आता शांत हो. जे आज जीवंत आहेत त्यांचा विचार कर. शोक करणे निरर्थक असते, त्याने कांहींच साध्य होत नाही. कदाचित त्यामुळें पाप वाढू शकते, कारण अशा शोकामुळें अध्यात्मिक उर्जेचा नाश होत असतो. जे गेले त्यांचे उरलेले कार्य पूर्ण करण्यावर लक्ष देणे हेंच योग्य असते. म्हणून युद्धासाठी सज्ज हो.

व्यास पुढे सांगतात, किं, युधिष्ठीराला मृत्यूचे मूळ समजले आहे व तिची तपस्या किती मोठी होती तेसुद्धा समजले आहे. तू पाहिलेस कसा श्रींजयाचा मुलगा परत सदेह आला. शांत हो. असे बोलून व्यास अंतर्धान पावले. युधिष्ठीराला मृत्यूचे कारण समजले व त्यात शोक करणे व्यर्थ आहे तेसुद्धा समजले. आता प्रश्न होता जेव्हां धनंजय येईल तेव्हां त्याला काय उत्तर द्यावयाचे.

प्रतिज्ञा पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

## प्रतिज्ञा पर्व

## भाग सत्तरावा

संजय पुढे सांगतो, त्या युद्धाच्या पंधराव्या दिवशी मोठा नरसंहार झाला होता. रात्र होत होती व दोनही बाजूंचे सैनिक आपापल्या कक्षात विश्रांतीसाठी गेले होते.

संसप्तकांचा संहार करून अर्जुन त्याच्या कपीधारी रथाने पांडवांच्या तळावर येतो. अर्जुन कृष्णाला विचारतो, "अरे माधवा, मला समजत नाही कीं, मी एवढे सैनिक मारल्यानंतर आनंद वाटण्या ऐवजी माझ्या डोळ्यातून असे अश्रू कां येत आहेत"? हे अशुभ संदेश आहेत असें मला वाटते. मला बोलतांना थरथरायला का लागते? असं कधी मला आधी झालेले नाही. माझा घसा शुष्क कां झाला आहे? विचित्र प्रकारची भिती मनात वाटत आहे, असे कां होत आहे? आपल्यातील कोणाला कांहीं झाले तर नाहीं ना"?

कृष्ण बोलतो, "तू थकला आहेस, दुसरे कांहीं नाही. तुझ्या कोणाची कांहीं चिंता करण्याचे कारण नाही. उगाच चिंता करू नकोस. थोडेसे कांहीं मामुली वाईट घडले असेल कदाचित त्याचा विचार करू नकोस".

संजय पुढे सांगतो, ते दोन वीर संध्या देवीची प्रार्थना करतात, त्यानंतर त्यांच्या रथावर चढतात. त्या दिवसाच्या लढायांबद्दल बोलत असतात. त्यांना त्या दिवशी जी कमाल केली त्याची चर्चा करत असतात. तसे गप्पा मारत ते त्यांच्या ठिकाणी पोहोचतात. विभत्सूच्या लक्षात येते की, पांडवांच्या तळात दुःखाची छाया पडली असावी असे वातावरण होते. त्याचा गोंधळ उडतो. तो कृष्णाला बोलतो, "अहो जनार्दना, तुला नाही वाटत कीं, आपल्या तळावर विचित्र प्रकारची शांतता आहे? कोणाचा आवाज नाही. तुतार्या ढोलकी वाजत नाहीत. शंखनाद अजिबात होत नाही, सगळे गुपचुप असें का वावरत आहेत? युधिष्ठीराच्या तंबूतून वीणा वाजत नाही असें कसे? आपले योद्धे मला पाहून खाली मान घालून दूर कां जात आहेत? कोणी माझ्याशी कां कांही बोलत नाहीत. संध्याकाळचे अभिनंदन कां कोणी आपल्याला करत नाहीत? कांहींतरी खात्रीने भयंकर घडले असले पाहिजे, एरवी मी आल्यावर माझे स्वागत करण्यासाठी

नकूल, सहदेव, अभिमन्यू नेहमी प्रमाणे कां आले नाहीत? हा काय प्रकार आहे लवकर शोधून काढले पाहिजे. मी आलो कीं, माझ्या पुढे पुढे करणारा माझा व सुभद्रेचा अभि कोठेच कसा दिसत नाही"?

संजय पुढे सांगतो, असे बोलत तो व कृष्ण त्यांच्या तळाच शिरतात. तेथे त्याचे बंधू खाली मान घालून बसलेले तो पहातो. अर्जुन व कृष्ण त्याना पहातात व समजतात कीं, त्यांच्या पैकी कोणी मारलेला नाही. मग कोण? त्याला त्याचा पुत्र तेथे दिसत नाही. एरवी अभिमन्यू त्याच्या कांकांच्या सह नेहमी असतो मग आज काय झाले? अर्जुनाचा चेहरा पडतो. त्याला आठवते त्याचे ओठ कां सुकले होते व कां तो बोलू शकत नव्हता. अभिला कोणी मारले ते समजले पाहिजे. अर्जुन जरा घुश्शातच त्याच्या भावंडांना विचारतो, "तुमचे चेहरे असे कां पडले आहेत? काय घडले आहे कीं, तुम्ही असे सुतक्या सारखे बसला अहात. माझा अभि कोठे आहे? तो मला भेटावयाला पुढे कां होत नाही? मला माहीत आहे कीं, द्रोणांने चक्रव्यूह रचले होते पण पुढे काय झाले ते समजले नाही. मी संसप्तकांच्या मागे गेलो होतो व तेथे संध्याकाळ पर्यंत गुंतलो होतो. तुम्ही सगळे येथे अहात फक्त अभिमन्यू नाही. म्हणजे त्याचे कांहीं बरे वाईट झाले कां? मला माहीत आहे कीं अभिमन्यू ते कसे फोडावयाचे ते जाणत होता. परंतु, त्याला त्यातून बाहेर कसे निघावयाचे ते माहीत नव्हते. तुम्ही त्याला त्या चक्रव्युहात शिरण्याचे काम दिले होते कां? तो त्यात शिरला असेल, जर त्याला तुम्ही ते काम दिले असेल तर, एवढे मी समजू शकतो. तेथे तो कामी आला कां? मला सगळे सांगा. तो आपल्या सगळ्यांचा लाडका होता, सिंहासारखा होता. छोटासा इंद्रच होता. त्याचा वध झाला कां? कोण्या क्षत्रियाने त्याच्या स्वताच्या मृत्यूच्या भयाने आमच्या सगळ्यांच्या लाडक्या अभिला मारले ते सांगा. कुंती मातेचा जीवाचा तुकडा, वृश्नींचा नायक माधवाचा आवडता भाचा त्याला कोणी व कसे मारले ते मला समजले पाहिजे. अरेरे, जर तो मला दिसला नाही तर मी स्वताचे बरेवाईट करून यमाच्या घरी जाण्याची तयारी करणार आहे". असें दुःखावेगांने धनंजय बोलत असतो. त्याच्या डोळ्याच्या कडा लाल झाल्या होत्या. त्याच्या अंगाची हालचाल संतापलेल्या हत्तीसारखी होती. साल वृक्षा सारखा त्याचा अडदांड बांधा रुबाबदार दिसत होता. त्याच्या वागण्यात ज्येष्ठांबद्दल

आदरभाव जाणवत होता. तो पुढे बालतो, जर मला माझा अभि नाही दिसला तर मी यमाकडे जाणार आहे असे खंबीरपणे तो पुन्हा पुनः बोलत होता. तो अतिरथ होता, माझ्या तोडीचा होता. प्रद्युम्न व केशवाचा प्रिय होता. त्याचे सुंदर मुख मला आठवते. त्याचा आवाज किती मधूर होता कीं, कोणी त्याचे ऐकत बसावे. त्याचे शब्द मला ऐकावयाला नाही मिळाले तर मी बेचैन होईन. त्याचे देखणेपण काय वर्णावे. ज्येष्ठांचा आदर करणारा, कनिष्ठांना उत्तेजन देणारा सदासर्वदा न्यायाने वागणारा आमचा तो कुलदिपक कोणी मारला ते मला समजले पाहिजे. मला तो दिसला नाही तर मी मरून जाईन. नेहमी मऊ बिछाईतीवर निजणारा आज त्या रणांगणातील मातीत पडला आहे हे मी कसे सहन करू. त्याचे शरीर बाणांने भरलेले असेल कां? त्याच्या शरीरावर असंख्य जखमा असतील कां? काय झाले, कसे झाले, कोणी त्याचा शेवटचा घात केला मला सगळे समजले पाहिजे. त्याचे सुंदर शरीर कोणी गिधाड नाहीतर कोणी लांडगा आता कुरतडत असेल ह्या कल्पनेने माझा जीव कासाविस होत आहे. त्याला पहाटे उठवण्यासाठी सुमधूर संगीत वाजवले जात असें त्या ठिकाणी आता तो त्या गिधाडांच्या ओरडण्याने गप्प झाला आहे. खर्या क्षत्रियासाठी असा मृत्यू योग्य आहे हे मी जाणतो, तरी एका बापाचे हृदय कांहीं वेगळेच अपेक्षित असते. ज्याचे अंग छत्रीने संरक्षित असे त्याच्या अंगावर आता रणभूमीची माती पसरलेली आहे. जो क्षत्रिय दुसर्याला मारतो त्याला सुद्धा तसेंच मरावे लागते हे मी जाणतो तरी एक बाप तसा विचार करत नाही हेंच खरे. तुझ्याकडे पहात रहाणार्या तुझ्या बापाला ह्यापुढे तू कधीच दिसणार नाहीस ह्या कल्पनेने माझा जीव बेचैन झाला आहे. ते यमाचे घर आज तुझ्या तेथे जाण्याने जास्त सुशोभित झाले असेल. यम, वरुण, शतकृतू, कुबेर तुझे तेथे स्वागत करत असतील". अशाप्रकारे विविध विचाराने व्यग्र झालेला अर्जुन शोक करत असतो. त्यानंतर थोडा ध्यानात आल्यासारखे करत तो युधिष्ठीराला विचारतो, "अहो कुरु राजे, अभिमन्यू स्वर्गात गेला आहे. तेथे त्याच्या स्वागताची जंगी तयारी होत असेल. त्याने मोठा नरसंहार केला कां"? तो एका हाताने त्या बलाढ्य योद्धध्यांशी लढला असेल. लढत असतांना त्याला माझी मदत हवी वाटली असेल पण मी नव्हतो त्याला मदत करण्यासाठी ह्याचे मला दुःख होत आहे. तो लढत असतांना त्या क्रूर शत्रूंनी

त्याला मातीत पाडले कां? त्या छोट्या मुलांवर ते मोठे योद्धे शस्त्र उगारू कसे शकले? त्या शत्रूच्या योद्ध्याना माहित नव्हते कां कीं, हा माझा मुलगा व कृष्णाचा भाचा आहे व त्याच्या मृत्यूचे परिणाम काय होणार आहेत"? तेथे तो आता मातीत पडला आहे त्या इतरांबरोबर ज्याना त्याने मारले असेल. आता मारणारा व मेलेला एकत्र पडले आहेत, काय नियतीचा खेळ आहे पहा. जर त्याच्या आईला त्याच्या मृत्यूची वार्ता समजली तर ती जीवंत रहाणार नाही ह्याची मला भिती वाटते. मी तिला कसे तोंड दाखवू? द्रौपदी काय बोलेल? मी त्याच्या पत्नीला काय सांगणार, कीं मी त्याला वाचवण्यासाठी तेथे नव्हतो"? त्या कौरवांचे क्रूर हास्य मला जाणवत आहे. ते त्या मृत्यूवर खूष असणार. जे घडत होते ते कृष्णाला कदाचित समजत असेल, युयुत्सू त्या कौरवांना विचारत असेल, "अरे मर्दानो, त्या लहान मुलाला मारून तुम्हाला कसला आनंद होत आहे. अरे आता खरा तर तुमचा रडण्याचा काळ सुरू होणार आहे. ह्या कपट कारस्थानाने जे तुम्ही साध्य केले त्याची कटू फळ तुम्हाला भोगावी लागणार आहेत हे केव्हां तुमच्या लक्षात येणार"? धृतराष्ट्राच्या वैश्य पत्नीचा तो मुलगा कौरवांना विचारत होता. ते बोलत असतांना तो त्याच्या हातातील शस्त्र फेकून देतो.

अर्जुन कृष्णाला विचारतो, "अरे माधवा, तू मला ते त्यावेळी कां सांगितले नाहीस, तसें सांगितले असतेस तर मी माझ्या लाडक्याला वाचवू शकलो असतो. मी त्या सगळ्या चक्रव्युहाला आग लावली असती.

संजय पुढे सांगतो, वासुदेव अर्जुनाला शांत करण्यासाठी सांगतो, जो पुत्रवियोगाने अस्वस्थ झाला होता. "कृपया तू शोकसागरात बुडू नकोस. ते ह्या घडीला तुला शोभत नाही. अरे मर्दा, तू स्वतः क्षत्रिय आहेस, हा क्षत्रियांचा जीवन क्रम आहे. त्यावर शोक करावयाचा नसतो. तू प्रथम एक क्षत्रिय आहेस व नंतर एक पिता हे लक्षात ठेवून विचार कर. असा मृत्यू येणे ह्याला मोठे भाग्य लागते. ते अभिमन्यूला लाभले त्याचा आनंद तुला वाटला पाहिजे. अरे खर्या अर्थाने कोणी मरत नाही व कोणी जन्मतसुद्धा नसते हे मी तुला सुरूवातीलाच सांगितले होते ते तू कां विसरतोस. असा मृत्यू प्रत्येक योद्धा मागत असतो. तो तुझ्या मुलाला मिळाला त्याबद्दल तुला समाधान वाटले पाहिजे, म्हणून शोक आवर. युद्धात मरून धारातीर्थी पडणे व त्यानंतर तो देह

गिधाडानी खाणे* हे प्रत्येक क्षत्रियासाठी भूषणावह समजले जाते ती आपली परंपरा आहे. त्यात दुःख कशासाठी? तुला शोक करतांना पाहून त्यांचा धीर जाईल ते योग्य होणार नाही. तू त्यांचे सांत्वन करावयास पाहिजे". अशारितीने कृष्ण अर्जुनाचे सांत्वन करतो. त्यानंतर पार्थ त्याच्या भावांना शोक न करण्याचे आवाहन करतो व त्या अभिमन्यूच्या मृत्यूचा सूड उगवण्याच्या गोष्टी करून त्यांच्यातील क्षत्रिय पुन्हा जागृत करतो. तो सांगतो अभिमन्यूचे उरलेले कार्य आपल्याला करावयाचे आहे असे त्या भावंडाना सांगतो. पुढे तो बोलतो कीं, जर पांडव आणि पांचाल त्याचे संरक्षण करू शकणार नाहीत असें मला समजले असते तर मी संसप्तकांना सोडून येथे आलो असतो. तरी आपण समाधान मानले पाहिजे कीं आपल्या अभिने कौरवांच्या सैन्याचा मोठी हिस्सा नष्ट केला आहे. तुम्ही तुमच्या रथात सज्ज होता तरी ते अभिमन्यूला कसे घेरू शकले? कां मी असे समजू कीं, तुम्ही सगळे भ्याड अहात? तुमच्या भरवशावर मी त्याला तुमच्यात सोडून गेलो होतो. तुमच्या कडे जी आयुध आहेत ते काय केवळ दागिने आहेत कां? कां फक्त सभेत बोलण्या पुरतो तुमचे शहाणपण आहे असे समजू कां? आपल्या भावंडाना अशारितीने दोष देऊन तो पार्थ जमिनीवर फतकल मारून बसतो. त्याच्या हातात त्याचे गांडीव होते, त्याचा अवतार असा होता कीं, त्याच्याकडे पहाण्याची हिम्मत कोणाला होत नव्हती. तो साक्षात यम वाटत होता. त्याच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा लागल्या होत्या. तो जोरा जोरांने श्वास घेत होता. पुत्र वियोगाचे दुःख तो आवरू शकत नव्हता. वासुदेव आणि युधिष्ठीर कोणीही त्याचे सांत्वन करू शकत नव्हते. खरे तर त्या सगळ्यांना अभिमन्यूच्या जाण्याचा धक्का आवरता आला नव्हता. ते सगळे तितकेच शोकाकूल होते. शेवटी मोठा भाऊ ह्या नात्याने युधिष्ठीर बोलतो,

प्रतिज्ञा पर्व भाग सत्तरावा संपला.

** पारशी समाजातील मृतांना गिधाडाला खाण्यास देण्याच्या पद्धतीचे मूळ येथे आढळते.*

## प्रतिज्ञा पर्व (संपले)

## भाग एकाहत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, "तू संसप्तकांचा बिमोड करण्यासाठी गेल्यानंतर द्रोणांनी मला कैद करण्याचा मोठा प्रयत्न केला. त्यात त्याना यश नाही आले. त्यामध्ये आपले मोठे रथदल अडकले होते. द्रोणांनी मोठ्या प्रमाणात आपल्या सैन्याचा नाश करण्यास सुरूवात केली. तो मारा इतका प्रभावी होती की आम्ही त्याचे सैन्य पाहू शकत नव्हतो. त्यामुळे त्यांना उत्तर देणे दुरापास्त होते. अशावेळी आम्ही तुझ्या मुलाला जो तुझ्या इतकांच शूर आहे, विचारले कीं. तो ते चक्रव्यूह फोडू शकेल कां"? तो बोलला कीं, त्याला ते फोडण्याचे माहीत आहे पण त्यातून बाहेर येण्याचे माहीत नाही. तरी तो ते करण्यास तयार झाला व स्वताहून व त्या चक्रात घुसला जसा गरुड समुद्रात घुसतो. त्याच्या मागून आम्ही त्या चक्रव्युहात घुसण्याचा प्रयत्न करू लागलो. त्याप्रमाणे आम्ही कौरवांच्या सैन्याची फळी फोडण्यात यश मिळवलेसुद्धा. अभिमन्यू पुढे जात राहीला व त्याच्या वेगांने आम्हीसुद्धा त्याच्या मागून जात होतो. त्यावेळी कौरवांचा जावई जयद्रथ कौरवांची मोठी फौज घेऊन आमच्या वाटेत उभा झाला. त्याला रुद्राचा आशिर्वाद असल्यामुळें तो आम्हाला अडवू शकत होता. द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा असें सगळे रथी महारथी अभिमन्यूला घेरतात. त्यांबरोबर राजा कोसल व कृतवर्मन असे सहा अभिला वेढा घालतात. तरी अभिमन्यू त्याना भारी जात होता. ते त्याचा रथ मोडतात. त्याच्या भोवती त्यांच्या रथातून गोल घिरट्या घालू लागतात. त्यानंतर तरीसुद्धा अभिमन्यू त्यांच्याशी तलवार व ढाल घेऊन लढत होता. आपला अभि त्याना ऐकत नव्हता. अभि जसे ते घिरट्या घालत त्याच्या भोवती जवळ येऊ लागतात, अभि कौशिकाने आकाशात उंच उडी मारतो. त्याच्या हातात तलवार व दुसर्या हातात ढाल होती. तो उंचावरून खाली येत असतांना द्रोण त्याची तलवार उडवतात व कर्ण ढाल काढून घेतो. अशाप्रकारे निःशस्त्र झालेला अभि खाली येतांना जमिनीवर आपटून मरेल असे सगळ्याना वाटत असतांना तो मोठ्या शिताफिने त्याच्या पायावर उतरतो. तेथे पडलेले रथाचे चाक तो घेतो व सुदर्शन चक्राप्रमाणे ते तो फिरवत त्यांचे बाण उचलत

असतो. ते होत असताना त्या सहाजणांचे रथ आणखीन जवळ जातात त्यातील एक अभिच्या हातातील चाक तोडून टाकतो. त्याच वेळी दुःशासनाचा मुलगा जो अभिमन्यूच्या वयाचाच आहे, येतो गदा घेऊन अभिला मारावयाला. त्याबरोबर अभि तेथे पडलेली एक गदा घेतो व त्यांचे गदायुद्ध सुरू होते. दोघे एकमेकांना प्रहार करतात. त्या प्रहाराने दोघे मृच्छित होऊन पडतात. परंतु, दुःशासनाचा मुलगा अभिमन्यूच्या आधी भानावर येतो व उठतो. अभि कदाचित खूप थकला असावा. तो दुःशासनाचा मुलगा उठत असलेल्या अभिमन्यूच्या शीरावर गदेचा प्रहार करतो त्यात अभिमन्यू जो खाली कोसळतो तो उठत नाही. त्यानंतर ते सहाजण त्याच्यावर तलवारीने असंख्य वार करून त्याचा खून करतात. ते धर्मयुद्ध नव्हते व त्यात द्रोण सामील होते. अशारितीने आपल्या अभिमन्यूचा अंत झाला. त्या आधी त्याने कौरवांचे दहाहजार सैनिक यमाकडे पाठवले होते. त्याचे शरीर बाणांने भरलेले होते जसे पितामहांचे होते. अभिने सैनिकांबरोबर असंख्य हत्ती, घोडे त्याच्या शरसंधानाने गारद केले होते. कित्येक नामचंद योद्धे त्याने मारले होते. कित्येक अनामी योद्धे मारले होते त्याची गणती नाही. त्याशिवाय त्याने वृहद्वलाचा वध केला होता. जर जयद्रथ आडवा आला नसता तर आम्ही अभिमन्यूला मिळालो असतो व जर तसे झाले असते तर तो मेला नसता. असें सगळे घडले आमच्या आजच्या दुःखाचे कारण ठरले. युधिष्ठीराने ते निवेदन केल्यानंतर अर्जुन बोलतो, "अरे माझ्या लाडक्या मुला",असें बोलून तो बेहोष होऊन जमिनीवर पडतो. सगळे पांडव त्याच्या भोवती जमा होतात. ते आणखीनच चिंताक्रांत झालेले दिसत होते. थोड्याच वेळात तो उठतो, त्याच्या चेहर्यावर फक्त आणि फक्त संताप दिसत होता. त्याचे सर्व अंग संतापाने थरथरत होते. हाताच्या मुठी वळवून तो आजूबाजूला नजर फिरवतो. त्याच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा लागल्या होत्या. अर्जुन बोलतो, "उद्या मी त्या जयद्रथाचा वध करणार, जर तो भयाने कौरवांची बाजू सोडून गेला तरच तो वाचेल. किंवा तो आपल्या बाजूस आला तरच तो जीवंत राहील, नाहीतर मी जाहीर करतो कीं, उद्या जयद्रथ मरणार". उद्या जे कोणी त्याला वाचवण्याचा प्रयत्न करतील ते सगळे सुद्धा मी मरून टाकेन. मग ते द्रोण असले, कृप असले, कर्ण असले तर ते सगळे मरणार आहेत माझ्या हातून. आमची मैत्री विसरून

जो धृतराष्ट्राच्या मुलासाठी काम करतो त्याला मेलेच पाहिजे. माझ्या मुलाच्या मृत्यूस जो जयद्रथ कारणीभूत आहे तो सुद्धा मरणार. जर ते मी उद्या करू शकले नाही तर मी स्वता त्या लोकांत जाणार नाही जेथे यमाकडे गुणीजन जातात. जर मी जयद्रथाचा वध उद्या केला नाही तर मी त्या पापमय लोकांत जाईन जेथे जातात ते पापी लोक जे त्याच्या आईचा खून करतात, बापाचा खून करतात, जे गुरूच्या पत्नीबरोबर झोपतात, जे भ्रष्ट जीवन जगतात, जे अपशब्द वापरून बोलतात, जे दुसर्याची संपत्ती गिळंकृत करतात, जे गुणाजनांचा द्वेष करतात, जे विश्वासघात करतात, जे आपल्या भार्येचा विनाकारण अपमान करतात, जे ब्राह्मणाचा अपमान करतात, जे गुरढोर क्रूरपणे मारतात, जे साखर घालून तयार केलेले दूध पितात, अथवा इतर खाद्य पदार्थ देवांना अर्घ्य देण्याआधी, अर्पण करण्या आधी, सेवन करतात, तेथे मी जाईन. त्या खालच्या लोकांत मी जाईन ज्या लोकांत ते जातात जे अग्नीला, वेदांना, ब्राह्मणांना पाय लावतात. जे पाण्यात मुततात, मळ(विष्टा) टाकतात, थुकतात ते ज्या लोकांत जातात त्या लोकांत मी जाईन जर उद्या मी जयद्रथाला मारले नाही. जे नग्न होऊन स्नान करतात, जे अतिथींचा अपमान करतात, जे लांच खातात, जे खोटं बोलतात, जे इतरांना फसवतात, जे स्वताच्या आत्म्याचे (आतला आवाज) ऐकत नाहीत. जे दुसर्याची खोटी स्तुती करतात, जे त्यांच्या सेवकांच्या समोर मिष्ठान्न खातात त्यांना न देता, त्या लोकांत माझी रवानगी होईल जर मी उद्या जयद्रथाला मारले नाही. मी त्या नरकात जाईन जेथे प्रामाणिक मित्राचा घात करणारे जातात. जे सत्पात्र शेजार्याशी श्राद्धाचे जेवण करत नाहीत. जे नशापाणी करतात, जे दुसर्यांचा अपमान करतात, गरज संपली कां जे मित्राला विसरतात त्या लोकी मी जाईन. त्या सगळ्या पापमय लोकांचा मी धनी होईन जर मी उद्या जयद्रथाचा वध केला नाही. माझी दुसरी प्रतिज्ञा ऐका, जर उद्याचा सूर्य मावळला व जयद्रथ जीवंत असेल तर मी अग्नीकाष्ठ भक्षण करीन. हे तुम्ही कोणीही असा, असुर असा, राक्षस असा, पक्षी, साप, पितर असा, ऋषी असा, चराचर जे कोणी असा जर तुम्ही माझ्यापासून त्या जयद्रथाला वाचवण्याचा प्रयत्न कराल तर त्यालासुद्धा मी यमाकडे पाठवीन. माझ्या शंभर बाणांनी मी त्या अभिमन्यूच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्याचा परामर्श करीन.

संजय पुढे सांगतो, अशा प्रतिज्ञा केल्यावर अर्जुन त्याचे गांडीव सज्ज करतो. अर्जुनाची ती प्रतिज्ञा वाणी सगळ्या आसमंतात दुमदुमते. ते ऐकल्यावर जनार्दन त्याचे शंख पांचजन्य वाजवतो. फाल्गुनी त्याचे देवदत्त वाजवतो. कृष्णाच्या श्वासाने भरलेले ते पांचजन्य शंख मोठा आवाज करते. सगळ्या जगाला ती प्रतिज्ञा समजते, पृथ्वी हादरते. जसे युगांत होणार आहे. ती धनंजयाची प्रतिज्ञा आकाशापर्यंत पोहोचते तशी स्वर्गातून दैवी वाद्ये वाजू लागतात. त्यांचा एकच गजर सुरू होतो. पांडवांच्या तळावर सुद्धा रण वाद्ये वाजू लागतात.

प्रतिज्ञा पर्व भाग एकाहत्तर संपला.

# जयद्रथ वध पर्व (सुरू)

## भाग बाहत्तरावा

संजय पुढे सांगत असतो, दुर्योधनाच्या हेरांना ते समजते. ते त्यांच्या धन्याला त्याची खबर देतात. जयद्रथालासुद्धा ती वार्ता समजते. तो घाबरून जातो. त्याला वाटते कीं पृथ्वी त्याला खाऊन टाकत आहे. बराच वेळ विचार केल्यावर तो दुर्योधनाला भेटण्यासाठी निघतो. तेथे गेल्यावर तो तेथे बसलेले इतर राजे पहातो. तेथे तो त्याची अर्जुनाबद्दलची भिती सांगतो. तो बोलतो, "इंद्राच्या मर्जीने पंडुच्या घरात त्याचा पुत्र जन्मला आहे. तो मला यमाकडे धाडण्याच्या गोष्टी करत आहे. परंतु आपल्या सगळ्यांच्या कृपेने ते टाळता येईल असें मी समजतो. अहो क्षत्रिय श्रेष्ठीनो मला आपल्या संरक्षणाची आज गरज आहे. नाहीतर मी विचार करतो कीं, आता मला माझ्या घरी गेले पाहिजे. मला ह्या युद्धात कांहींच रस नाही परंतु, केवळ दुर्योधना वरील प्रेमामुळें मी ह्या युद्धात सामील झालो होतो पण आता असें वाटते कीं, मी माझ्या सिंधदेशात जाणेच योग्य होईल. त्यातच माझे हित आहे. पार्थ मला उद्या ठार मारण्याची प्रतिज्ञा घेऊन बसला आहे. तुम्ही मला संरक्षण देऊन वाचवावे. द्रोण, कृप, दुर्योधन, कर्ण, सल्य, वल्हीक, दुःशासन वगैरे राजे यमालासुद्धा आवरू शकतील पण ते अर्जुनाला आवरू शकणार नाहीत. पृथ्वीवर कोणी नाही जो विभत्सूला पराभूत करू शकेल. तुम्ही सगळे एकत्र आलात तरीसुद्धे त्याला तुम्ही आटपू शकणार नाही. जयद्रथ त्यांना सांगत असतो. पांडवांच्या जिंकण्याच्या आरोळ्य ऐकून माझ्या जीवात वाईट होत आहे. मला तो धनंजय उद्या निश्चितपणे मारणार असें दिसते. त्यापेक्षा मी लढाईतून अंग काढून घेतो व माझ्या देशाला निघून जातो. देव, गंधर्व, उगर, असुर, राक्षस असे कोणीही त्याच्यापुढे युद्धास उभे राहू शकणार नाहीत. म्हणून मला घरी जाण्याची आपण परवानगी द्यावी. मी येथून दूर जाऊ इच्छितो. दुर्योधन फक्त त्याच्या मतलबासाठी सगळ्यांना वापरत असतो. त्याला दुसर्यांच्या भविष्याशी कांहीं देणे घेणे नसते. असा तुझा मुलगा जयद्रथाला सांगतो कीं, त्याने भिऊ नये. तू क्षत्रियांच्या घेर्यात सुरक्षित असशील. तेथे तुला कोणी कांही करू शकणार नाही. पण तू तुझ्या

देशाला जाण्याचा प्रयत्न केलास तर मात्र तो पांडव तुला वाटेत गाठून मारू शकेल, ह्याचा विचार कर. कितीतरी बलाढ्य क्षत्रिय आहेत, कर्ण, चित्रसेन, विविंसती, पुरुमित्र, जय, भुरिश्वस, सल, सल्य, वृषसेना, भोज, सुदक्षिणा, सत्यव्रत, विकर्ण, दुमुख, दुःशासन, सुवाहू, कलींगचा राजा, अवंतीचे विंद, अनुविंद, द्रोण, अश्वत्थामा, शकूनी असे कितीतरी आपवे योद्धे तुझे संरक्षण करतील, तू विनाकारण काळजी करू नकोस. तू स्वतः एक नावाजलेला योद्धा आहेस हे विसरू नकोस. अशा परिस्थितीत अर्जुनाला भिण्याची तुला गरज नाही असें दुर्योधन त्याला समजावतो. आपले अक्षौहिणी सैन्य तुझे संरक्षण करण्यस सज्ज आहे. त्याच्या प्रतिज्ञेला तू एवढे महत्व देऊ नकोस.

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर जयद्रथ थोडा सुखावतो व नंतर तो व तुझा मुलगा द्रोणांच्या तंबूत जातात. तेथे गेल्यावर तो त्यांच्या पाया पडतो. त्यानंतर ते त्यांच्या आसनांवर विराजमान होतात. त्यानंतर जयद्रथ द्रोणांना विचारतो, "गुरू माउली, मला सांगा अर्जुन व मी ह्यात क्षत्रियत्वाच्या नजरेने काय फरक आपल्याला आढळतो"? "त्याच्या आणि माझ्या शौर्यामध्ये, शस्त्रविद्येच्या अभ्यासात, चपळाई मध्ये, मंत्रविद्येच्या पारंगतते मध्ये कोण वरचढ असें तुम्हाला वाटते".

द्रोण त्याला सांगतात, "शिक्षणात तुम्ही दोघे समसमान अहात. तरी जे अवघड आयुष्य तो जगला व त्यांने जी तपस्या केली ते पहाता तो तुझ्यापेक्षा जास्त वरचढ आहे. तरीसुद्धा त्याला भिण्याची तुला आवश्यकता नाही. मी तुझे संरक्षण करणार आहे. त्यामुळे त्याच्या प्रतिज्ञेला फारसे महत्व तू देऊ नकोस. ज्याला मी संरक्षण देणार त्याचे देवसुद्धा कांहीं बिघडवू शकणार नाहीत. मी उद्या असे व्युह रचणार आहे कीं, त्याला छेदणे कोणालाही जमणार नाही. म्हणून तू जरूर युद्धात सामील हो उद्या. तुझ्या वर्णाला न शोभेल असें तू वागू नकोस. अग्नीमध्ये अर्घ्य दे तुपाचे व देवांना आमंत्रण दे कीं ते तुला संरक्षण देतील. तसे केलेस कीं तुला मृत्यूचे भय वाटणार नाही. जरी समजा मेलास तर काय वाईट होणार आहे? तुझे स्वर्गातील स्थान पक्के झाले आहे ह्या युद्धामुळें, ते मिळेल, त्यात काय बिघडले"? म्हणून मृत्यूला घाबरू नकोस. कौरव, पांडव, वृश्नी आणि इतर सगळे मर्त्य आहोत म्हणजे केव्हातरी मरणारच. त्याचा विचार

करू नकोस. लवकरच आपण सगळे मारले जाणार आहोत. काळ कोणालाही सोडत नाही त्याला भिऊन आपले कर्तव्य सोडणारा नरकात जातो, तुला नरकात जावयाचे आहे कां? आपले कर्म घेऊन आपण सगळे त्या लोकी जाणार जेथे आपला हिशोब होतो. त्या हिशोबात तू कमी ठरू नकोस. ज्या लोकी मोठे तपस्वी खडतर तपस्या करून जातात, त्या लोकी आपण युद्धात लढत मरून जाणार असतो. मग त्यात काय वाईट होणार"? अशारितीने द्रोण त्या सिंधच्या राजला पटवतो. त्यामुळे त्याची भिती जाते व तो दुसर्या दिवशी लढण्यासाठी तयार होतो. त्यानंतर त्याचे सैन्यसुद्धा लढण्याच्या तयारीला लागते. कौरवांच्या तळातून सुमधूर वाद्ये व गाणी व सैनिकांचे आनंदाचे ओरडणे ऐकू येऊ लागतात.

जयद्रथ वध पर्व भाग बाहत्तरावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, पार्थाने ती प्रतिज्ञा घेतल्यानंतर जनार्दन त्याला बोलतो, "तू तुझ्या भावांच्या संमतीने ती प्रतिज्ञा केलीस परंतु, मला त्याबद्दल कांहींच आधी बोलला नाहीस. असे वागणे योग्य नव्हते. मला न विचारता तसे तू बोललास ह्यामुळे तुझ्यावर मोठा बोजा तू घेतला आहेस. मी माझे कांहीं हेर कौरवांच्या अड्ड्यावर पाठवले आहेत ते इतक्यातच येतील. ते कांहीं माहिती आणतील. तू प्रतिज्ञा केल्यानंतर आपल्या गोटात जो आनंदाचा जल्लोष झाला तो कौरवांच्या गोटात ऐकू गेला होता. त्यामुळे त्यांच्यात घबराट पसरली आहे. त्याना माहीत आहे कीं त्या आरोळ्य फालतू नव्हत्या. त्यात कांहीं दम होता. थोड्या वेळानंतर कौरवांच्या गोटातून तसांच आरडा ओरड ऐकू आला. त्याच्या हत्तीदलाचे, घोडदळाचे व रथदळाचे आवाज ऐकू येत होते. अर्जुन रात्री लढणार असें त्यांना कदाचित वाटले असावे व म्हणून त्याची ते तयारी करत असावेत. परंतु लवकरच त्याना तुझ्या प्रतिज्ञेची माहीती मिळाली. उद्या सिंधच्या राजाच्या वधाची घोषणा तू केलीस ते त्यांना समजले. ती प्रतिज्ञा ऐकून तुझ्या मुलांच्या गटात शोककळा पसरली. जयद्रथ सिंध व सौवीरचा राजा फारच खचून गेला होता. त्यांच्या छावण्यातून जोरा जोराने खलबत सुरू झाली होती. तेथे दुर्योधनाला तो जयद्रथ सांगतो कीं, अर्जुनाला वाटते कीं, मी अभिमन्यूला मारले. खरेतर त्याला मारणाऱ्यात मी अजिबात नव्हतो. मी पांडवांचा प्रतिकार करत होतो मग तो मला कां मारण्याच्या गोष्टी करत होता"? जयद्रथ तेथे विचारत होता. भर सैन्याच्या मध्ये तो मला मारणार असें त्यांने सांगितले आहे. ते कां ते समजत नाही. कांहीं ही असो मला संरक्षण मिळालेच पाहिजे. त्याचा पाय मला लागता कामा नये. जर तुम्ही माझे संरक्षण करण्यास असमर्थ असाल तर मी माझ्या देशाला जातो मला ह्या युद्धात मरावयाचे नाही. असें जयद्रथ सांगत होता. ते जयद्रथाचे बोलणे ऐकून दुर्योधन नाराज होतो. तरी तो समजतो कीं, त्याच्या बहिणीचा नवरा खरोखरच फार घाबरला आहे तो त्याला घेऊन द्रोणांकडे जातो. जयद्रथ तेथे बोलतो कीं, कौरवांच्या कडे एकही असा तिरंदाज नाही

जो अर्जुनाशी तोड करू शकेल. त्याच्या गांडीवाला मारेल असे धनुष्य सगळ्या जगात नाही. महेश्वरसुद्धा अर्जुनाबरोबर लढणार नाही, देवांना मदत करण्यासाठी त्याने एका रथातून हजार दानव मारले आहेत. त्याला जोडीला आहे वासुदेव अशी जोडी कधीच कोणी हरवू शकणार नाही. ते दोघे एकत्र आहेत म्हणून सगळे जग त्याच्यापुढे टिकाव धरू शकणार नाही. म्हणून मला माझ्या देशाला जाण्याची परवानगी दे असे जयद्रथ तुझ्या मुलाला परोपरीने सांगत होते. त्यानंतर ते द्रोणाकडे गेले. तेथे द्रोण त्याला आश्वासन देतात कीं, ते त्याला संरक्षण देतील. जयद्रथाला संरक्षण देण्यासाठी सगळी व्यवस्था केली जाणार आहे असे समजते. त्यात हत्ती घोडे रथ असें सगळे वापरले जाणार होते. त्याशिवाय कर्ण, भुरिश्वर, अश्वत्थामा, वृषसेन, कृप, सल्य, साल असे महा योद्धे त्याच्या भोवती राहून त्याला संरक्षण देणार असें ठरले आहे. त्याशिवाय द्रोण एक असे व्युह रचणार आहेत ज्यात दोन भाग असतील, एक शकट व अर्ध कमळ असें ते असतील. त्यात पाकळीमध्ये जयद्रथ असेल. म्हणजे त्याच्या पर्यंत धनंजय पोहोचू शकणार नाही. कारण, त्या सहाना पराभूत केल्या शिवाय पार्थ जयद्रथाकडे जाऊ शकणार नाही असं ते समजत आहेत. तेव्हां आपणसुद्धा योग्य व्युह रचना केली पाहिजे, कृष्ण सांगतो.

जयद्रथ वध पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# जयद्रथ पर्व

## भाग चौर्याहत्तरावा

अर्जून बोलतो, तुम्ही त्या सहाजणांना फार जोरदार समजता त्यांच्या एकत्रित सामर्थ्यापेक्षा मी सहापट आहे. त्यांची मला भिती वाटत नाही. अरे मधूनाशका, त्यांची सगळी आयुध नष्ट करून मी जयद्रथापर्यंत सहज जाऊ शकतो. तेसुद्धा द्रोणांच्या समक्ष मी करणार आहे. मी सांगतो माधवा त्या जयद्रथाचे मुंडके मी तोडणार आहे. ते पाहून शोक करण्यापेक्षा दुसरे कांहीं ते करू शकणार नाहीत. मी सांगतो अरे माधवा ह्यावेळी सगळे साध्य, रुद्र, सगळे वसू, अश्विन, मरुत, त्याबरोबर इंद्र, विश्वदेव, सगळे देव, पितर, गंधर्व, गरूड, सगळा समुद्र, सगळे पहाड, सगळे आकाश जरी त्याला वाचवण्यासाठी आले तरी मी त्याला उद्याच्या लढाईत ठार मारणार आहे हे समजून घे. हे माझे वचन आहे. माझ्या सगळ्या आयुधांना स्पर्श करून ते बोलत आहे. दुर्योधनला वाटते कीं द्रोण त्याला वाचवतील तो एक त्याचा गैरसमज आहे. हा सगळा बेत द्रोणांचा आहे तेव्हां मी प्रथम द्रोणाच्याच फौजेला मारून टाकतो. त्यानंतर मी जयद्रथाकडे जातो. कोण मला अडवतो ते पहातो. माझ्या जिवलग मित्रा तू उद्या पहा मी कसा सर्वश्रेष्ठ समजल्या गेलेल्या तिरंदाजांची वाट लावतो. उद्या शत्रूच्या माणसांचे हत्तींचे व घोड्यांचे रक्त वाहून सगळ्या रणांगणाचा चिखल होणार आहे तो तू पहा. माझ्या गांडीवातून निघणारे बाण असंख्य क्षत्रियांचा नाश करणार आहेत उद्या सोळाव्या दिवशी हे तू पहात रहा. उद्या मी माकडून घेतलेली भयंकर अस्त् वापरणार आहे. त्याच्या जोडीला कुबेर, वरूण, इंद्र आणि रुद्र ह्यांची अस्त्र सुद्धा वापरणार आहे. उद्या जे कोणी त्या सिंधच्या राजाला वाचवणार आहेत त्या सगळ्यांचा मी कसे फज्जा उडवतो ते पहा. उद्या तू पहाशिल कशी राजांची मुंडकी जमिनीवर पडलेली असतील. सगळे नरमांस भक्षक उद्या संतुष्ट झालेले असतील. माझ्या शस्त्रसंधानाने मी माझ्या दोस्तांना खूष करणार आहे. जे पहाण्यासाठी ते आतूर असतात ते त्यांना मी उद्या दाखवणार आहे. तो सिंधचा राजा, माझा गुन्हेगार, त्याच्या मरण्याने त्याचे दोस्त दुःखी होणार आहेत. तो महापापी, ऐषारामात वाढलेला, त्याच्या नाशाने दुर्योधनाचे डोके

ठिकाणावर येईल तर बरे नाहीतर त्याची काय गत होणार आहे लवकरच ते तू उद्या पहाणार आहेस. त्याला समजेल कीं, माझ्या बरोबरीचा कोणी दुसरा तिरंदाज नाही ह्या जगात. माझे गांडीव दैवी आहे. मीसुद्धा दैवी आहे, माझा सारथी दैवी आहे, अशांना काय अशक्य आहे? माझी हिम्मत पहा, मला सांग माझ्या मित्रा, मघा तू मला कां रागावलास कीं, मी तुझ्या परवानगीशिवाय ती प्रतिज्ञा कां केली म्हणून? जशी लक्ष्मी सदैव सोमात उपस्थित असते, समुद्रात पाणी सदैव असते, तशी माझी प्रतिज्ञा सदैव खरी होते. माझ्या अस्त्रांना कमी समजू नकोस. माझ्या गांडीवाला कमी समजू नकोस, मला कमी समजू नकोस. आपण उद्या लढावयाला असे जाणार की फक्त जिंकूनच येणार. मी प्रतिज्ञा केली म्हणजे तो नराधम उद्या मेल्यातच जमा आहे. ब्राह्मणात सच्चाई असते, चांगुलपणात नम्रपणा असतो, खरी समृद्धी त्यागात (देण्यात) असते, नारायणात जय असतो व नरात नारायण असतो.

संजय पुढे सांगतो, अशारितीने बोलल्यानंतर हृषिकेश जो स्वताबद्दल असेंच सांगत असतो, पुढे अर्जुन केशवाला बोलतो, उद्या आपला रथ असा तयार ठेव कीं पहाट झाल्या बरोबर आपण आपल्या चढाईला प्रारंभ करावयाचा आहे.

जयद्रथ वध पर्व भाग चौर्याहत्तरावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग पंच्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, वासुदेव आणि धनंजय दोघे त्यांच्या अभिमन्यूच्या वधाने दुःखी झाले होते. त्या प्रकाराने ते सांतापलेल्या सापासारखे त्या रात्री झोपी जातात. नर व नारायण दोघे दुःखी आहेत असे इंद्राला समजते. तो सुद्धा बेचैन होतो. तो विचार करत असतो आता काय होणार आहे? त्याचा परिणाम स्वरुप जोरा जोराने वारे वाहू लागतात. आकाशात ढगं नव्हती तरी ढगांचा गडगडाट ऐकू येत होता. वीजा चमकू लागतात. पृथ्वीवरील पहाड थरथरू लागतात. समुद्रातील मांसे उसळून उड्या मारून पाण्याबाहेर येत होते. त्या दिवशी यमाच्या राज्यात मोठ्या प्रमाणात योद्धे येत होते. जंगलातील प्राणी मोठ्या मोठ्यानो ओरडत होते. असें कांहीं भयंकर शकून दिसत होते ज्यामुळे अंगावर कांटा उभा रहात होता. त्या पांडवाची प्रतिज्ञा ऐकून तुझ्या सैनिकांत बेचैन झालेले होते. त्यावेळी अर्जुन कृष्णाला सांगतो कीं, तू तुझ्या बहीणाचे व सुनेचे सांत्वन करावेस. मला ते काम करता येणार नाही. ते ऐकल्यावर कृष्ण त्यांच्या तंबूतून निघतो व सुभद्राच्या ठिकाणी जातो व तिला सांगतो जे घडले ते. ते ऐकून तिचा तोल जातो. वासुदेव तीला सांगतो, वृश्नी घराण्याच्या बायका अशा प्रसंगी रडत नाहीत. तुझी सुन आहे तिला तू कसे सावरशिल जर तूंच दुःख करत बलशिल"? प्रत्येक जीवाला त्या प्रसंगातून जावे लागते. तुझा मुलगा एका वीराचा मृत्यू घेऊन गेला आहे. क्षत्रियांत असा मृत्यू मोठा भाग्याचा समजला जातो. जसा मृत्यू प्रत्येक क्षत्रिय मांगत असतो तसा त्याला मिळाला ह्यातच त्याचे मोठे भाग्य समजले जाते. त्यांने मरण्या आधी हजारो क्षत्रियांना कंठस्नान घातले होते. त्यानंतर तो सुद्धा त्याच गतीने गेला जसे अपेक्षित होते अशा युद्धात. असे योद्धे स्वर्गात जातात जेथे फक्त सुख असते. तपस्व्याना घोर तप केल्यानंतर वेदांचा अभ्यास केल्यानंतर व ब्रह्मचर्य पालन केल्यानंतर जे प्राप्त होते ते त्याला क्षात्र धर्माचे पालन केले म्हणून प्राप्त झाले आहे. तुझा मुलगा उत्तम गतीला गेला आहे. त्याकरता त्याच्या जाण्याचे दुःख करू नकोस. तू एका वीराची माता झाली आहेस त्याचा रास्त अभिमान तुला झाला पाहिजे. तुझी सून वीराची पत्नी ठरली आहे

त्याचा तिला अभिमान वाटला पाहिजे. सिंधचा बदमाष राजा, त्यांने तुझ्या मुलाचा खून केला आहे. तो महापापी त्याच्या तशाच दोस्तांसह त्या कर्माची कटू फल लवकरच चाखणार आहे. ते आज रात्री होणार आहे. पार्थाच्या हातातून तो सुटणार नाही. उद्या तू ऐकशिल त्या सिंधच्या राजाचे काय झाले. त्याचे मुंडके समंतपंचकाच्या बाहेर फेकले जाणार आहे. तुझे अश्रू पुस व शांत हो. तो त्याचे क्षत्रिय कर्तव्य पार पाडत असतांना देवाज्ञा झाली आहे ह्यातच त्याचे महद्भाग्य समजले पाहिजेस. क्षत्रियांच्या बायकांना अशा प्रसंगासाठी मनाची तयारी ठेवावयाची असते. तो आज्ञाधारक मुलगा, प्रेमळ पती, नातेवाईकांचा सखा आता देवाच्या घरी आराम करत आहे. त्याच्या मृत्यूचा सूड पार्थ उगवणार आहे उद्या. पार्थाची प्रतिज्ञा उद्या सार्थ होणार आहे. तुझ्या पतीने जे आरंभले ते आम्ही पूर्ण करणार आहोत, तिच त्याला खरी श्रद्धांजली असेल. उद्या जरी सगळी पिशाच्च, असुर, देव, पक्षी, भटके प्राणी त्याला मदत करण्यासाठी गेले तरी ते त्याला वाचवू शकणार नाहीत. उद्याचा त्याचा शेवटचा दिवस आहे.

जयद्रथ वध पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग श्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, आपल्या भावाकडून होणार्या सांत्वनामुळे जास्तच आवंढा गिळून ती तिचे दु:ख आवरण्याचा प्रयत्न करते. तेंच अभिमन्यूची विधवा करत असते. कारण जे घडले ते टाळता येणारे नव्हते. जो दुसर्यांना ठार मारण्यात धन्यता मानतो तो तसांच मरणार हा युद्धाचा नियम असतो. त्यावेळी ती पोटाशी होती व राजा परिक्षित जन्मणार होता त्याची कृष्ण दखल घेतो.

सुभद्रा तिच्या मुलाच्या आठवणी करत असते, माझ्या बाळा तू तुझ्या बापाच्या बरोबरीचा होतास हिम्मतीमध्ये आणि कर्तृत्वात. असा तू इतक्या लवकर का गेलास मला सोडून? मला तुझा चेहरा समोर दिसतो, तो निळ्या कमळासारखा तुझा चेहरा, त्यातील तुझे शुभ्र दात, सुंदर नेत्र आता ते फक्त आठवणीत रहाणार व तुझ्या आठवणीने आम्ही झुरत रहाणार कारण आता तू स्वर्गाचा धनी झाला आहेस. तुझे सुंदर शरीर आता त्या रणभूमीच्या मातीत पडले आहे ह्या विचारांने मला फार कसेसेच होते आहे रे. युद्धाहून कधीही परत न येणार्या मर्दा आता फक्त तुझ्या आठवणी रहाणार आहेत माझ्याकडे. मला सहन होत नाही कीं तुझे शरीर बाणांच्या माराने चिन्नभिन्न झाले असेल. कसे ते दिसत असेल? तुझे सुंदर नेत्र आता कायमचेच मिटलेले असणार आहेत. त्या उगवणार्या चंद्राच्या प्रकाशात तू कसा दिसत असशिल रे. मऊ बिछाईतीवर झोपणारा माझा बाळ आता मातीत मळून गेलेला कसा दिसत असेल रे, बाणांनी भरलेले तुझे शरीर कसे दिसत असेल रे. सुंदर ललनाच्या सहवासात रमणारा तू आता त्या नरमांस भक्षक लांडग्यापुढे कसा पडलेला असशिल रे. तुझ्या करमणूकीसाठी सुमधूर संगीत वाजावयाचे आता त्या ऐवजी भेसून किंकाळ्या त्या मांसभक्षक प्राण्यांच्या तुला ऐकाव्या लागत असतील ह्या कल्पनेने माझे ऊर भरून येते. तू पांडव असतांना एकटा कसा झालास? ते कोठे होते? पांचाल कोठे गेले होते तुला एकटा सोडून ते मला समजत नाही. असं कधी आधी झालेले नाही. तुला किती पाहिले तरी माझे कधी समाघान होत नसे. आता तुला पहाण्यासाठी मला तुझ्याकडे जावे लागेल स्वर्गात.

तुझा देखणा चेहरा ज्याच्यावर एकही मुरूम नाही असा तुळतुळीत गोंडस माझा छकुला मी तुला कधीही ह्यापुढे पाहू शकणार नाही हे माझ्या मनाला पटत नाही रे माझ्या छोनुल्या. कोठे गेले होते तुझे काका? धिक्कार असो त्या भिमसेनाचा. काय उपयोग त्या सामर्थ्याचा जे माझ्या मुलाला वाचवू शकत नव्हते. मी त्या सगळ्यांचा धिक्कार करते ज्यांच्या दिरंगाईमुळे माझा अभि माझ्या पासून दूर झाला आहे. मला सगळी पृथ्वी शून्य झाली असे वाटते. काय उपयोग त्या पृथ्वीचा जी माझ्या लेकराला वाचवू शकली नाही. तू वासुदेवाचा पुतण्या गांडीवधारी विभत्सूचा पुत्र असें असूनही त्याचा कांहीं उपयोग झाला कां? तू मेलासच ना! तू स्वतः अतिरथ होतास. तू माझा खजिना होतास जो आता यमाने लुटला आहे. पृथ्वीवरील जीवन क्षणभंगूर असे म्हणतात ते आता मला पटू लागले आहे. मला नियतीचा खेळ समजेनासा झाला आहे. केशव तुझा त्राता असूनही तू गेलासच नां? कृष्णाने तुला कां नाही वाचवले ते मला समजत नाही. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो यज्ञ करणार्या पवित्र जीवन जगणार्या ब्रह्मणांना मिळतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो दानं करतो, गुरूची सेवा करतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो योद्धात हार न मानता लढत लढत मरतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो हजारो गाईचे ब्राह्मणांना दान करतो, तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो ब्रह्मचर्य पाळतो व जो मुनी झाला आहे. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो लोकांना रहाण्यासाठी घर, वाडे दानं करतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो आपल्या जीवनसाथीशी प्रामाणिक असतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो त्या राजांना मिळतो जे प्रजेची सेवा करत करत मरतात. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता ज्याला गरीबाची दया आहे व जो सगळ्यांची सेवा करतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो कधी अप्रामाणिक नव्हता, ज्याने कधी विश्वासघात केला नाही. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो कधी त्याच्या अतिथींचा अपमान करत नाही. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो अडचणीत असलेल्यांना नेहमी मदत करतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो आपल्या मातापित्यांची सेवा करतो. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो कधी कोणाला दुखवत नाही स्वताच्या फायद्यासाठी. तुला

असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो दुसर्याच्या बायकांकडे कधी वाईट नजरेने पहात नाही. तुला असा अंत मिळावयाला पाहिजे होता जो सगळ्यांकडे दयादृष्टीने पहात जगला आहे. अशारितीने सुभद्रा शोक विलाप करत असतांना तिला भेटावयाला द्रौपदी व उत्तरा (अभिमन्यूची पत्नी) येतात. त्यांना सुद्धा दुःख आवरत नाही. त्या एकत्रितपणे रडत असतांत. अखेरीस अतिदुःखाने त्या बेहोष होतात. जमिनीवर कोसळतात. तेथे कृष्ण होता त्याच्या कडे पाणी होते ते तो त्यांच्या मुखावर शिंपडतो. कृष्णा त्याना सांत्वन करतांना सांगतो कीं, अभिमन्यूचा मृत्यू एका वीराचा होता. मृत्यू कोणी टाळू शकत नाही. म्हणून त्याचा शोक करावयाचा नसतो. त्याच्या मृत्यूपेक्षा तो परत कधीही भेटणार नाही ह्याचे दुःख जास्त असते ते तो समजतो. तो सांगतो, काळ कोणासाठी थांबत नसतो. सगळ्यांना त्यांच्या समई जावेच लागते. सगळ्या क्षत्रियानी जे पांडवांच्या बाजूचे आहेत त्यांना पुढच्या चढाईचा विचार करावयाचा आहे. त्याच्या शौर्याचा तुम्ही विचार करावा. ते जास्त चांगले होईल. कोणाच्याही मदतीशिवाय तो बलदंडांशी एकटा लढत होता. त्यात त्याने द्रोण, कर्ण, कृप, दुर्योधन, दुःशासन, अश्वत्थामा अशा योद्ध्याना एकाच हाताने हरवले होते, त्या त्याच्या पराक्रमाचा विचार करा व आनंद साजरा करा. तसे केले तर अभिमन्यूच्या आत्म्याला शांती मिळेल. दुःख करत बसलात तर त्यालासुद्धा वाईट वाटेल ते चांगले नाही. असे कृष्ण त्या स्त्रीयांना सांगतो. त्यानंतर कृष्ण त्याच्या तंबूत जातो. इतर राजे आपापल्या ठिकाणी जातात.

जयद्रथ वध पर्व भाग श्याहत्तरावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग सत्याहत्तरावा

संजय पुढे सांगत असतो, त्यानंतर भगवान कृष्ण अर्जुनाच्या घरात आले. त्यानी पवित्र पाणी शिंपून अर्जुनासाठी एक कुस गवताची बिछाईत तयार केली. त्या बिछान्याभोवती त्याची दैवी अस्त्रं, शस्त्रं रचून ठेवली होती. त्या आयुधांची त्यानी मनोभावे पुजा केली. त्यासाठी उत्तम सुगंधी द्रव्य व इतर आवश्यक गोष्टी त्याने वापरल्या. त्यानंतर पार्थ त्या पवित्र पाण्याला स्पर्श करतो त्यानंतर नेहमीची महादेवाची रात्रपुजा संपन्न होते. त्यानंतर मंद स्मित करत माधव पार्थाला बोलतो, तुझे कल्याण हो. अरे पार्था आता त्या कुसाच्या बिछान्यावर झोप मी जातो. तुझे द्वारपाल व इतर पहारेकरी दक्ष असतील. असें सांगून केशव त्याच्या दारूक सारथ्याबरोबर त्याच्या तंबूत जातो. त्यानंतर तो स्वतः त्याच्या शुभ्र रंगाच्या शय्येवर निजतो. त्यावेळी तो उद्याचे कार्य काय करावयाचे त्याचे नियोजन करू लागतो. तो त्याच्या मित्राचे दुःख कमी करण्यासाठी त्याची दैवी शक्ती वापरत असतो. त्यामुळे तो उद्याच्या दिवशी चांगले कार्य करू शकेल. तो साक्षात विष्णू पार्थाच्या चांगल्यासाठी नेहमी कांही तरी करत असे. त्याकरतां तो योगमुद्रेत जातो. त्या रात्री पांडवांपैकी कोणीही झोपले नाही. सगळे अभिच्या निरनिराळ्या आठवणी करत बिछान्यावर लोळत होते. पांडव विचार करत होते कीं, धनंजयाने जी प्रतिज्ञा केली आहे ती तो कशी प्रत्यक्षात आणणार? सगळे समजून चुकतात कीं, त्याने जी प्रतिज्ञा त्या जोशात केली ती प्रत्यक्षात आणणे सोपे नाही. परंतु, त्याच्या प्रिय मुलाच्या प्रेमातून ती उत्पन्न झाली होती. राजा जयद्रथ मोठा पराक्रमी राजा होता. दुर्योधनाचे सगळे बंधू कांहीं कमी नाहीत. त्या सगळ्यांना पार करून त्याला जयद्रथाला मारावयाचे होते. त्यात कौरवांचे सैन्य अफाट होते. पांडव अर्जुनाला शुभ चिंतन करत असतात. जर तो ती पूर्ण करू शकला नाही तर त्याला अग्नीकाष्ठ भक्षण करावी लागणार होती. तो तसा पक्का आहे त्याच्या प्रतिज्ञेचा ह्याचा अनुभव ज्याना होता ते त्याच्यासाठी शुभचिंतन करत असतात रात्रभर. जर त्यात अर्जुन गेला तर कौरवांचा मोठा फायदा होणार होता व युधिष्ठीर त्याचे राज्य कसे परत मिळवणार ह्याची चिंता

कांहींना खात होती. जर आपण चांगले काम केले असेल, यज्ञात तुपाची धार लावली असेल तर सव्यसाचीला त्यात यश येणार. अशाप्रकारचे विचार त्या पांडवांच्या मनांत येत होते. त्यातच ती रात्र गेली. मध्यरात्री जनार्दनाला अर्जुनाची प्रतिज्ञा आठवते. तो दारुकाला बोलतो, "अर्जुन दुःखात आहे त्याच्या मुलाच्या जाण्याने. त्यांने त्या भरात एक प्रतिज्ञा घेतली आहे. त्याप्रमाणे तो उद्या संध्याकाळच्या आत जयद्रथाला ठार मारणार आहे. ते माहीत असल्यामुळे दुर्योधन त्याच्या सल्लागारांचा विचार निश्चितपणे घेणार. कसे पार्थाचा त्यात पाडाव करावयाचा ते त्यांच्यात ठरवले जाईल. त्यांच्या कडे अक्षौहिणी सैन्य आहे. त्यातून सगळे उत्तम योद्धे आहेत. त्याना द्रोणाचे मार्गदर्शन आहे. सहस्त्र नेत्र असलेला इंद्र त्या द्रोणाला भितो, म्हणून मी असे कांही करणार आहे, ज्यामुळे अर्जुन त्याची प्रतिज्ञा सिद्ध करील. मला सर्वात जास्त प्रिय आहे अर्जुन त्याच्यासाठी मला कांही केलेच पाहिजे कारण त्याची प्रतिज्ञा म्हणजे माझी प्रतिज्ञा असेंच आहे युगायुगात. आम्ही दोघे एकच आहोत. पृथ्वीवर अर्जुन रहाणार आहे उद्यानंतर, म्हणून अरे दारुका, मी कौरवांचे सैन्य माझ्या दिव्य शक्तीने मारून टाकत जाणार आहे उद्या. ज्यामुळे अर्जुनाला त्याचे कार्य करणे सोपे होईल. तू उद्या माझे सामर्थ्य पहा. जसे मी माझी शक्ती वापरीन असंख्य राजे व त्यांची सेना त्यांच्या हत्ती, घोड्यासकट पळून जातील रणक्षेत्र सोडून ते तुला दिसतील, त्यात कर्ण व दुर्योधन सुद्धा कदाचित असतील. माझे सुदर्शन चक्र त्यांचा बिमोड करत असलेले तू पहाशिल. त्या माझ्या किमयेमुळें सगळे राक्षस, देव, असुर, गंधर्व, सर्प आणि पिशाच्च पहातील आमची दोस्ती कशी आहे. जे त्याचे वैरी ते माझे वैरी असतात, ते जगाला उद्या समजेल. जे त्याच्याबरोबर असतात ते माझ्या बरोबर असतात हे जगाला समजेल". पुढे कृष्ण दारुकाला आदेश देतो कीं, "उद्या भल्या पहाटे माझा रथ तयार ठेव ज्यात सगळी आयुध आहेत. त्यात माझी दैवी गदा कौमोदकी असली पाहिजे. माझे शर (छोटे बाण), सुदर्शन चक्र, धनुष्य बाणांचा भाता, असे सगळे त्यात असू दे. माझ्या रथाच्या आगाशीत माझा ध्वज असेल, त्यावर गरूड असेल. सुशोभित असलेली छत्री असेल. माझे खास घोडे वलहक आणि मेघपुष्प आणि सैव्य व सुग्रीव असतील. त्याना सोन्याच्या शालीने सजव आणि तू स्वतः असला पाहिजेस. माझ्या पांचजन्य शंखाचा

मोठा आवाज ऐकल्यावर तू माझ्याकडे येशिल. त्या एका दिवसात मी माझ्या प्रिय मित्राचे शत्रू संपवणार आहे. तसे केल्याने कौरवांना अर्जुनाकडे लक्ष देणे जमणार नाही. मग तो जयद्रथाला सहजपणे मारू शकेल व त्याची प्रतिज्ञा तो खरी करेल".

दारुक बोलतो, "तुमचा दोस्त निश्चितपणे उद्या त्याची प्रतिज्ञा पूर्ण करणार आहे. ज्याचा सारथी जनार्दन तो नेहमी यशस्वी होणार हे ठरलेले आहे. माझे म्हणाल तर, आपण जे सांगितले ते सगळे व्यवस्थितपणे करणार आहे. ह्या रात्रीनंतर एक शुभ दिवस उगवणार आहे पार्थासाठी.

जयद्रथ वध पर्व भाग सत्त्याहत्तरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग अठ्ठ्याहत्तरावा

संजय पुढे सांगत असतो. अर्जुन त्याच्या कुसाच्या सय्येवर पडल्या पडल्या विचार करत असतो कीं, तो उद्याचे काम कसे करेल. त्यावेळी त्याला व्यासमुनीनी दिलेला मंत्र आठवतो. तो आठवत असतांनाच त्याला निद्रा देवता ताब्यात घेते. त्याला स्वप्न पडते त्यात त्याला कृष्ण त्याच्या गरूडधारी ध्वज असलेल्या रथात दिसतो. तो त्या स्वप्नात उठून कृष्णाचे स्वागत करत असतो. स्वप्नातच तो माधवाला बसण्यासाठी आसन देतो. मात्र तो स्वतः त्याच्या पुढे उभा रहातो. त्यानंतर महाप्रतापी कृष्ण, पार्थाची प्रतिज्ञा लक्षात घेऊन त्याला बोलतो, "माझ्या मित्रा, हि वेळ दुःख करण्याची नाही. काळ कोणालाही जिंकता येत नाही. काळ सर्व जीवांना त्याच्या मर्जीनुसार वागवत असतो. तो नियतीचा नियम आहे. सूज्ञ माणसे सुख व दुःख ह्यात आपला समय व्यर्थ घालवत नाहीत. दुःखात गेल्याने माणसाची कार्यक्षमता संपुष्टात येते. तू दुःखात जावे हांच तर तुझ्या शत्रूचा उद्देश आहे व त्यात ते कामयाब झाले असे तू लक्षात घेऊन पुढील कारवाईसाठी सज्ज हो. तुझ्या दुःखात जाण्याने तुझे मित्र सुद्धा कमजोर होतात. ते तुझ्यासाठी आजच्या परिस्थितीत चांगले नाही. दुःख वगैरे गोष्टी बायकांसाठी असतात शूरांसाठी नाही". कृष्णाचे ते शहाणपणाचे बोलणे ऐकल्यावर विभत्सू त्याला सांगतो, "मी जयद्रथाला मारण्याची घेतलेली प्रतिज्ञा खरोखरच मोठी अवघड आहे. तरीसुद्धा मी ती पूर्ण करणार आहे. माझ्या मुलाच्या मृत्यूस कारणीभूत असलेला तो नीच माणूस उद्या संध्याकाळापर्यंत यमाकडे गेला असेल. त्याला माझ्यापासून दूर ठेवण्यासाठी कौरव त्याला मागच्या आघाडीत ठेवण्याची शक्यता आहे. त्यांचे सैन्य खूप मोठे आहे. ते सगळे ठार मारणे सोपे नाही. त्या एवढ्या मोठ्या सैन्य सागरात तो नेमका कोठे लपला आहे ते कसे समजणार हा माझ्यापुढे प्रश्न आहे. जर ते हुडकणे सोपे झाले तर त्याला मारणे सोपे होईल. जर दुर्दैवाने ते त्या सबंध दिवसात मला जमले नाही तर मला अग्नीकाष्ठ भक्षण करावी लागतील हे तितकेच खरे. प्रतिज्ञा पूर्ण न करण्याने मला ते करावेच लागेल. हल्लीच्या ऋतूत सूर्य लवकर मावळतो".

अर्जुनाचे ते ऐकल्यावर कृष्ण पूर्वेकडे पहात अर्जुनाच्या हिताचे कांही बोलतो, "अरे पार्था, एक मार्ग आहे, महादेवाकडे एक असें अस्त्र आहे जे तुला ह्या कामात मदत करू शकेल. त्याचा पशुपत असें म्हणतात. त्याच्या मदतीने एके काळी महेश्वराने सगळे दैत्य मारून टाकले होते. जर ते तू शिकला आहेस तर त्याची आठवण करून पहा. त्याच्या सहाय्याने तू जयद्रथाला उद्या खात्रीने मारू शकशिल. जर तुला त्याचा विसर पडला असेल तर तू महादेवाचे स्मरण करण्यास सुरूवात कर. तू त्यांचा भक्त आहेस म्हणून ते तुला निश्चितपणे मदत करतील".
कृष्णाचे ते ऐकल्यावर धनंजय जमिनीवर बसून महादेवाचे ध्यान करण्यास सुरूवात करतो. तो ब्रह्म मुहूर्त होता. त्या स्वप्नात तो कृष्णासह आकाशातून जात होता. ते दोघे मनाच्या वेगांने हिमालयात पोहोचतात. तेथे मनिमत पहाडावर जातात. तेथे सिद्ध व चरणांच्या वस्त्या होत्या. कृष्णाने अर्जुनाचा डावा हात घरला होता. ते एक सुंदर दृष्य होते. अखेरीस ते शुभ्र पर्वताकडे जातात. त्यांना कुबेराचे नंदनवन दिसते. तेथून जाणारी गंगा नदी ते पहातात. आता ते मंदार पर्वताकडे पोहोचतात. तेथे गर्द वनश्री ते पहातात. तेथे पारदर्शक हिर्याचे खडक ते पहातात. तेथे असलेले दैवी सिंह ते पहातात. इतर दैवी पशू ते पहातात. तेथे अनेक विरक्त लोक ध्यानाला बसलेले तो पहातो. किन्नर व गंधर्वांचे सुमधून गायन त्यांना ऐकू येते. तेथे मंदार वृक्षाची वने ते पहातात. अखेरीस ते काळ नांवाच्या डोंगराकडे जातात. त्या डोंगराचा रंग सावळा होता. त्यानंतर ते ब्रह्मतुग नांवाच्या शिखराकडे जातात. त्यानंतर अनेक नद्या व डोंगर ओलांडत ते सत्शिंगी पोहोचतात. तेथे शर्यती नांवाचे वन आहे ते, ते पहातात. तेथे असलेले तीर्थक्षेत्र अश्वमुख तेथे पोहोचतात. त्या नंतर ते अथर्व प्रांतात जातात. आता ते वृशदंस पहाडाकडे जातात. तेथे अप्सरा व किन्नरांची मोठी वस्ती होती. तेथे भटकत असतांना ते तेथे असलेले कारंजे पहातात. त्या ठिकाणी सोन्याचे खडक होते. तेथे विविध प्रकारचे खनिज पदार्थ ते पहातात. अशारितीने ते आकाशातून जाताना विष्णूपद नांवाच्या तीर्थक्षेत्री येतात. कृष्णाबरोबर तो आकाशातून प्रचंड वेगाने जात होते. ते आता खाली उतरू लागतात. तेथे महादेव त्यांच्या नंदीबरोबर बसलेले होते. ते ध्यानस्थ बसलेले होते जसे नेहमी असतात. त्यांच्या अंगातून हजार सूर्याचे तेज दिसत

होते. त्याच्या डोक्यावर शुभ्र रंगाच्या जटा दिसत होत्या. त्यांच्या एका हातात त्रिशूळ होते. त्यांच्या भोवती असंख्य विविध प्रकारचे प्राणी वावरत होते. ते विविध प्रकारची वाद्ये वाजवत होती. ते विचित्र दिसणारे प्राणी हसत व नांचत गात आनंदात दिसत होती. तेथे एक विलक्षण सुगंध दरवळत होता. ऋषी व ब्रह्म स्वतः तेथे महादेवाची स्तुती करत होते. त्यामध्ये ते त्याची स्तुती करतात कीं, तो सर्व प्राणिमात्रांचा तारक आहे, त्याच्या हातात पिनाक धनुष्य आहे, वगैरे. कृष्ण व अर्जुन तेथे उतरतात. महादेवाला वंदन करतात. ते वेदातील शंकराची स्तुती करणारी कवन गातात. त्या स्वयंभूचे ते दर्शन घेतात ज्याला कोणी उत्पन्न केल नाही. जो स्वताच्या विचाराने उत्पन्न होतो व नष्टसुद्धा होतो अशाप्रकारची त्याची स्तुती ते करतात. ज्याच्या मधून विचार तत्त्व आणि रचना तत्त्व उत्पन्न झाली ज्यातून जड सृष्टी त्यानी निर्माण केली असे ते त्याची स्तुती करतात. त्याने देव (सकारात्मक अध्यात्मिक उर्जा,+)व दैत्य दानव (नकारात्मक अध्यात्मिक उर्जा,-) असे उत्पन्न केले ज्याच्या मदतीने तो ही सृष्टी चालवत आहे. जे अंतीम ब्रह्म आहे. त्याच्याप्रेरणेने पाऊस पडतो. ज्याच्या इच्छेने पहिला प्राणी उत्पन्न झाला. ज्याने विविध कामांसाठी यक्ष आणि माणूस उत्पन्न केला आहेत. तो सृष्टी सुरू करतो व युगांती संपवतो सुद्धा. सगळ्या उत्तम गुणांचे (+) व वाईट गुणांचे (-) उगमस्थान आहे. अशा भवाकडून कृष्ण संरक्षण मागत होता. ज्याच्या मदतीने ते सुक्ष्म व तरल तत्त्व आहे ते प्राप्त होते. तो स्वयंभू सगळ्या असलेल्या व नसलेल्याचे मूळ आहे, त्याला वंदन ते करतात. अशाप्रकारे त्याची स्तुती करत धनंजय प्रार्थना करत असतो. जो भूत, वर्तमान आणि भविष्य ठरवत असतो. ते अशाप्रकारे शिवाची स्तुती करत असतांना महादेव डोळे उघडून त्या नर व नारायणाच्या जोडीला पहातात. महादेव आनंदीत होऊन त्यांचे स्वागत करतात. "अहो पुरूष द्वयांनो, आपले स्वागत असो". असें ते त्यांना उद्देशून बोलतात. "उठा म्हणजे आपला थकवा दूर होईल", असे ते त्यांना बोलतात, "आपल्याला काय इच्छा झाली म्हणून माझ्याकडे आलात ते सांगा". "मी तुमची इच्छा पूर्ण करीन कारण तुम्ही माझ्या कामासाठीच पृथ्वीवर गेला अहात".

दोघे नर व नारायण उठतात व त्या आदिदेवाची स्तुती करू लागतात. ते पुढे बोलतात, "आम्ही भवाला, सर्वला आणि रुद्रांना नमन करतो".
ज्याला कपर्दीन म्हणतात त्या भयंकर महाशक्तीला आमचा नमस्कार असो, जो त्रिनेत्राने सगळे पहात असतो. त्या ईशाला आमचा नमस्कार असो. दक्षाचा यज्ञ संपवणारा, अंधकांचा नाश करणारा, कुमाराचा पिता, ज्याला निळा कंठ आहे, जो सगळे उत्पन्न करतो व नष्ट सुद्धा करतो अशा महादेवाला आमचा नमस्कार असो. जो सर्वव्यापक आहे, जो सत्त्य आहे, जो अजिंक्य आहे, ज्याच्या केसाच्या जटा निळ्या आहेत, ज्याच्या हातात त्रिशंकू आहे, ज्याच्या दुसर्या हातात पिनाक आहे, ज्याला दैवी दृष्टी आहे, जो होत्री आहे, जो त्याच्या शरणागतांचे संरक्षण करतो, जो सगळे चांगले व वाईट निर्माण करतो, ज्याचे वर्णन करणे अशक्य आहे, जो अंबिकेचा धनी आहे, ज्याचे चिन्ह आहे वृषभ, जो ब्रह्मचर्याची देवता आहे, जो ह्या विश्वाच्या बाहेरसुद्धा आहे, अशा आमच्या महादेवाला आम्ही नमन करतो. तुला ब्रह्मचक्र म्हणतात, तुला सर्व म्हणतात, तुला शंकर म्हणतात, तुला शीव म्हणतात. आम्ही तुला नमन करतो ज्याला हजार हात आहेत व तितकेच नेत्र आहेत. तुलाच मृत्यू म्हणून सुद्धा सगळे ओळखतात. ज्याच्या कार्याची कोणालाही कधी गणती करता येणार नाही अशा तुला आमचा नमस्कार असो. तुझ्या कृपेने आमचे उद्दीष्ट सफल हो अशी प्रार्थना करतो. असे बोलून ते दोघे नर व नारायण शंकरापुढे हात जोडून उभे रहातात.
संजय पुढे सांगतो, अशारितीने शंकाराची स्तुती करून ते दोघे वासुदेव आणि अर्जुन त्यांची इच्छा पशुपत अस्त्र मिळवण्याची आहे ते सांगून टाकतात.
जयद्रथ वध पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकोणऐंशीवा

संजय पुढे सांगतो, तेथे गेल्यावर (स्वप्नात) अर्जुनाला फार आनंद होतो तो डोळे विस्फारून त्या महादेवाकडे विस्मय चकित असा पहात रहातो. त्याचा नंदीसुद्धा पहात रहातो. ज्या नंदीमध्ये शंकराची सगळी शक्ती एकवटलेली असते. त्याला दिसते कीं, दररोज जे प्रसादाचे खाणे तो कृष्णाला देत असे ते सगळे त्या महादेवाच्या बाजूला ठेवलेले आहे. पंडुचा मुलगा मनोभावे दोघांना वंदन करुन बोलतो, "मला आपले दैवी अस्त्रं पशुपत पाहिजे म्हणून मी कृष्णाबरोबर आलो आहे". ते ऐकल्यावर स्मित करत तो महादेव अर्जुन व कृष्णाकडे पहात बोलतो, "तुमचे नेहमीच स्वागत आहे माझ्याकडे. मला तुझ्या इच्छेची कल्पना आहे. कशासाठी ते तुला पाहिजे तेसुद्धा मला माहित आहे. मी ते तुला देणार आहे. तेथे एक दैवी सरोवर आहे त्यात भरपूर अमृत भरलेले आहे. येथून फार लांब नाही. तेथे माझे धनुष्य व बाण ठेवलेले आहेत. त्यांचा उपयोग करून मी देवांच्या शत्रूना मारत असतो. अरे कृष्णा, तो तिरकमटा माझ्याकडे घेऊन ये". ते शिवाचे ऐकून वासुदेव आणि अर्जुन बोलतात, तथास्तू, त्यानंतर शिवाच्या गणांबरोबर ते त्या तलावाकडे जातात. त्या तलावात शेकडो दैवी चमत्कारीक गोष्टी होत्या. त्याच्या कृपेने जे हवे जे मिळू शकत होते. तेथे गेल्यावर त्यांना त्या सरोवरात एक भयंकर नाग बसलेला दिसतो. त्याशिवाय आणखीन एक नाग ज्याला हजार फणे होते. त्याच्या भोवती तेजोवलय होते. ते दोघे न घाबरता एकमेकांचा हात पकडून त्या पाण्यात उतरतात. ते वेदातील रुद्राची स्तुती करणार्या ऋचा मोठ्यामोठ्याने बोलत त्या पाण्यात उतरत असतात. त्यांच्या कडून होत असलेली भवाची स्तुती ऐकल्यावर ते नाग त्यांचे रुप बदलतात. ते धनुष्य व बाणाचे रुप घेतात. ते त्यांना घेतात. त्यांतून तेज बाहेर येत होते. ते शंकराकडे जातात व त्याला ते देतात. त्यानंतर शिवाच्या एका बाजूतून एक ब्रह्मचारी बाहेर येतो ज्याचे डोळे तांबूस होते. तो साक्षात वैराग्य होता. त्याचा कंठ नीळा होता व तो महाशक्तीमान होता. त्याने तो तिरकमटा घेतला व त्याला बाण लावला, तो धनुष्याचा दोर खेचू लागला. त्याच ते करणे व त्याच वेळी भव मंत्रोच्चार

करत होते, ते ऐकून अर्जुन ते तंत्र शिकतो क्षणात. त्यानंतर तो ब्रह्मचारी ते धनुष्य व बाण पाण्यात टाकून देतो व स्वतः पुन्हा भवाच्या अंगात शिरतो. अर्जुन ते मंत्र व ती विद्या आता शिकलेला असतो. त्याला शंकराकडून पशुपत अस्त्र मिळाले असते. महादेव त्याला आशिर्वाद देतात कीं, त्याची प्रतिज्ञा सफल होईल. अर्जुन समजतो कीं, त्याचा उद्देश साध्य झाला आहे. त्यानंतर अर्जुन व कृष्ण महादेवाला वाकून नमस्कार करतात. शंकराच्या परवानगीने ते दोघे त्यांच्या ठिकाणी येतात. त्यांचा आनंद तसा होता जसा इंद्राला व विष्णूला झाला होता जेव्हां महादेवाने त्याना असुर जंभाला मारण्याची परवानगी दिली होती. असे स्वप्न अर्जुनाला त्या रात्री पडते.

जयद्रथ वध पर्व भाग एकोणऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग ऐंशीवा

संजय पुढे सांगतो, कृष्णाच्या तंबूत तो व दारुक बोलत होते ती रात्र संपली व सकाळ झाली. राजा युधिष्ठीर त्याच्या बिछान्यातून उठतो. त्याच्यासाठी पनिश्वनिक, मगध, मधूपर्कीका आणि सुत असे त्याचे भाट त्याच्या स्तुतीची कवने गात होते, नर्तक व नर्तिका नांच करू लागले होते आणि त्यांच्या गोड आवाजात गाणी गाऊ लागले. उत्तम वाद्यवृंद त्यांची वाद्ये वाजवू लागले होते. त्यांची वाद्ये जसे मृदूंग, झरझरा, भेरी, पनवा, अंनका, गोमुखा, अदमवर्स आणि शंखू ते वाजवत होते. त्यांच्या आवाजाने आसमंत दणाणून गेले होते. त्या आवाजामुळे राजा उठतो. त्यानंतर तो प्रातर्विधी करण्यासाठी जातो. त्यानंतर शंभर सेवक शुभ्र वस्त्र नेसलेले भरलेली सोन्याची पात्र घेऊन त्याच्याकडे जातात. युधिष्ठीर त्याच्या आसनावर पातळ वस्त्रात बसला होता. त्याचे स्नान विविध सुगंधी द्रव्याने तयार व मंत्रीने शुद्ध केलेल्या पाण्याने झाले होते. त्यानंतर त्याचे अंग मजबूत पेहेलवान चांगले मर्दन करत होते. त्यासाठी विविध औषधी वापरल्या जात होत्या. त्यानंतर तो अधिवश जलाने आणखीन एकदा तो स्नान करतो. त्यानंतर एक मोठ्या पनाच्या शुभ्र वस्त्रांने तो त्याचे मस्तक गुंडाळतो ज्यामुळे त्याते पाणी शोषले जाते. त्यानंतर त्याच्या सर्वांगाला चंदनाची उटी लावली जाते. त्यावेळी तो पूर्वकडे तोंड करून बसलेला असतो. तो दोनही हात जोडून नमस्काराच्या मुद्रेत मनाने देवांची प्रार्थना करू लागतो. ती प्राथमिक प्रार्थना झाल्यानंतर तो तेथून उठतो व दुसर्या दालनात जातो. तेथे तो पवित्र अग्नीची पुजा करतो. त्याला तुपाचे अर्घ्य वाहतो. कांहीं संमीधा त्या पवित्र अग्नीमध्ये मंत्रोच्चारासह देतो. तेथून बाहेर येतो व आणखीन दुसर्या दालनात जातो. तेथे बसलेल्या वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणांची पुजा करतो व त्याच्या कडून कांहीं उचीत वेदोच्चार करवून घेतो ज्यामुळे त्यांना युद्धात यश मिळेल. ते हजारो ब्राह्मण होते. त्याशिवाय आणखीन आठ हजार दुसरे ब्राह्मण त्याच योग्यतेचे तेसुद्धा युधिष्ठीरासाठी प्रार्थना करतात विधात्याकडे कीं त्याला युद्धात यश मिळो व कांहीं विघ्न न येवो अशी ते प्रर्थना करतात. त्यांना राजा मोठी दानं करतो. त्याना दही, मध लोणी असा प्रसाद दिला जातो. सोन्याचे

नाणे दक्षिणा म्हणून दिले जाते. त्याशिवाय सजवलेले घोडे दान केले जातात. उंची वस्त्र दिली जातात. दुभत्या गाई दान केल्या जातात. त्यानंतर तो राजा त्या गायांना प्रदक्षिणा करतो व त्यांचे दान पूर्ण होते. त्यानंतर तो स्वस्तिकाला स्पर्श करतो ज्याच्यामुळे यश मिळते असे समजतात. सोन्याचे नंद्यावर्त, फुलाचे हार, जल कलश, पवित्र अग्नी, हंडाभर तांदळाच्या अक्षता, असे शुभशकूनी पदार्थ व गोमुत्रापासून बनवलेले गोरोचन, दही, मध व तुपाचे हंडे, पवित्र पक्षी व अशाच बर्याच पवित्र गोष्टी घेऊन तो कुंतीपुत्र बाहेरच्या दालनात जातो. तेथे मौल्यवान सोन्याच्या अर्धचक्राकार आसनात तो जाऊन बसतो. त्या आसनावर अनेक रत्न जडीत गालीचे होते. ते खास कारागिराने बनवलेले होते. त्यानंतर त्याचे सेवक त्याचे दररोज घालावयाचे दागिने आणतात व तो ते नेसतो. त्यानंतर त्याचे सेवक त्याला चावरीच्या पंख्याने वारा घालू लागतात. तो फारच तेजस्वी दिसत होता. त्याचे भाट त्याची स्तुती करू लागतात. त्याच्या मनोरंजनासाठी ते होत असते. भाट जोरांनी गात असतांनाच रथाचा आवाज येतो व त्यातून कृष्ण त्याच्या सारथ्या बरोबर त्या दरबारात येतो. त्याशिवाय इतर राजे त्यांच्या जामानिम्यासह तेथे येतात, त्यामुळे मोठा आवाज होतो. द्वारपाल पहातात कीं, चिलखत घालून तयार असा कृष्ण तेथे येत असतो. तो आतील कक्षात जातो. तो खाली वाकून राजाला वंदन करतो. तो हृषिकेश उभा असतो. राजा सेवकांना सांगतो कीं, कृष्णासाठी एक उच्च प्रकारचे आसन तयार करावे व अर्घ्य तयार ठेवावे. तो सोपस्कार पूर्ण झाल्यावर युधिष्ठीर कृष्णाला स्वागताचे बोलतो.

जयद्रथ वध पर्व भाग ऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एक्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीर कृष्णाला नमन करतो आणि आनंदाने विचारतो, "रात्र कशी गेली? आपले ह्या युद्धाबद्दलचे विचार कसे आहेत ते मला सांगा". कृष्ण सुद्धा त्या प्रकारच्या चौकशा रिवाजीनुसार करतो. ते बोलत असतांना सेवक येतो व सांगतो कीं, बाहेर इतर राजे आपल्याला भेटण्यास आले आहेत. त्यानंतर सगळे पांडवांचे दोस्त राजे रजवाडे आत येतात. त्यात विराट, सत्यकी, भिमसेन, धृष्टद्युम्न, धृष्टकेतू, छेड्डीचा राजा, द्रुपद, शिखंडी, नकुल व सहदेव, युयुत्सू, उत्तमौजस, युधमन्यू, सुवाहू, द्रौपदीची पांच मुलं असे सगळे व आणखीन कांही क्षत्रिय तेथे हजर होतात. ते सगळे आपापल्या आसनांवर जाऊन बसतात. कृष्ण व युयुधन एकाच आसनावर बसलेले होते. सगळ्यांचे यथोचित स्वागत झाल्यानंतर युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, "तुझ्यावर अवलंबून आम्ही यशाची अपेक्षा करत आहोत. ह्याची आपल्याला कल्पना आहेच. तुला आधीचे सगळे माहीत आहेच. कसे आम्ही आमच्या राज्याला मुकलो वगैरे पुन्हा सांगावयाची आवश्यकता नाही. त्यात आम्ही कशाप्रकारे हालअपेष्टा सहन केल्या ते तुला वेगळे सांगावयाची गरज नाही. आमचे सगळे तुझ्या कृपेवर आहे. असें करत जा ज्या कारणाने आम्हाला सुखाचे दिवस येतील". आता अर्जुनाने प्रतिज्ञा घेतली आहे ते एक नवीन अरिष्ठ पांडवांपुढे उभे झाले आहे, त्यातून सुद्धा तूच मार्ग काढशिल असें मी समजतो. आपण आमची नाव अहात ज्यातून मी व माझे बंधू सुखरुप भवसारगातून निवांतपणे जाऊ शकू. अरे कृष्णा, सारथी बरेच कांहीं करू शकतो जर तो सावध असेल, त्याप्रमाणे, तू अर्जुनाचा सारथी म्हणून त्याला मदत करावी असे मी सांगू इच्छितो. तू जसे वृश्नींना नेहमी वाचवतोस, तसे आम्हालासुद्धा वाचवावे ह्या प्रतिज्ञेच्या वेळी अशी मी तुला विनंती करत आहे. तू शंखधारी, सुदर्शन चक्रधारी, गदाधारी, आम्हा पांडवांना वाचव अशी मी तुला प्रार्थना करतो. मी तुला वंदन करतो. अरे माझ्या देवा, नारद सांगतात कीं, तू प्राचीन काळातील ऋषी नारायण आहेस. तू जो वर देतोस तो खरा होतो. तसे आता तू करावे. अशी मी तुला विनंती करत आहे".

अशारितीने तो पांडव त्या राजांसमक्ष कृष्णाला विनंती करतो. ते ऐकल्यावर कृष्ण गंभीरपणे त्या सभेत सांगतो, "सगळ्या जगात धनंजयासारखा तिरंदाज झालेला नाही. त्याचे सामर्थ्य अफाट आहे. ते त्यांने अनेक युद्धांतून सिद्ध केले आहे. तो त्याच्या शत्रूंचा नाश करण्यात समर्थ आहे. माझे बोलाल तर, मी असे सगळे करणार आहे जे अर्जुनाला पाहिजे. तो आज धृतराष्ट्राचे मोठे सैन्य ठार मारणार आहे. आज त्याचा बाण त्या नराधमाला, ज्याच्या मुळें अभिमन्यू मारला गेला, ठार मारणार आहे हे निश्चित समजावे. आज रात्री त्याचे शरीर गिधाडं, लांडगे खात असतील. जरी सगळे देव इंद्रासह त्याला वाचवायला आले तरी तो वाचणार नाही. तो यमाच्या दारी जाणार ह्याबद्दल खात्री बाळगा. आज संध्याकाळी जिश्नु ते सांगावयाला अभिमन्यूच्या आईला भेटणार आहे. म्हणून उगाच चिंता करत बसू नका. अरे राजा तुझे कल्याण हो".

जयद्रथ वध पर्व भाग एक्याऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग ब्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, अशा रितीने ते बोलत असतांना धनंजय त्या सभेत येतो. तो आल्याबरोबर सगळ्या दोस्त क्षत्रियांना वंदन करतो. युधिष्ठीर त्याच्या आसनावरून उठतो व अर्जुनाला आलिंगन देतो. त्याचा माथा हुंगतो. बोलतो, मला खात्री आहे कीं, विजय आपलाच आहे. तुझ्या वागण्यावरून व जनार्दनाने जे तुझ्याबद्दल सांगितले त्यावरून माझी खात्री झाली आहे. त्यानंतर धनंजय त्याची व त्रिनेत्रची झालेली भेट तेथे असलेल्या सगळ्यांना सांगतो. ते ऐकून सगळे नवल करतात. ते सगळे "उत्तम, उत्तम", असे उद्‌गारतात. त्यानंतर ती सभा संपते व ते सगळे योद्धे युद्धासाठी निघतात. रणभेरी वाजू लागतात. त्याच वेळी कौरवांच्या रणवाद्यांचा सुद्धा आवाज ऐकू येऊ लागतो. युधिष्ठीर अर्जुनाच्या दालनाकडे निघतात त्याचाच गाडीने. तेथे हृषिकेश त्यांच्या रथाची जोडणी करू लागतो. तो सोन्यासारखा चमकणारा रथ युद्ध भूमीसाठी सज्ज होत असतो. अर्जुन त्याची सकाळची प्रार्थना करत असतांना कृष्ण त्याला सांगतो कीं त्यांचा रथ सज्ज आहे. त्यानंतर दैवी मुकूट घातलेला अर्जुन लढण्यासाठी तयार होतो. त्याच्या रथाला तो एक प्रदक्षिणा घालतो. यशासाठीच्या प्रार्थना होतात. इतर धार्मिक विधी होतात. मनाच्या पूर्ण तयारीने तो पांडव रथात चढतो. तो रथ मंत्राने शुद्ध केलेला होता. शर्यतीच्या यज्ञासाठी जसे अश्विन इंद्रासह रथात चढले होते तसे अर्जुन व युयुधन कृष्णाबरोबर त्याच्या रथात चढतात ज्याच्या ध्वजावर कपीमुद्रा विराजमान होती. गोविद सारथ्य करू लागतो. पूर्ण तयारीने तो त्यान दिवसाच्या उद्देशासाठी म्हणजे जयद्रथाच्या वधासाठी रणभूमीवर निघतो. जसे इंद्र वरुणाला घेऊन असुरांचा नाश करण्यासाठी निघाला होता जेव्हां बृहस्पतीची बायको तारकाला असुराने पळवले होते, तिला मुक्त करण्यासाठी, असे फार प्राचीन काळी झाले होते. अर्जुन जात असतांना भाट गाणी गाऊन त्याचे कौतुक करत होते. पार्थ जात असतांना एक सुगंधी झुळूक पार्थाच्या मागून गेली व त्यातील परिमळाने त्याला आनंद वाटला. त्याच वेळी इतर शुभ शकून होतात. त्याचा अर्थ पार्थाला त्याच्या कामात यश येणार असें दिसत होते. ते

शुभशकून पाहून अर्जुन युयुधनाला बोलतो, "आजच्या युद्धात माझा विजय निश्चित होणार हे दिसत आहे. म्हणून मी जास्त वेळ न दवडता जयद्रथाकडेच प्रथम जाऊ इच्छितो. त्याला माझी ताकद दाखवतो व यमाकडे पाठवून देतो. जयद्रथाचा वध हा माझा आजचा मुख्य उद्देश असला तरी युधिष्ठीराचे संरक्षण सुद्धा मला करावयाचे आहे. अर्जुन युयुधनाला बोलतो कीं, त्याच्या मते धनंजयाच्या योग्येचा धनुर्धारी तो आहे ह्या जगात. तेव्हां तो व प्रद्युम्न ह्यांच्यावर युधिष्ठीराची जबाबदारी टाकून तो जयद्रथाच्या मागे जाणे श्रेयस्कर समजतो. तुम्ही दोघे राजाचे संरक्षण करत रहा. जयद्रथाचा वध केल्या नंतर मी तुम्हाला येऊन मिळणार आहे. जेथे आम्ही दोघे आहोत तेथे कोणताही धोका असणार नाही. त्यावर सत्यकी तथास्तु, असे बोलतो. त्यानंतर ते दोघे युधिष्ठीराच्या कडे जातात.

जयद्रथ वध पर्व भाग ब्यांऐशीवा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग त्र्याऐंशीवा

धृतराष्ट्र विचारतो, "अभिमन्यूच्या वधानंतर दुसर्या दिवशी दुःखात चूर असलेले पांडव काय करतात. माझ्या सैन्यातील कोण त्यांच्याशी लढले"? मला सांग संजया, एवढे घोर कृत्य केल्यानंतर माझा मुलगा बेडरपणे कसा वागत होता. ते युद्धात सव्यसाचीला कसे सामोरी जातात जेव्हां तो मुलाच्या दुःखाने संतापलेला असतांना माझ्या मुलांना आव्हान देतो. त्याच्या पुढे माझे योद्धे कसे लढतात ते मला सांग. दुर्योधनाला काय झाले आहे कीं, आमच्या घरातील एक होनहार मुलगा अशारितीने मरतो. माझ्या मनातून आनंद नाहीसा झाला आहे. त्या सुरेल धुनी ज्या कानाला आनंद देत असत व त्या जयद्रथाच्या तंबूतून येत असतं त्या आज ऐकावययाला कां येत नाहीत? माझ्या तळातील भाट त्यांचे गाणे कां वाजवत नाहीत? पुर्वी ते आवाज मला सतत ऐकावयाला यावयाचे ते आज कांनाही येत? ते जयद्रथाच्या होणार्या वधाच्या धास्तीन गप्प झाले आहेत कां? सगळे सामसुम का आहे? आज माझ्या मुलांच्या घरातून दुःखाच्या रुदनाचे आवाज कां येत आहेत? माझी मुलं विविंसती, दुर्मुख, चित्रसेन, विकर्ण आणि इतर त्यांच्या घरात सुतकी वातावरण कां झाले आहे? द्रोणांचा मुलगा त्याच्या शिष्यांना ज्यात ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य आहेत ते आज शांत कां आहेत. त्यांचा नेहमीचा उत्साह कोठे गेला त्याच्या आश्रमातून येणारे सुमधूर ध्वनी कोठे गायब झाले? त्या अंवतीच्या विंद व अनुविंदांच्या तळातून येणारे आनंद व्यक्त करणारे मोठे आवाज आज कां ऐकू येत नाहीत मला? कैकेयांच्या तळातून नेहमी येणारे गाण्याचे आवाच व त्याबरोबर टाळ्यांचे आवाज आज कां ऐकू येत नाहीत? सोमदत्ताच्या पुरोहितांच्या पुजेचा मोठा आवाज जो नेहमी मला ऐकावयाला मिळतो तो आज कां नाही येत? द्रोणांच्या तळातून येणारे धनुष्याच्या टणत्काराचे आवाज व वेदांचे उद्घोष आज का बंद झाले आहेत"? माझ्या लोकांतील जो उत्साह ज्यामुळें ते गाणी बजावणी करत असतात तो आज एकदम कसा गायब झाला ते मला सांग संजया. अरे संजया, जेव्हां जनार्दन उपप्लव्याकडून शांततेची बोलणी करण्यासाठी आला होता तेव्हां मी दुर्योधनाला सांगितले होते कीं, ही चांगली संधी आहे

सलोखा करण्यासाठी तेव्हां त्याने कृष्णाबरोबर सलोखा करावयाला पाहिजे. परंतु, त्या नालायक मुलांने माझे ऐकले नाही. पांडवाच्या विरुद्ध कौरव कधीच जिंकू शकणार नाहीत कारण त्यांच्या बरोबर माधव आहे, आणि जेथे माधव तेथे विजय असतो असें मी त्याला परोपरीने सांगत होतो परंतु, तो ऐकावयाला तयार नव्हता. त्याच्या दुर्बुद्धीने त्यांने दुर्दैवाचा हा मार्ग (युद्धाचा) स्वतावर ओढून घेतला आहे. माझा सल्ला धुडकावून त्या मूर्खाने दुःशासन व कर्णांचे ऐकले. मला स्वतःला तो द्युताचा खेळ अजिबात आवडला नाही पण अरे संजया, माझी मुलं माझे ऐकत नाहीत काय करू. ते माझा अव्यक्तपणे उपमर्द करतात कारण काय तर मी अंध आहे. विदूराने सुद्धा त्या खेळाला विरोध केला होता परंतु, त्यालासुद्धा ते मानत नव्हते. एवढेच नाही तर भिष्म, सल्य, भुरिश्वर, पुरुमित्र, जय, अश्वत्थामा, कृप आणि द्रोण अशा सगळ्या ज्येष्ठानी त्या खेळाबद्दल नाराजी दाखवली होती पण दुर्योधन त्या खेळासाठी हट्टास पेटला होता. जर माझी मुलं त्या वडीलधार्यांचे ऐकते तर आज हे युद्ध झालेच नसते व सगळे कुरु वंशी आनंदाने एकमेकांच्या सुखाचा विचार करत राहू शकले असते. पण भाग्यात कांहीं वेगळेच होते. जे लोक चांगुलपणा वाढवण्याचा प्रयत्न करतात ते नेहमी सुखी होतात व इतरांना सुखी करतात. असा माणूस त्याच्या मृत्यूनंतर त्या सुखदायक लोकात जातो जेथे फक्त आनंद मिळतो. पंडुच्या मुलांचे सामर्थ्य पहाता ते अर्ध्या पृथ्वीचे धनी होण्यास योग्य आहेत. पांडव कधीच चांगुलपणाचा मार्ग सोडणार नाहीत. आपल्यामध्ये असे आप्त आहेत ज्यांचे पांडव ऐकण्यास तयार होतील त्यात सोमदत्त, सल्य, भिष्म, द्रोण, विकर्ण, वल्हीक, कृप व इतर कांहीं आहेत. जर ते पांडवांशी सलोख्याचे बोलतात तर पांडव त्यांचे जरूर ऐकते. कृष्ण नेहमी चांगुलपणाचा मार्ग आचरणारा आहे. पांडव त्याचे ऐकणारे आहेत, माझेसुद्धा ते ऐकण्यास तयार असतात, फार गुणी आहेत ते सगळे पांच भाऊ. दुःख ह्याचे आहे कीं माझाच नाणे खोटे आहे. कधी मला वाटते हा काळाचा महीमा आहे. वृकोदर, अर्जुन, वृश्नीचा सत्यकी, पांचालांचा उत्तमौजस, युधमन्यू, धृष्टद्युम्न, शिखंडी, अस्मक, कैकया बंधू, क्षात्रदमन, सोमक, छेड्डी, काशी नरेशा विभू, द्रौपदीची मुलं, विराट, द्रुपद राजा, नकुल व सहदेव आणि मधू दैत्याचा नाश करणारा माधव सल्ला देण्यासाठी आहेत. त्या बलाढ्य

लोकांशी कोण लढणार आहे? एक दुर्योधन कर्ण, दुःशासन, शकूनी हे सोडले तर माझ्या मुलाकडे असे कोण आहेत जे पांडवांना हरवू शकतील? ज्याचा सारथी साक्षात विष्णू आहे त्याला कोण हरवू शकेल"? त्यातून भिष्म मेला आहे. विदूराने जे भाकित वर्तवले होते ते खरे होणार असें दिसते. त्यामुळे असेल कदाचित माझी मुलं आता शोक सागरात बुडली आहेत. धनंजय माझी सेना जाळून टाकील जसे वणवा सगळे जंगल जाळून टाकतो. अरे संजया, तू वार्ता सांगण्यात चांगला आहेस तुझे सांगणे मला फार आवडते. म्हणून मला ते सगळे सांग जे घडले अभिम्नयूच्या वधानंतर. पुढे काय झाले, दुर्योधन व कर्ण काय ठरवतात"? दुःशासन व शकूनी काय करतात, त्या युद्धात माझे सगळे पुत्र मरणार आहेत हे निश्चित. त्या नालायक मुलाच्या आग्रहामुळें व माझी इतर मुलं त्याच्या निर्णयावर जास्त विश्वास ठेवतात त्यामुळे हे सगळे घडत आहे. त्यांना अजून वाटते कीं, ते पांडवांना हरवून त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध करू शकतील. कोण किती मूर्ख आहे व कोणाचा विवेक नष्ट झाला आहे ते मला तू सांग. त्या परिस्थितीत दुर्योधन कोणता निर्णय घेतो ते मला सांग. त्याचे निर्णय शहाणपणाला धरून होते कां कसे ते तू मला तुझ्या मते काय ते सांग.

जयद्रथ वध पर्व भाग त्र्याऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व
## भाग चौर्यांऐशीवा

संजय पुढे सांगतो, मी आपल्याला ते सगळे सविस्तार सांगणार आहे. कारण, ते सगळे मी माझ्या डोळ्याने पाहिलेले आहे. म्हणून ते शांतपणे नीट ऐका. आपला दोष आहे कारण पाणी वाहून गेल्यानंतर बंधारा दुरुस्त करण्यात कांहींच उपयोग नसतो. आता होऊन गेलेल्या गोष्टींवर मत प्रदर्शन करण्यात काय मिळणार आहे"? अहो भरत वंशाच्या राजा, आता दुःख करण्यात समय घालवू नये. यमाचे कार्य कौतुकास्पद आहे. त्याला कोणी तोडू शकत नाही. म्हणून आता शोक करण्यात वेळ वाया घालवू नका. जे घडणार ते पहाण्याची ही वेळ आहे. जुन्या होऊन गेलेल्या गोष्टी बोलून काय मिळणार आहे? त्यावेळी जर तुम्ही युधिष्ठीराला द्युत खेळण्याची आज्ञा केली नसती तर हे घडलेच नसते. तुमच्या मुलाच्या बातामध्ये तुम्ही गुतला होता, तो मोह तुम्हाला आज भोवत आहे. म्हणून जे आज घडत आहे त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलीच आहे हे विसरू नका. जेव्हां तुमचा मुलगा युद्ध करण्याचा निर्णय सांगत होता, तेव्हा एक सार्वभौम राजा म्हणून ते तुम्ही नाकारू शकला असता पण ते तुम्ही केले नाही कारण तुम्हाला मोह झाला होता कीं, कदाचित तुमची मुलं पांडवांना हरवू शकतील. त्या अंध मोहाचा आज आपण परिणाम पहात आहोत. म्हणजे जे आज घडत आहे ते तुमच्या मोहदोषामुळे घडत आहे ते लक्षात घ्या. आपण आपले घरातील ज्येष्ठ म्हणून जे कर्तव्य असते ते योग्य रित्या पार पाडले असते तर हि वेळ आली नसती. तुम्ही तुमच्या मुलांना कधी सुधारण्यास सांगितले नाही, त्यांच्या कुकर्माला झाकण घालण्याचे काम केले, त्याचा हा परिणाम आहे. आपण कर्णाचा, दुःशासनाचा, दुर्योधनांचा व शकूनीचा सल्ला का घेत होता व त्यांच्या खोट्या बातात कां फसत होता ते बोला. ते जर आपण केले नसते व त्यांना वेळीच चाप लावला असता तर हे घडलेच नसते. आपण फार सूज्ञ अहात असे असूनही आपण दुर्योधनाच्या गोष्टींत कसे आलात"? म्हणून आपले आताचे पश्चात्तापाचे नाटक मला फसवू शकणार नाही. सूज्ञ लोक अशा बाताने फसत नसतात. सुरूवातीला कृष्ण युधिष्ठीर व इतर पांडवांना तेवढा भाव देत नव्हता जेवढा तो

आपल्याला देत होता परंतु, तुमच्या ह्या अशा वागण्यामुळे तोसुद्धा तुमच्या विरुद्ध झाला आहे व पांडवांकडे खेचला गेला आहे कारण तो शुद्ध बुद्धीने वागणारा आहे. त्याला समजले आहे कीं, आपण अशुद्ध बुद्धीने वागत अहात. तुमची मुलं पार्थाच्या मुलांना घालून पाडून बोलत होते तेव्हां त्याना चाप आपण कां नाही लावला? कां तुम्ही ते गुपचुप ऐकून घेत होतात? अहो महाराज, भोळेपणाचे सोग बनण्याने सूज्ञ लोक फसत नाहीत. मांजर जरी डोळे मिटून दूध चोरून पित असली तरी इतर डोळे उघडे ठेवून ते पहात असतात असे शहणे लोक सांगतात ते खरे आहे. त्या तुमच्या उत्तेजनामुळे दुर्योधन माजला व आताचे युद्ध त्यांनी सगळ्यांवर लादले आहे. त्यात त्याच्यासकट तुमची सगळी मुलं मरणार आहेत. ज्या राज्यासाठी हे सगळे होत आहे तेसुद्धा तुमच्या हातून जाणार असे मला दिसत आहे. लवकरच युधिष्ठीर पृथ्वीचा नरेश होणार आहे असे दिसत आहे. काय मिळवले दुर्योधनाने हे कांड करून ते पहा. आपण जाणता अहात कीं, कुरुंचे साम्राज्य पंडुने वाढवले परंतु, नंतर तो संन्यास घेऊन गेला. म्हणून ते तुम्हाला आयते मिळाले. हे सगळे जग जाणते. त्यानंतर पंडुच्या निधनानंतर त्याची मुलं हस्तीनापुरात आली तेव्हां पासून तुम्हाला ते नकोसे होते व तुम्हीच तुमच्या मुलांत पंडुच्या मुलांबद्दल घृणेचे बीज पेरले ते सगळ्या धूर्त लोकांना माहीत आहे. दुर्योधनाचे वागणे तुमच्याच विचारांचा परिपाक आहे हे शहाणे लोक जाणातात. आता रडून काय उपयोग. जेव्हां युद्ध प्रारंभ झाले तुम्ही तुमच्या मुलांचे दोष झाकण्याचा सतत प्रयत्न करत अहात. असे कुलीन क्षत्रिय वागत नाहीत. क्षत्रिय जीवाची पर्वा न करता लढत असतात. तुम्ही तुमच्या मुलांना बाजूला करून इतरांना लढण्यास जाण्यासाठी सांगता, हे कोणत्या क्षात्रधर्मात दिले आहे"? आता ऐका महाराज, पांडव आणि कौरवांच्या युद्धाची कथा जी मी स्वतः पाहिली आहे ह्या माझ्या दैवी डोळ्यांनी.

जयद्रथ वध पर्व भाग चौर्याऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग पंच्याऐंशीवा

संजय पुढे सांगत होता, ती लढाई झाल्यानंतर द्रोण नवीन व्युह रचना करण्याचे ठरवतात. रागावलेले योद्धे एकमेकांवर ओरडत मारामारी करत असतात. सगळे नव्या लढाईसाठी मनाने सज्ज झालेले होते. आपापली आयुध ते तयार करत होते. त्यातील कांहीं धनंजयाच्या नांवाने ओरडत होते. कांहीं आपल्या तलवारी उंच आकाशात उडवत व पुन्हा ती खाला येतांना बरोबर मुठीने पकडत होते. त्याप्रकारे आपले कौशल्य ते दाखवत होते. युद्धासाठी उताविळ असलेले ते त्यांच्या विविध शस्त्रांचे प्रदर्शन करत होते. गदाधारी त्यांच्या चंदनाने माखलेल्या गदा उंच आकाशात उडवून परत झेलत होते, त्याने त्यांची ताकद ते सिद्ध करत होते. कांहीं त्यांच्या काटेरी गदा आकाशात उडवत व झेलत होते. सगळे विचारत होते अर्जुन कोठे आहे? कोठे भिम आहे? कोठे गोविंद आहे? इतर पांडवांच्यासुद्धा ते चौकशा करत होते. द्रोणसुद्धा मोठ्या तयारीने तो व्युह रचत होते. त्या रचनेनंतर सगळे त्यांच्या दिलेल्या जागा घेतात रणभूमीमध्ये व द्रोण जयद्रथाला बोलतात, "तू, सोमदत्ताचा मुलगा, कर्ण, अश्वत्थामा, सल्य, वृषसेन (कर्णाचा मुलगा), कृप त्यांच्या हजारो रथानिशी व त्याबरोबर हत्ती दल घेऊन व वीस हजार पाईक असें सगळे माझ्या मागून येणार अहात. त्याचा विस्तार बारा मैलाचा असेल. अशा रचनेमुळे इंद्राच्या बापालासुद्धा तुला हात लावता येणार नाही. पांडवांची तर गोष्ट सोडून दे. म्हणून तू निर्धास्त अस. ते ऐकून जयद्रथाला हायसे वाटते. द्रोण गांधार सैनिकांच्या तुकड्या घेऊन पुढे जातात पांडवांना सामोरी. त्यांच्या बाजूने रथी आपले रथ घेऊन येत असतात. जयद्रथाचे घोडे चांगले तयार होते. त्याच्या दिमतीला त्यांचे सिंधी सैन्य होते. तुमचा मुलगा, दुर्मर्शन लढण्यासाठी उतवीळ, स्वताला सगळ्यांच्या पुढे ठेवतो. त्याच्या बरोबर त्याचे हत्तीदल होते कांहीं हजारांचे. तुमचे आणखीन दोन मुलगे, विकर्ण व दुःशासन, त्याच्या जागा घेतात. त्यांचे काम असते जयद्रथाला संरक्षण देणे. त्या रचनेला शकट व अर्धचक्र असे नांव दिले होते कारण ते त्या दोन प्रकारच्या व्युहांच्या संम्मिलनाने केलेले होते. त्याचा सगळा व्याप चाळीस

मैलाचा होता. त्या व्युहामागे आणखीन एक रचना होती त्याचे नांव कमळ असे होते. त्या कमळाच्या व्युहात आणखीन एक रचना होती त्याचे नांव शर असे होते. कारण ते बाणाच्या आकाराचे होते. अशी सगळी व्यवस्था झाल्यानंतर द्रोण स्वताच्या जागी गेले. ते शराच्या मुखावर होते. त्यांच्या बरोबर महारथी कृतवर्मन होता. त्याच्या बाजूला कंबोजचा राजा जरासंध होता. त्यांच्या मागे दुर्योधन व कर्ण होते. त्यांच्या नंतर हजारो हार न मानणार्या क्षत्रियांचा जत्था होता. त्यांच्या मध्ये जयद्रथ सुरक्षित असा होता. शकटाच्या प्रवेशाच्या ठिकाणी अश्वत्थामा होता. द्रोणांच्या मागे भोज राजा होता. त्यांची शरीर यष्टी कमालीची होती. त्याच्या अंगावर शुभ्र कपडे होते. द्रोण त्यांचे धनुष्य खेचून उभे होते. ती व्यवस्था पाहून कौरवांना हायसे वाटत होते. द्रोणांची ती रचना पाहून आकाशातील सिद्ध व चरण नवल करत होते कीं, अशी रचना अर्जुन कसा फोडू शकेल? त्याला भिती वाटत होती कीं, अशी रचना सगळ्या पृथ्वीला भारी जाणारी आहे. दुर्योधन ती व्यवस्था पाहून बेहद्द खूष झाला होता.

जयद्रथ वध पर्व भाग पंच्याऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग सह्यांऐंशीवा

संजय पुढे सांगतो, अशारितीने त्यांची रचना झाल्यानंतर एक मोठा हलकल्लोळ त्या सैनिकांत झाला. कौरवांची रणवाद्ये वाजू लागली. त्यात ढोलकी, मृदुग जोरात वाजवले जात होते. सैनिकांचा आवाज कमी झाल्यावर तो वाद्यांचा सुमधून नाद सगळ्यांना ऐकू येऊ लागला होता. त्यानंतर शंखनाद होऊ लागले. ते सगळे धारातीर्थ योद्ध्यानी गजबजून गेले होते. त्यानंतर रुद्र मुहूर्त झाल्यावर सव्यसाची त्याना दिसू लागला. असंख्य गिधाड व कावळे अर्जुनाच्या रथाच्या पुढे जत्थ्याने उडत जात होते. त्याचा अर्थ मोठ्या संख्येने क्षत्रियांचा संहार होणार आहे असा होतो. लांडगे, कोल्हे भर दिवसा ओरडू लागले होते. जणूकाय ते त्या मारलेल्या क्षत्रियांच्या मांसावर व रक्तावर ताव मारण्यासाठी उतावीळ होते. भर दिवसा अशनीचा पाऊन पडू लागला होता त्या क्षितिजावर. सगळी पृथ्वी हादरून गेली होती. कोरडे उष्ण वारे वाहू लागले व त्याबरोबर दगड गोटे हवेत उडू लागले होते त्या वार्याच्या वावटळीच्या जोरामुळें. जसा धनंजय पुढे होत होता ते जास्तच प्रमाणात होत होते. त्यावेळी नकुलाचा मुलगा सतनिक, धृष्टद्युम्न व पार्थ पांडवांच्या लष्काराची रचना करू लागतात. त्यावेळी तुमचा मुलगा, दुर्मर्शन त्याच्या हजारो सैनिकांसह पुढे आला व बोलला, "जसे भुखंड सागराला अडवतो तसे मी आज धनंजयाला अडवणार आहे. लोकहो आज तुम्ही पहाल तो रागावलेला धनंजय मला कसा अडवतो. अहो माझ्या क्षत्रियाने तुम्ही पहात रहा मी कसा अर्जनाला तोडतो ते. मी एकटा त्याला भारी जाणार आहे आज. मी आज पांडवांच्या सैन्याचा चुराडा करणार आहे. ते पहात रहा. ते केल्याने माझी किर्ती वाढणार आहे जगात. तुमचा मुलगा असे बोलून तेथे अर्जुनाची वाट पहात उभा होता.

तो यमाचा दुसरा अवतारच जणू, किंवा वासवा साक्षात, किंवा महादेव त्याच्या त्रिशूळासह आला असा अर्जुन त्या रणभूमीत येतो. त्याचा राग स्पष्ट दिसत होता. तो निवातकवचांचा सहार करणारा जय म्हणजेच अर्जुन त्याचे शंख वाजवतो. त्या पाठोपाठ कृष्ण त्यांचे पांचजन्य वाजवतो त्यांचा मोठा आवाज सगळ्या रणभूमीत पसरतो.

अर्जुनाच्या अंगावर शुभ्र वस्त्र होते, माथ्यावर दैवी मुकूट होता. हातात गांडीव होते, गळ्यात फुलांच्या माळा होत्या. कानात कर्णफुलं होती, असा तो महारथी त्याच्या उत्तम प्रकारे तयार केलेल्या रथातून पुढे येत होता. अनेक अवतार घेतलेला तो नर (ऋषी) नारायणा बरोबर सगळ्यांच्या पुढे होता. त्या दोन शंखनादाने तुझे सैन्य घाबरून गेल्यासारखे झाले. तुझ्या सैन्याच्या हत्तीनी व घोड्यांनी मुतायला व हगायला सुरूवात केली. ते सगळे बेचैन दिसू लागले. केवळ त्या दोन शंख नादानेच तुझ्या सैन्याची पिवळी झाली होती असे वाटत होते. ते गर्भगळीत झाले असे दिसत होते. कांहींचे भान गेले होते. अर्जुनाच्या ध्वजातील कपी त्याचे तोंड उघडतो व त्यातून विचित्र दिसणारे प्राणी बाहेर पडू लागतात. त्यांचे मनाला भिती लावणारे आवाज ऐकू येऊ लागतात. त्या दृष्याने अनेक योद्धे अवाक् झाले होते. त्याच वेळी रणवाद्ये वाजत होती त्यांचा आवाज होत होता. त्यात सैनिकांचे ओरडणे भर घालत होते. दोनही बाजूचे योद्धे एकमेकांना आव्हानं देत होते. ते आवाज एकाद्या भित्र्याला पळवून लावणारे होते. ते पहात अर्जुन कृष्णाला बोलतो, "जेथे दुर्मर्शन आहे तेथे घोडे वळव. त्याच्या हत्तीदलांचा नाश करूनच मी आत घुसणार आहे.

संजय पुढे सांगतो, सव्यसाची ते बोलल्यानंतर केशव त्याचा रथ त्याप्रमाणे दुर्मर्शनाकडे नेतो. तेथे एक मोठे युद्ध होते. त्या युद्धात अनेक हत्ती, रथ व घोडे मारले जातात. पार्थ त्याच्या गांडीवातून बाणांचा वर्षाव करू लागतो. कौरवांचे सैन्यसुद्धा पार्थ व केशव असलेला रथ घेरतात. ते सुद्धा बाणांचा पाऊस पाडतात. ते पाहून अर्जुनाचा राग अनावर होतो. अर्जुन त्या तुझ्या योद्ध्यांची मुंडकी उडवण्यास सुरूवात करतो. धारातीर्थ असंख्य मुंडक्याने सजवले गेले असे दिसते. त्यांचे फेटे दागिने सर्वत्र विखुरलेले होते. रक्ताचे पाट वाहू लागतात. त्यात माणसाचे, हत्तीचे व घोड्यांचे असे सगळे रक्त मिसळलेले होते. डोकी नसलेली धडं हातात धनुष्य, तलवरी असे उभे दिसत होते जे नंतर अलगदपणे खाली कोसळत होते. लढणार्या राजांना सगळीकडे पार्थ दिसत होता. त्याप्रमाणे ते बाण मारत होते जे त्यांच्याच योद्ध्यांना मारत होते. अनेक शूर वीर त्यांच्या जखमांनी भरलेले आपापल्या आप्तांची आठवण करत तेथे पडलेले होते. त्याची विविध शस्त्र त्याच्या हातात तशीच धरलेली दिसत होती. त्यात तलवारी,

भाले, गदा असे बरेच कांहीं होते. जे कोणी पार्थावर चाल करून गेले ते सगळे मारले गेले. अर्जुनाचे रथातील नृत्य असे होते कीं कोणीही त्याला थेट मारू शकत नव्हते. त्याची चपळाई वाखाणण्या सारखी होती. त्याच्या बाणांने हत्ती, घोडे असे सगळे मारले जात होते. त्याच्या प्रत्येक शत्रूचा त्याने नाश केला होता मग तो लढत होता का पळून जात होता त्याचा कांही संबंध नव्हता. अशारितीने तो दुर्मर्शनाचे हत्तीदल नष्ट करतो. भर दुपारच्या सूर्याकडे पहाणे जसे अशक्य असते तसे धनंजयाच्या रागावलेला चेहरा पहाणे अशक्य होते. अर्जुनाच्या हल्ल्यापुढे तुझे सगळ्या प्रकारचे योद्धे गारद झाले होते. तुझे सैनिक अगतीक झाल्या सारखे झाले होते.

जयद्रथ वध पर्व भाग सह्यांऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग सत्त्याऐंशीवा

धृतराष्ट्र बोलतात, "मुकूट धारी अर्जुनानी माझ्या सैन्याचा अशारितीने नाश केला तेव्हां त्याला माझ्या सैन्यातील कोणी अडवण्याचा प्रयत्न केला ते सांग. कोणी खरोखरच त्याच्याशी लढले कां? कां, ते सगळे धूम पळून गेले त्या सुरक्षित शकट व्युहात, द्रोणांच्या संरक्षणार्थ"?

संजय सांगतो, इंद्राच्या मुलांने त्याचे शस्त्र संधान चालू केले तेव्हां बहुतेक तुझे पळूनच गेले. त्याच्या बाणांच्या मारापुढे ते उभे राहू शकत नव्हते. कोणी त्याच्याकडे पाहू सुद्धा शकत नव्हते. अशा वेळी तुझा मुलगा दुःशासन संतापला व त्यांने तुझ्या सैन्याला पळून न जाण्याचे सांगितले. तो अर्जुनावर चालून जातो. तो हत्तींच्या कळपाने अर्जुनाच्या रथाला वेढा देतो. त्यावेळी त्या हत्तींच्या चित्काराने सगळे आकाश भरून गेले होते. ते रागावलेले हत्ती अर्जुनावर चालून जातात. अर्जुन मोठ्याने गर्जना करतो व त्या अंगावर चालून येणार्या हत्तीना बाण मरण्यास सुरूवात करतो. जसे देवमासा उंच उडणार्या सागराच्या लाटांवर आरुढ होतो तसा धनंजय त्या हत्तीवर स्वार झाल्यासारखा सगळ्यांना दिसतो. तेथे होत असलेले विविध भयंकर आवाज त्या तेथील माणसांचे धैर्य खच्ची करत होते. माणसे व हत्ती दोघांना सव्यसाची घायाळ करत होता. त्याच्या विषारी बाणांनी. त्या हत्तीदलाचे हत्ती सर्वांगाला बाण लागल्यामुळें बेभान झालेले दिसत होते. त्या बाणातील विषामुळें ते हत्ती मरून कोसळत होते व त्याचा मोठा आवाज होत होता. अर्जुनाच्या बाणाने जखमी झालेले हत्ती इतक्या मोठ्याने किंचाळत होते कीं ते ऐकवत नव्हते. त्याबरोबर अर्जुन त्या हत्तीवर बसलेल्या योद्ध्याची डोकी उडवत होता त्याच्या बाणांनी. ते हत्तीच्या मानेवर बसलेले योद्धे खाली पडत व त्याच हत्तीच्या पायाखाली चिरडले जात होते. जसे झाडावरून पिकलेली फळं पडतात तसें ते दिसत होते. पार्थ शत्रूच्या धनुष्यांचे दोर तोडत होता. ते करत असतांना अर्जुन त्याच्या रथात नाचत होता. थोड्याच काळात तेथे त्या रणभूमीवर माणसांची, घोड्यांची व हत्तींची असंख्य डोकी पडलेली दिसत होती. त्या रणभूमीत असंख्य शस्त्रे पडलेली होती ज्याचे धनी

अर्जुनाने ठार मारले होते. अनेक रथ मोडून पडलेले दिसत होते. त्यांचे सारथी मरून पडलेले होते व घोडे कोठेतरी पळून गेलेले होते. रथांवरील ध्वज मातीत पडलेले होते त्यांच्यावर रक्ताचे डाग दिसत होते. दैवी मुकूट धारण केलेला धनंजय त्याचे हत्त्याकांड चालू ठेवतो. तुमचा मुलगा दुःशासनाला अनेक बाण लागले होते व तो कांहीं करण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याची फौज घाबरून द्रोणांच्या संरक्षणाखाली गेलेली होती.

जयद्रथ वध पर्व भाग सत्त्याऐंशीवा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग अठ्ठ्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, दुःशासनाच्या फौजेचा नाश केल्यानंतर धनंजय द्रोणाकडे जाऊ लागतो. द्रोण त्या शकटाच्या मुखावर होते. द्रोणांना तो हात जोडून बोलतो, कृष्णाच्या परवानगीने कीं, "अहो ब्राह्मणा, माझ्यावर कृपा करा, स्वस्ति, आपल्या कृपेने मी आपल्या व्युहात घुसणार आहे, आपण माझे गुरू अहात, मी आपल्याला सत्य काय ते सांगणार आहे, अश्वत्थामा तुमच्या संरक्षणात आहे, तसेंच मीसुद्धा आपल्या संरक्षणात आहे असें मी समजतो, म्हणून अहो ब्राह्मणा, आपल्या कृपेने मी जयद्रथाचा वध करण्यासाठी आलो आहे. आपल्या कृपेने ती माझी प्रतिज्ञा पूर्ण हो अशी मी आपल्याला प्रार्थना करत आहे".

संजय पुढे सांगतो, असें बोलल्यानंतर द्रोण हसतात व बोलतात, "अरे विभत्सू, मला हरवल्याशिवाय तू जयद्रथापर्यंत जाऊ शकत नाहीस". असे बोलून ते हसत हसत अर्जुनावर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्याचे घोडे, ध्वज, त्याचा झेंडा अशा सगळ्यांवर ते बाण मारू लागतात. ते झाल्यामुळें अर्जुनाला द्रोणांवर हल्ला करण्याची जणू परवानगी मिळाली आहे असे समजून तोसुद्धा त्यांच्यावर बाण मारू लागतो. द्रोण अर्जुनाचे बाण त्याच्या बाणांने तोडत असतो व तशात तो अर्जुन व कृष्णावर आगीच्या बाणांचा मारा चालू करतो. अर्जुन द्रोणांचे धनुष्य मोडून टाकतो. द्रोण अर्जुनाच्या धनुष्याचा दोर कापतो. त्याच्या ध्वजावर मारा करू लागतो. पार्थ नवीन तिरकमटा काढतो. त्यांच्यावर सहाशे बाण मारतो. त्यानंतर आणखीन सातशे बाण मारतो व वेळ न दवडता आणखीन एक हजार बाण द्रोणांवर तो मारतो. त्यानंतर आणखीन दहा हजार बाण मारतो. त्या लढाईत असंख्य योद्धे, घोडे, हत्ती मरून पडतात. अनेक रथी त्याच्या रथातून खाली पडतात. जसे युगांती सूर्य संतापतो व सगळे सुकवून टाकतो तसे त्या रणांगणातील बहुतेक तुमचे योद्धे त्याने मारले. सगळीकडे आगीचे डोंब उठले व त्यात बरेच कांहीं जळून जाते. द्रोणसुद्धा तसेंच करत असतात. द्रोण अर्जुनाच्या छातीत बाण मारतात. त्यामुळे अर्जुनाची ताकद कमी होते. तरी हिम्मत न हरवता तो

द्रोणांवर मारा करतो. त्या द्वंद्वात द्रोण अर्जुनापेक्षा वरचढ असल्याचे दिसते. द्रोण कृष्णावर पांच बाण मारतात, त्यानंतर ते त्यांच्या बाणांनी अर्जुनाला अदृष्य करतात त्यांच्या बाणांच्या भडिमाराने. द्रोणाचे बाण एका रेषेत येत होते व ते स्वताभोवती गोल फिरत शरसंधान करत होते. त्यांचे बाण धनंजय व वासुदेवावर सतत पडत होते. ते होत असताना कृष्णाला त्याचे महत्वाचे काम करावयाचे असते. वासुदेव अर्जुनाला बोलतो, "अरे पार्था, आपण आपला समय व्यर्थ घालवत आहोत. आपण द्रोणाला सोडून पुढे आत गेले पाहिजे. द्रोण हा आपला विषय नाही". ते ऐकल्यावर अर्जुन त्या उत्तर देतो, "अहो केशवा, आपण जे सांगाल तसे होईल", ते बोलल्यानंतर द्रोणाला उजवी कडे घेऊन ते पुढे आत घुसतात. द्रोण त्याला बोलतात, अरे विभत्सू तू तुझ्या शत्रूला अशाप्रकारे टाळू शकत नाहीस".

अर्जुन त्यांना उत्तर देतो, "आपण माझे गुरू अहात, माझे शत्रू नाही. मी आपला शिष्य आहे, म्हणून मुलाला जसे बाप वागवतो तसे तुम्ही मला वागवले पाहिजे. आपल्याला हरवणे हा आमचा उद्देश नाही".

संजय पुढे सांगतो, असे सांगून तो महाबली विभत्सू, जयद्रथाचा वध करण्याच्या इर्षेने चटकन कौरवांच्या सैन्यात शिरतो. तो कौरवांच्या आघाडीत घुसत असतांना त्याच्या मागून त्याचे सहाय्यक युद्धमन्यू व उत्तमौजस सुद्धा घुसतात. त्यांना विरोध करण्यासाठी राजा जय, कृतवर्मन, कंबोजचा राजा, श्रुतायूस पुढे होतात. ते धनंजयाचा मार्ग अडवण्याचे कार्य करणार असतात. त्यांच्या मागून त्यांचे हजारो सैनिक जातात. त्यात सुरसेना, अभिशह, सिवी, कैकेया, मद्रक, नारायण, गोपाल आणि विविध इतर टोळ्या त्यांच्या मागे लागतात. त्यांचे नेतृत्व द्रोण करत असतात. ते सगळे अर्जुनाला हरवण्यासाठी जीवाची बाजी लावणारे असतात. त्यानंतर जे युद्ध झाले त्याचे काय वर्णन करावे. ते सगळे एका बाजूला होते व एकटा अर्जुन दुसर्या बाजूला होता. जसे अभिमन्यूच्या वेळी जी परिस्थिती होती तशीच पुन्हा झाली होती. अर्जुनाचे उद्दिष्ट जयद्रथाला गाठणे असे होते, त्याला त्या लोकांना मारण्यात तथ्य वाटत नव्हते पण त्यांना मारल्या शिवाय पुढे जाणे सोपे नव्हते.

जयद्रथ वध पर्व भाग अठ्ठ्यांऐंशीवा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एकोण नव्वदावा

संजय पुढे सांगतो, तुझ्या योद्ध्यानी अर्जुनाला घेरले होते व पाठून द्रोण येत होते. प्रसंग मोठा बाका होता. परंतु, अर्जुन कृष्णाच्या सारथ्याने त्या तुझ्या सैनिकांचा पडशा पाडत पुढे जातच होता. जसे सूर्य त्याचे किरण फाकत असतो तसे अर्जुनाचे बाण चहू दिशाने फेकले जात होते. घोडे बाणाने भोसकले जात होते, रथी त्यामुळे खाली फेकले जात होते. सगळा एकच गोंधळ उडला होता. रथावरील छत्र्या उडाल्या होत्या. एकेकाळी सुंदर दिसणारे ते रथ आता पार मोडून गेले होते. रथाची चाकं उन्मळून पडलेली होती. त्यावर मेलेले योद्धे वेडेवाकडे पडलेले होते. त्या प्रत्येकाच्या अंगात अर्जुनाचे असंख्य तीर खोलवर घुसलेले दिसत होते. रक्त ओकत ओकत मरणाची वाट पहात, ते पडलेले होते. काळ्या झग्यात यमाचे दूत तेथे फारच गुंतलेले दिसत होते. एका जयद्रथासाठी कित्येक क्षत्रिय नाहक मारले जात होते. अखेरीस द्रोण अर्जुनाच्या रथाजवळ पोहोचतात. विभत्सू त्वरीत द्रोणांची दखल घेतो व त्यांच्यावर मारा करू लागतो. एक तीर थेट द्रोणांवर मारतो. वर्मी लागतो तो तीर त्यांच्या पट्ट शिष्याचा. तो नंतर ब्रह्म अस्त्रं काढतो कारण आता गुरू वगैरे विचार करावयाला सवड नव्हती. द्रोण आता गुरू राहिले नव्हते ते शत्रू म्हणून आले होते. व्यवहार चतूर कृष्ण धनंजयाला सांगतो कीं, आता द्रोणाला त्याची जागा दाखव. त्या प्रमाणे त्याने ब्रह्मास्त्र काढलेले होते. तरी अजून अर्जुन त्याच्या इतर प्रकारच्या तीरांनी द्रोणांना गोंधळून टाकले होते. परंतु, ते पुरेसे नव्हते. तरी द्रोण त्यांचे सगळे बाण उलटवत होते. आता द्रोणांनी त्यांचे तुफान शरसंधान सुरू केले. त्याना वासुदेवावरच जास्त बाण मारले असें कीं, तो बेहोष व्हावा. त्यांच्यावर वार करण्याचे अर्जुनाला योग्य वाटत नव्हते त्या त्याच्या नम्रपणाचा द्रोण गैर फायदा घेत होते ते स्पष्टपणे दिसत होते. द्रोणांकडे दुर्लक्ष करून तो भोजांचे सैन्य कापण्यास सुरूवात करतो. कृतवर्मनाच्या फौजा तो कापू लागतो. त्याशिवाय कंबोजच्या सैनिकांचा संहार करत असतो. त्यानंतर कंबोजचा राजा दहा बाण अर्जुला मारतो. अर्जुन सुद्धा त्याला मारतो. त्या विषारी बाणांमुळे तो बेहोष होतो.

भोज राजा अर्जुनाला व कृष्णाला दहा बाण हसत हसत मारतो. त्यानंतर तो कंबोजच्या राजाचे धनुष्य तोडून टाकतो. तेवढ्यात कृतवर्मन अर्जुनाच्या छातीत एक बाण मारतो. अर्जुन त्याला दहा बाण मारतो. कृष्ण समजतो की, अशा रितीने काम वेळीच होणार नाही म्हणून तो वृश्नी अर्जुनाला बोलतो, "त्या कृतवर्मनाला मारून टाक ही धनुर्विद्येची परीक्षा नाही कीं, तू त्याना तुझी कसब दाखवत बसशिल. जयद्रथाला गाठावयाचे आहे. ते ऐकल्यावर अर्जुन कृतवर्मनला ठार बेशुद्ध करतो व ते पुढे जातात. तो आता कौरवांच्या आतील भागात शिरला होता. अर्जुनाचा रथ आत जात आहे ते पाहून राजा श्रुतयुध रागाने त्याच्या अंगावर जातो. तो पार्थाला तीन बाण मारतो जनार्दनाला तीन मारतो त्यानंतर तो त्याच्या ध्वजस्तंभावर बाण मारतो. ते पाहून रागावलेला अर्जुन त्याच्यावर नव्वद बाण मारतो. श्रुतयुध ते सहन करू शकत नाही व तो पार्थावर सत्तर बाण मारतो. त्यानंतर अर्जुन त्याचे धनुष्य मोडून टाकतो. त्यामुळे संतापलला तो राजा दुसरे धनुष्य घेऊन अर्जुनावर नऊ बाण मारतो तो कृष्णालासुद्धा जखमी करतो. ते पाहून अर्जुन श्रुतयुधाचे घोडे मारतो, त्याचा सारथी मारतो. त्याला पुन्हा सत्तर बाण मारतो. श्रुतयुध त्याचा रथ सोडून खाली उतरतो व गदा युद्ध करण्याच्या तयारीने अर्जुनाच्या कडे जाऊ लागतो. श्रुतयुध वरुणाचा मुलगा होता. त्याची आई पर्नसा नदी होती. ती वरुणाकडे वर मांगते कीं, तिचा पुत्र पृथ्वीवर अजिंक्य राहिला पाहिजे. तो वर वरुण तिला देतो. तो तिला बोलतो, "मी त्याला वर देत आहे, तो म्हणतो कीं, त्याच्याकडे असलेल्या दैवी आयुधामुळे तो पृथ्वीवर अजिंक्य होईल. परंतु, कोणीही मानव अमर असणार नाही, त्या प्रमाणे तोसुद्धा मारला जाईल. तरी युद्धात तो कधी हार मानणार नाही. परंतु जर ते दैवी आयुध त्याच्याकडे नसेल तर मात्र तो मारला जाईल असें वरुण तिला सांगतो. असें सांगून वरुण त्याला एक मंत्र शिकवतो व गदा देतो. त्या गदेमुळे तो आजवर अजिंक्य ठरला होता. तरी कांहीं नियम तो त्याला सांगतो. त्या गदेने युद्ध न करणार्यावर वार करणार नाही. जर तसे केले तर ती गदा परत फिरेल व श्रुतयुधाला ठार मारेल. ते युद्ध करतांना श्रुतयुध तो नियम विसरतो व चुकून कृष्णावर गदेने वार करतो, त्याबरोबर ती गदा उलटून श्रुतयुधाला ठार मारते. ते घडतांना जे पहातात ते मोठ्याने ओरडून आकांत करतात. त्याच्या आयुधानेच त्याला

मारलेले आहे ते पाहून सगळे नवल करतात. तो पर्नसेचा मुलगा त्याच्या मर्त्य देहातून बाहेर येतो ते पाहून तेथे असलेले कौरवांचे सैनिक घाबरून रणभूमी सोडून पळून जाऊ लागतात.

त्यानंतर कंबोजचा राजपुत्र सुदक्षिणा अर्जुनावर चाल करतो. पार्थ त्याच्यावर सात बाण मारतो. त्या बाणामुळें सुदक्षिणा जखमी होतो परंतु, धीर ठेवून तो अर्जुनाला दहा बाण मारतो. पुन्हा पांच बाण मारतो. अर्जुन त्याचा ध्वज खाली पाडतो तेव्हा सुदक्षिणा अर्जुनावर दोन मोठे बाण मारतो व जोरांने आव्हानात्मक ओरडतो. चिडलेला सुदक्षिणा एक लोखंडी शर पार्थावर फेकतो. त्यामुळे अर्जुनाचा भोवळ येते परंतु तो त्यातून चटकन बरा होतो. पार्थ त्या सुदक्षिणाच्या रथाचे तुकडे करतो. त्यानंतर पार्थ त्याला असंख्य बाणांने भोसकून टाकतो. त्याचे सगळे फाटून गेलेले होते. त्याचा मुकूट डोक्यावरून पडलेला होता. खाली मान घालून मातीत तोंड खुपसले आहे असा मरून पडतो. तो देखणा मातीत घुसलेला असा तो यमाची वाट पहात पडलेला होता.

जयद्रथ वध पर्व भाग एकोणनव्वदावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग नव्वदावा

संजय पुढे सांगत असतो. सुदक्षिणा व श्रुतायुधांचा मृत्यू झालेला पाहून तुमचे योद्धे भडकून उठतात व पार्थावर जोराने चालून जातात. अभिशह व सुत्रसेना, सिवी आणि वसती त्यामध्ये असतात. ते धनंजयावर बाणांचा मारा सुरू करतात. शेकडो बाण ते त्याच्यावर फेकतात. पार्थ त्यांना योग्य उत्तर देतो. पार्थाच्या प्रतिहल्ल्याने मात्र ते घाबरतात व तेथून पळून जातात. तरी पुन्हा ते धीर करून अर्जुनावर जातात. परंतु, गांडीवातून निघणारे बाण त्यांची मुंडकी उडवत असतात. त्या मेलेल्या सैनिकांना खाण्यासाठी आकाशात इतकी गिधाडं जमा होतात कीं, आकाश त्यामुळे काळोखते. श्रुतायू व अच्युतायू ते पाहून संतापतात. मोठ्या जोमांने ते धनंजयावर चाल करतात. ते दोघे उच्च कुलीन व धनंजयाचा पराभव करण्याच्या इर्षेने प्रेरीत असे ते दोघे तुझ्या मुलाचे दोस्त त्याच्यावर जोरांने हल्ला करतात. त्यांचे बाण अर्जुनावर कोसळत असतात. ते चिडलेले क्षत्रिय अर्जुनावर बाणांचा असा वर्षाव करत असतात कीं त्यात तो दिसेनासा होतो. अर्जुन असे बाण फेकतो की त्यामुळे त्यातील एक बेहोष होतो. परंतु, श्रुतायूच्या बाणामुळे कृष्णाला भोवळ येते. अच्युतायू जोराने एक मोठा लांब पल्ल्याचा बाण पार्थाला मारतो. त्याच्या बाणातील द्रव्यामुळे अर्जुनाला फार झोंबते. त्यामुळे कांही काळ तो ध्यजस्तंभ धरून उभा रहातो. ते पाहून तुझ्या लोकांना वाटते कीं अर्जुन खलास झाला. तुमची माणसे मोठ्या उत्साहाने जिंकल्याच्या घोषणा करू लागतात. एकच गलबला होतो. कृष्णाला सुद्धा चिंता खाते कीं असे कसे झाले कीं अर्जुन थकला. तो धनंजयाला बोलतो कांहीं चांगले असें कीं त्यामुळे अर्जुनाची हिम्मत वाढेल. त्यानंतर श्रुतायूस व अच्युतायू मोठ्या उत्साहाने त्यांचा बाणांचा भडिमार वाढवतात. असा कीं, ते दोघे त्या बाणांच्या धुक्यामुळे दिसेनासे होतात. ते दृष्य विलक्षण होते, युद्धाने खरोखरच जोर धरलेला होता. कोणी मागे हटायला तयार नव्हते. विभत्सू सावकाशपणे भानावर येतो. असे ते दिसते कीं जणूकाय तो यमाच्या घरी जाऊन परत मागे आला आहे. अर्जुनाला दिसते की जर वेळीच कांहीं केले नाही तर परिस्थिती हाता बाहेर

जाईल, तेव्हां तो इंद्राचे अस्त्र शक्र काढतो. त्या अस्त्रातून असंख्य असें शर बाहेर येतात कीं, ते दोघे राजे घायाळ होतात. त्यानंतर केलेल्या मारामुळे श्रृतायूस व अच्युतायू ह्यांची डोकी उडवली जातात ते मरतात. ते इतके अचानकपणे घडते कीं तुमच्या लोकांची मति कुंठीत होते . त्या धक्क्यातून ते बाहेर येऊ शकत नाहीत. त्यानंतर धनंजय त्या दोघा राजांच्या फौजांचा फडशा पाडतो. ते झाल्यावर पुन्हा तो जयद्रथाचा शोधू लागतो. त्यात अनेक योद्धे त्याला ठार मारावे लागतात. आपले पिता व काका अशारितीने मारले गेले हे पाहिल्यावर त्याचा सूड उगवण्यासाठी त्यांची मुलं न्यतायूस व दीर्घायूस पुढे होतात. अरे भारता, ते दोघे खूप रागावलेले दिसत होते. ते कुंतीच्या मुलाचा वध करण्यासाठी पुढे होतात . अर्जुन रागाच्या भरात त्यांच्याशी खेळत न बसता त्यांना मारून टाकतो कारण, कृष्णाने त्याला ताकीद दिली होती कीं, त्यांच्याकडे आज खेळण्यासाठी फुरसत नाही. जयद्रथाचा वध झाल्यानंतर हवे तर काय खेळावयाचे ते खेळ. त्यांच्या मृत्यूमुळे धृतराष्ट्राचे योद्धे गांगरून जातात. जसे हत्ती पाण्याला जोराजोराने हलवतो जेव्हां तो तलावात शिरतो त्या प्रमाणे अर्जुन ते रणांगण घुसळून काढतो. हत्तीच्या घुसळण्याने जशी कमळ तुटून जातात तसे अर्जुनाच्या घुसळण्याने अनेक सैनिक मरून पडतात. दुर्योधनाच्या आदेशानंतर कांहीं पूर्वेकडील कांही उत्तरेकडील, कांही पश्चिमे कडील असे राजे पार्थावर चाल करतात व त्याच्या रथाला वेढा देतात. त्यांचे सैन्य प्रामुख्याने हत्तीदलांचे होते, त्या डोंगरासारख्या प्रचंड हत्तीना पार्थ त्याच्या धारदार बाणाने आरपार जखमी करतो, त्यामुळे ते हत्ती माऊताचे न ऐकता सैरावैरा धावू लागतात एकच गोंधळ उडतो. रणांगण त्या योद्ध्यांच्या तुडलेल्या मुंडक्याने खचाखच भरले जाते. त्याशिवाय अवाढव्य आकाराचे हत्ती मरून पडल्यामुळें रणांगणात मोठ्याच अडचणी झालेल्या असतात. त्यांतून रथ चालवणे केवळ अशक्य झाले होते. हत्तीचे उष्णरक्त लांडगे व तरसासारखे प्राणी मोठ्या संख्येने तेथे येऊन पिऊ लागतात. त्या प्राण्याना माणसांच्या युद्धाशी कांहीं देणे घेणे नव्हते. त्यात अनेक म्लेच्छ सैनिक हत्तीच्या मानेवर बसून लढत होते त्यांची मुंडकी उडून दूर कोठेतरी जाऊन पडत होती. जमिनीवर पडलेल्या प्रत्येक प्राण्याच्या अंगात अर्जुनाने मारलेले बाण दिसत होते. मरणार्या हत्तींचे चित्कार व माणसांच्या किंकाळ्या ह्याने आसमंत

दणाणून गेला होता. हत्तींच्या पायाखाली तुमचेच जास्त सैनिक मारले जात होते कारण त्या रणांगणांत पांडवांचे सैनिक नव्हते. मारले जाणारे सगळे यवन, शक, पारदी आणि वल्हीकं होते. वसिष्ठ कुळातील म्लेच्छ फार भयंकर मुद्रा असलेले जणू साक्षात यमाचे दूत असवेत असें तुमच्या फौजात होते ते अर्जुनाने मारून टाकले होते. त्या शिवाय अनेक दर्वाभिसरस, दरदी व पौंड्री हजारांच्या संख्येने त्यात होते ते मारले गेले होते. त्यांच्या कडे त्यांची विचित्र दिसणारी आयुध होती. युद्ध कौशल्य असलेले ते योद्धे धनुर्धारीला घेरतात. त्याच्यावर ते त्यांचे वेगळ्या प्रकारचे बाण नळ्यांतून सोडूं लागतात. धनंजयाने तो मारा उलटवला व त्याचे बाण त्या म्लेच्छाना लागू लागतात. अर्जुनाच्या बाणांचे एका प्रकारे छत तयार झाले होते. त्यातील कांही डोक्याचा गोटा केलेले होते तर कांहींच्या डोक्यावर कपाळाकडील अर्ध्या भागात गोटा व उरलेला मागचा भाग केस असे होते तर कांहींच्या डोक्यावर जटा होत्या. त्यांच्या जीवनात नितीमत्ता वगैरे कांहीं नियम नव्हते. पापमय जीवन ते जगणारे होते, ती त्यांची जीवन पद्धती होती. चेहर्याने ते विद्रूप होते. ते डोंगरवासी लवकरच तेथून पळून गेले. अर्जुनाच्या संहार करण्याच्या क्षमतेमुळें तेथे रक्ताची नदी वाहू लागली होती. त्यात हत्ती, माणसे व घोडे अशांचे रक्त एकदम वहात होते. त्या वहाणार्या रक्ताच्या नदीत मेलेल्या माणसांची शवं तरंगत होती. ती रक्ताची नदी युगांताची आठवण करून देत होती. मध्ये पडलेले अजस्त्र हत्ती त्या नदीला अडवत होते. क्षत्रियांच्या रक्ताने पृथ्वी चिंब भिजलेली होती. कांहीं सखल भागात रक्त साठल्यामुळे रक्ताचे तलाव झाले होते. अर्जुनाचे ते संहार सत्र सतत चालू होते. अर्जुनरुपी वणवा कृष्णाच्या वार्यामुळे तुझे सैन्य जाळून टाकत होता. अर्जुन त्याच्या रथात तिरंदाजी करता करता नाचत होता ती त्याची पद्धत होती. त्यावेळी श्रृतायूस अमवश्थचा राजा धनंजयाला आव्हान देतो. अर्जुनाला फुरसत नसल्या प्रमाणे चटकन त्याचे घोडे तो मारतो व त्याचे धनुष्य मोडून टाकतो. ते झाल्याने तो अमवश्थाचा राजा गदा घेऊन खाली उतरतो. तो कृष्णालासुद्धा आव्हान देतो. तो अर्जुलाचा रथ थांबवतो. त्याच्या गदेच्या फटक्याने कृष्णाला इजा होते ते पाहून अर्जुन संतापतो, तो त्याच्या बाणांने श्रृतायूसला घेरतो. त्यामुळे तो कांहीं करू शकत नाही. त्यानंतर तो त्याची गदा भिरकावून देतो. ते झाल्यावर तो अमवश्थाचा राजा दुसरी

आणखीन मोठी गदा घेतो. त्या गदेने तो दोघाना मारू लागतो. तो ऐकत नाही हे समजल्यावर अर्जुन त्याचा तो हात तोडतो ज्या हाताने त्यानी गदा धरली होती. त्यामुळे श्रृतायूस मरतो. ते झाल्यामुळें अर्जुनावरील हल्ले वाढतात व त्यात ते दोघे अदृष्य होतात.

जयद्रथ वध पर्व भाग नव्वदावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग एक्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, सिंधच्या राजाचा वध करण्याच्या तीव्र इच्छेने प्रेरीत झालेला कुंतीपुत्र द्रोणांने रचलेल्या व्युहाच्या आत पोहोचतो. त्या आधी त्याने कंबोजच्या सुदक्षिणाला ठार मारलेले असते. त्यानंतर त्याने श्रुतायूध व श्रृतायूस ह्यांना मारलेले असते. त्यामुळें तुझ्या सैनिकांत अनिश्चिततेचे वातावरण झालेले असते. तुझे सगळे एका द्रोणांवर भिस्त ठेवून असतात. दुर्योधन द्रोणांच्या जवळ जातो व बोलतो, "तो येत आहे माझ्या भावोजीला मारण्यासाठी. त्याने आधीच आपले मोठे सैन्य बरखास्त केले आहे. तुम्ही आता ठरवले पाहिजे कसे त्याचा मृत्यू होईल त्याबद्दल. आपल्या कृपेनेच ते शक्य होणार आहे. नाहीतर जयद्रथ रहाणार नाही. अजून दिवस बाकी आहे. कांहींतरी लवकर करायला पाहिजे. माझे ते योद्धे आता साशंक आहेत कीं, ते जयद्रथाला अर्जुनापासून वाचवू शकतील कां? असें सगळे समजतात कीं, आपल्याला अर्जुन हरवू शकणार नाही परंतु, आता ते सिद्ध करण्याची वेळ आली आहे आपल्यावर. आपल्या व्युहाला त्यांने खिंडार पाडले आहे व त्यातून त्याच्या मागून पांडव सेनासुद्धा आपल्या आतल्या भागात घूसत आहेत हे कसे झाले? मला दिसते कीं, माझे सैन्य कमजोर ठरत आहे. मला समजते कीं आपल्या मनात पांडवांबद्दल प्रेम आहे त्यामुळे आपण असें वागत अहात हे खरे आहे कां? अहो ब्राह्मणा, तुमच्यासाठी मी काय करावे म्हणजे तुम्ही कौरवांबद्दल जास्त प्रेम कराल ते सांगा. अहो गुरूवर्य आम्ही तुम्हाला फार मानतो परंतु तुमचा कल सदैव पंडुपुत्रांकडेच असतो. अशाने कसे होणार? आमच्या भल्याचा आपण केव्हां विचार करणार? आपण मला आश्वासन दिले म्हणून मी जयद्रथाला त्याच्या देशाला जाण्यापासून परावृत्त केले आणि आता आपण असें वागता ह्याचा मी काय अर्थ समजू. आपल्यावर मी भरवसा केला हा माझा मूर्खपणा झाला कां"? मृत्यूपासून एकवेळ सुटका होऊ शकते परंतु अर्जुना पासून जयद्रथाची सुटका होणे अशक्य आहे असें मला आता वाटू लागले आहे. माझे हे बोलणे ऐकून आपण माझ्यावर रागवू नये पण मी जे बोलतो ते

माझ्या बहिणीवरील प्रेमामुळे ते लक्षात घ्या. आपण सिंधच्या राजाला संरक्षण देण्याचे वचन दिले आहे त्याची आठवण ठेवा".

द्रोण त्याला बोलतात, "तुझ्या बोलण्यात मला कांही गैर दिसत नाही. तसे बोलणे तुझ्यासारख्या कडून अपेक्षित होते. तू मला माझ्या अश्वत्थाम्या इतकाच प्रिय आहेस. एक लक्षात ठेव ज्याचा सारथी कृष्ण आहे त्याच्याशी आपल्याला मुकाबला करावा लागत आहे. ते तू लक्षात घेत नाहीस. त्यांचे घोडे सुद्धा खास आहेत. कितीही लहान जागा असली तरी त्यातून त्याचा रथ जाऊ शकतो ते आपल्याला शक्य नसते. त्याच्या ध्वजावर कपी बसलेला आहे म्हणजे आपल्याला केवळ धनंजयाशी मुकाबला करावयाचा नाही तर त्याच्याबरोबर असलेले ते दोन म्हणजे कृष्ण व कपी (मारुती) ह्यांनासुद्धा अडवावयाचे आहे, ते मला जमेल कां? एक लक्षात घे दुर्योधना, अर्जुन कधीच एकटा नसतो. त्याच्या रथाचा वेग असा आहे कीं, त्याने फेकलेले बाण त्याच्या मागे पडत आहेत. हे तू लक्षात घेतलेस कां? माझ्या ह्या वृद्धावस्थेत तसे करणे मला शक्य नाही हेसुद्धा समजून घे. मला तू सांगितल्या प्रमाणे युधिष्ठीराला कैद करावयाचे आहे, आता मला सांग, कोणते काम मी प्रथम करावे? त्याबद्दल मी सगळ्या क्षत्रियांपुढे शब्द दिला आहे म्हणून माझ्या मते युधिष्ठीराला पकडणे हे माझ्यासाठी जयद्रथापेक्षा जास्त महत्वाचे ठरते. तो त्याच्या फौजेच्या पुढे आहे त्यामुळे त्याला धरणे मला जास्त महत्वाचे वाटते. तू कां नाही जात तुझ्या शत्रूला मारण्यासाठी? तू धनंजयाला कां नाही अडवत जयद्रथापासून? तुझे व त्याचे युद्ध विद्येचे ज्ञान सारखेच आहे. जा आणि तुझ्या जयद्रथाला संरक्षण दे. मी युधिष्ठीराच्या मागे जातो. तू राजा आहेस तुला कांहीं करणे आहे कीं नाही? तू जा जेथे पार्थ आहे व त्याला अडवून दाखव".

दुर्योधन ते आव्हानाचे बोल ऐकून बोलतो, "अहो गुरूवर्य, मी धनंजयाला कसा अडवू शकेन? धनंजय तुमच्यापेक्षाही पुढे गेला आहे दैवी विद्येत. अर्जुनाने इंद्रालासुद्धा हरवले आहे त्याच्याशी मी कसा मुकाबला करणार? त्याने हृदिकाच्या मुलाला कृतवर्मनला पराजित केले आहे, आपल्यालासुद्धा त्याला हरवणे सोपे नाही अशा परिस्थितीत मी कसा त्याच्यापुढे टिकणार? त्याने श्रुतायूसला मारले आहे, सुदक्षिणाला मारले आहे, अच्युतायुसाला मारले आहे. असंख्य म्लेच्छ वीर त्याच्या कडून मारले जात आहेत हे

माहीत असतांना मी कसा त्याला आव्हान देणार? तो साक्षात अग्नी आहे ते आपण जाणताच. मी त्याच्या बरोबर आज लढू शकेन असे कसे आपण समजता? मी आपल्यावर एकाद्या सेवका सारखा विसंबून आहे हे जाणताच. कृपा करा, पण मला वाचवा. तो कुरु वंशी अजिंक्य झाला आहे". द्रोण त्यावर म्हणतात, "मी असे कांही करतो कीं, तू धनंजयाला कृष्णाच्या समक्ष अडवू शकशिल. हे पहा सोन्याचे चिलखत आहे. ते तू घाल त्यातून कोणताही बाण जाऊ शकत नाही, त्यामुळे आपण कोणाही पुढे लढू शकाल बिनधास्तपणे. अगदी राक्षस, असुर, उरग, यक्ष कोणीही आपल्याला मारू शकणार नाही. अर्जुनाचे बाण सुद्धा त्यातून जाणार नाहीत. ते मी आपल्याला बांधतो. ते घालून आपण त्वरितपणे अर्जुनावर चाल करा. तो आपल्याला मारू शकणार नाही".

संजय पुढे सांगतो, ते द्रोणांचे ऐकल्यावर आज्ञाधारका प्रमाणे दुर्योधन ते चिलखत मंत्रोच्चार करून अंगात घालतो. आता तुमचा मुलगा अर्जुनापुढे लढण्यासाठी सज्ज होतो. ते पाहून तेथे असलेले सगळे नवल करत असतात. द्रोण पुढे बोलतात, "वेद, ब्राह्म व ब्राह्मण तुला आशिर्वाद देवोत. सगळे सर्प तुला संरक्षण देवोत, ययाति, नहुष धुमधुमर भगिरथ, सगळे राजर्षी तुला संरक्षम देवोत, एकपाद व बहूपाद असे सगळे प्राणी तुला संरक्षण देवोत, तसेंच निष्पाद प्राण्यांचेसुद्धा तुला संरक्षण मिळो. स्वाहा, स्वाधा, साची, सगळे तुला दुवा देवोत, लक्ष्मी, अरुंधती तुझे भलो करोत. ऋषी असित, देवल, वसिष्ठ, काश्यप तुझे कल्याण करोत. सगळ्या दिशा, धात्री, कार्तिकेय तुझे सरक्षण करोत. दैवी विवस्वात तुझे भले करो, चार दिशांचे चार दिग्गज तुझे संरक्षण करोत. ज्याने पृथ्वीला आधार दिला आहे तो शेष तुला वाचवो, अरे गांधारी सुता, जो आधी असुर वृत्र होता, आज देवांविरुद्धच्या युद्धात त्याचा पराक्रम दाखवत आहे, ज्याने पूर्वी अनेक देवांना पराभूत केले होते, त्यांची संख्या अगणित होती, ते त्यांची शरीरं चिंधभिंध झालेली असे तू आधी मारले होतेस ते अखेरीस ब्रह्माच्या आश्रयाला गेले होते. तरी देव विवस्वात तुला संरक्षण देओ. जे देव तू आधीच्या जन्मात मारले होते ते आता तुला मदत करतील असें होवो. ब्रह्म सांगतो, "देव आणि इंद्र ह्यांनी मला संरक्षण दिले पाहिजे. जो त्वश्त्री, ज्याच्यातून वृत्र उत्पन्न

झाला, तो आज अदृष्य आहे. त्याने ह्या युगाच्या आधीच्या युगात एकलक्ष वर्षे तपस्या केली होती. म्हणून त्याला महादेवांनी परवानगी दिली होती, तो तुझा शत्रू देवांच्या मदतीने तुला हरवत आला आहे. शंकराच्या निवासस्थानी गेल्याशिवाय तू हर पाहू शकणार नाहीस. ते ऐकल्यावर देव मंदार पर्वतावर जातात शंकराचे दर्शन घेण्यासाठी. तेथे तो पिनाक धारी, विश्वनिर्माता, दक्षाचा नाश करणारा, असुर भागानेत्रचा वध करणारा तेथे जातात. त्यांच्या बरोबर ब्रह्मसुद्धा जातात. त्या देवांना पाहून महादेव बोलतात, "तुमचे स्वागत असो", त्यानंतर येण्याचे कारण विचारतात. ते सांगतात देवांना कीं माझे दर्शन कधीच व्यर्थ जात नाही. देव त्यावर त्या महादेवाला सांगतात, "अहो हर आमची शक्ती वृत्राने नष्ट केली आहे. आपल्या शक्तीने आपण आम्हाला पुनर्जीवित करावे. ते ऐकल्यावर महादेव सर्व नावांच्या देवाला बोलावतो. ते त्याला सांगतात, "अरे सर्वा, तुला माहीत आहे त्या त्वश्त्रीतून उत्पन्न झालेल्या वृत्राचा नाश कसा करावयाचा. मी माझे कर्तव्य करत आहे. अरे शक्र, हे तेजस्वी चिलखत माझ्या अंगावरुन काढून घे, ते तू नेस व मग वृत्राकडे जा. त्यानंतर मंत्र उच्चारून तो ते चिलखत नेसतो. पुढे द्रोण सांगतात, "असे सांगून शिव ते महाचिलखत इंद्राला देतात. ते चिलखत घालून इंद्र वृत्राकडे लढण्यासाठी जातो. वृत्राने फेकलेली कोणतीही अस्त्र इंद्राला बाधत नाहीत. त्यानंतर इंद्र वृत्राचा वध करण्यात यशस्वी होतो. त्यानंतर ते चिलखत तो देव अंगिरस ऋषींना भेट करतो. तो ते त्याचा मुलगा बृहस्पती त्याला देतो. बृहस्पती ते अंग्नीवेषास देतो. त्यांनी ते मला दिले आहे जेव्हां त्यांनी त्यांची सगळी शस्त्रविद्या मला बहाल केली. त्याच्या बरोबर त्याचे मंत्र आहेत ते तुला जपावे लागतील, तरच ते काम करते हे लक्षात घे. त्यामुळें अर्जुनाचे दिव्य अस्त्रं सुद्धा तुझ्यावर कांहीं करू शकणार नाहीत".

संजय पुढे सांगतो, त्यानंतर दुर्योधन ते चिलखत अंगावर घालतो. त्यावर द्रोण ब्रह्म धागा त्याला बांधतात. फार पूर्वीच्या काळी, ब्रह्माने स्वतः ते इंद्रासाठी केले होते त्याची आठवण आकाशातील प्रेक्षकांना होते. ते झाल्यावर दुर्योधन युद्धासाठी निघतो. त्याच्या सानिध्यात शेकडो हत्ती, घोडेस्वार व पाईक होते. त्याचे तेज पहाण्यासारखे होते. त्याचे जाणे शुभ व्हावे म्हणून कौरवाचे वाजंत्री रणवाद्ये जोरा जोराने वाजवू लागतात. ते

सगळे अर्जुनाच्या रथामागे लागतात. जसा विरोचनाचा मुलगा त्याच्या वैर्यामागे लागला होता. त्याच्या सैनिकांचे ओरडण्याने एकच गोंधळ उडाला होता. नव्या उत्साहाने ते अर्जुनाचा पाठलाग करू लागतात.

जयद्रथ वध पर्व भाग एक्यांण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग ब्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन मोठ्या उत्साहाने धनंजाया मागे लागतो ज्याच्या बरोबर वृश्नी होता. अर्जुन व कृष्ण त्यावेळी कौरवांच्या सैन्याच्या मध्ये पोहोचले होते. त्यावेळी पांडव सोमकांच्या बरोबर द्रोणावर चाल करतात त्यांना थांबवण्यासाठी. द्रोण मोठ्याने ओरडत पांडवांचा हल्ला अडवण्याचा प्रयत्न करतात. ते पांडव कौरवांच्या व्युहाच्या तोंडावर द्रोणाच्या फौजाना भिडतात. त्याचे युद्ध होते अगदी अटीतटीचे ते होते. त्यावेळी मध्यान्ह असते. असे युद्ध आधी कधी पाहिले नाही असें देव व ऋषी आकाशातून बोलतात. ते नवल करत असतात. पांडव धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वात कौरवांचे मोठे सैन्य मारून टाकतात. तुमचे सैन्य द्रोणाच्या नेतृत्वात पांडवांचा मुकाबला करत असतात. दोनही बाजू तुल्यबळ वाटत होत्या. पाशवी शक्तीने ते दोघे एकमेकांना भिडले होते. त्यांची शस्त्रं विविध प्रकारची होती. कांहीं आपले सैनिक त्यांचे बाण धनुष्याऐवजी नळीतून फेकत होते. त्यावेळी मोठा आवाज होत असे. तशा आवाजामुळें रणभूमी दणाणून गेली होती. कानठळ्या बसत होत्या. कोण काय बोलते ते समजत नव्हते. कौरवांचे योद्धे द्रोणांच्या आदेशानुसार पांडवांच्या फौजांवर बाणांचा वर्षाव करत होते. पांडव पेटते बाण तुमच्या सैनिकावर मारत होते. त्यामुळे आपल्या सैन्याची मोठी हानि होत होती. पांडवांचा हल्ला द्रोणांनी यशस्वीपणे उलटवला होता. तरी त्यांचा जोर कमी होत नव्हता. पांडवांचे पांचाल व कैकेया योद्धे मागे हटावयाला तयार नव्हते. तरी आपले अनेक राजे पांडवांना मागे ढकलण्याचा सतत प्रयत्न करत होते. त्यात त्याना यश म्हणावे तसे येत नव्हते. द्रोण प्रिशताच्या मुलावर जोराचा बाणांचा मारा करू लागतात त्यावेळी तोसुद्धा त्यांच्या वर मारा करू लागतो. दोघे तुल्यबळ होते. त्यांच्याकडे तलवारी, भाले, दांडपट्टे असे सगळे होते त्याशिवाय धनुष्य बाण होते. धनुष्याचा टणत्कार व नळीबाणांचा स्फोटासारखा आवाज व त्यातून येणार्या ठिणग्या ह्याने रणभूमी गजबजलेली होती. धृष्टद्युम्नाचे बाण पावसासारखे तुमच्या सैन्यावर कोसळत होते. आपल्या अनेक योद्ध्याना कंठस्नान घालत व आपले असंख्य घोडे मारून तो

कौरवांची हिम्मत खच्ची करत होता. मात्र द्रोण त्याचे बाण उलटवण्यात बर्याच वेळा यशस्वी होत होते. पांडवाच्या फौजा तीन विभागात गेल्या होत्या, एक कृतवर्मनाच्यावर जात होत्या, दुसरी जलासंधाकडे व तिसरी द्रोणावर असे झाले होते. पांडवांना त्या तिघांना रोकून धनंजयाचा रस्ता मोकळा करावयाचा होता. द्रोण त्यांचे सैन्य एकत्र आणण्याचा प्रयत्न करत व धृष्टद्युम्न त्यांना पुन्हा पुन्हा विभक्त करत होता त्याच्या बाणांच्या भडिमाराने. धृतराष्ट्राचे योद्धे पांडवांचे वीर ठार मारत होते. धृष्टद्युम्नाच्या मारामुळें भेदरलेले सैनिक श्रींजयाचे व पांचालांचे योद्धे मारून टाकत होते. भ्रष्ट राजाचे राज्य दुष्काळाने, रोगराईने व दरोडेखोरानी नष्ट केले जाते तसे तुमचे सैन्य नष्ट होत होते. त्या युद्धात मातीची वावटळं अशी उठत होती कीं, ती माती डोळ्यात गेल्याने डोळे चुरचुरत होते. सैनिक कांहीं पाहू शकत नव्हते. द्रोणाला समजले कीं, त्याची सेना विभक्त होत आहे ते चिडले व त्यांना पांचाल सेनेवर बाणांचा जोरात मारा करण्यास सुरूवात केली. त्यांचे रुप एकाद्या भडकलेल्या अग्नीसारखे झाले होते. त्यांना जे दिसेल त्याला ते त्यांच्या बाणांनी भोसकत होते. पांडवांचे पाईक त्या हल्ल्यात मोठ्या संख्येने मारले गेले होते. डोक्यावर तापलेला सूर्य व पुढे द्रोणांचा बाणांचा वर्षाव ह्यामध्ये ते सैनिक काय करावे काय नको अशा विचारात घुटमळत होते. त्यातच ते द्रोणांच्या धारदार तीरांनी मारले जात होते. त्यामुळे पांडवांचे सैन्य तेथून दूर जाण्याच्या तयारीत होते. त्याच वेळी तुमचे सैन्यसुद्धा धृष्टद्युम्न त्याच प्रमाणे संपवत होता. सगळे सैनिक जीवाच्या भितीने रणभूमी सोडून जात होते. कोणालाही विनाकारण मरावयाचे नव्हते. तुमचे विविंगसती, विकर्ण व चित्रसेन ह्यांना भिमाने घेरलेले होते. त्यातून त्यांना सोडवण्यासाठी विंद, अनुविंद अवंतीचे आणि क्षेमधूर्ती व वल्हिक त्यांना भिमसेनाच्या पकडीतून काढण्याच्या प्रयत्नात दिसत होते. वल्हिकाची सेना द्रौपदीच्या पांच मुलांच्या बरोबर लढत होती. सैव्य गोवसनांचा राजा त्याना मदत करत होता. काशीसचा राजा सल्याबरोबर लढत होता. त्यांनी युधिष्ठीराला घेरलेले होते. दुःशासन त्याच्या पलटणीने सत्यकीला अडवत होता. शकूनी त्याचा गांधार सैनिकांसह त्यांच्या आयुधानिशी पांडवांच्या सैनिकाना अडवत होते, ज्यांचे नेतृत्व नकूल व सहदेवांकडे होते. अवंतीचे युवराज राजा विराटाला सामोरी गेले होते. राजा वल्हीक शिखंडीला

भिडला होता. कौरवांच्या सेनेतील सौवीर, प्रभाद्रक धृष्टद्युम्नाला भिडले होते. कौरवांचा राक्षस सेनानी अलमवुष पांडवांच्या घटोत्कचाच्या मागे लागला होता. त्यांची राक्षसी लढाई पहाण्यासारखी होती. अशाप्रकारे विविध द्वंद्वे पहावयास मिळत होती. जयद्रथ मात्र सर्वात शेवटच्या पलटणीत सुरक्षित ठेवलेला होता. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी कृपांवर होती त्याशिवाय अश्वत्थामा सुद्धा होता. त्याच्या डावीकडे कर्ण होता व उजवीकडे त्याचे सिंधू देशाचे लष्कर होते. त्यांचे नेतृत्व सोमदत्ताच्या मुलाकडे होते. त्यांची नांवे क्रुप, वृषसेना, साल आणि सल्य अशी होती. जयद्रथाची अशा रितीने व्यवस्था करून तुमचे सैन्य पांडवांशी लढत होते.

जयद्रथ वध पर्व भाग ब्यांण्णवावा संपला.

# जयद्रथ वध पर्व

## भाग त्र्यांण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, अहो राजन, ऐकत रहा पांडव कौरवाच्या युद्धाची कथा. जशी मी पाहिली तशी सांगत आहे. द्रोण जे त्यांच्या व्युहाच्या मुखावर होते तो पर्यंत पार्थाचे सैन्य पोहोचले. द्रोणसुद्धा त्यांच्या परीने त्यांचे संरक्षण करत होते. अवंतीचे विंद व अनुविंद मोठ्या उत्साहाने राजा विराटावर चाल करतात. ती लढाई फारच भीषण होती. रक्ताचे पाट वाहू लागले होते त्यामुळें रणांगणात. यज्ञसेनाचा मुलगा वल्हिकावर चाल करतो. ते दोघे एकमेकांच्या सैनिकांचे रक्त पाण्यासारखे सांडतात. त्या युद्धात असंख्य शरांचा वापर होतो. त्यांचा खच जमिनीवर पडलेला दिसतो. त्यांच्या बाणांनी सबंध आकाश भरलेले होते. ते खूप उंच जात व तेथून वेगांने खाली येत होते. त्यांच्या माराने हत्ती, माणसे, घोडे सगळे मरत होते. त्यात सैव, गोवसनासनाचा राजा प्रमुख होता. ते युद्ध काशीसच्या योद्ध्यांशी झाले. असे दोन हत्ती झुंजावे तसे ते झुंजत होते. वल्हिक द्रौपदीच्या पांच मुलांशी लढत होते. तुमचा मुलगा दुःशासन सत्यकीशी लढत होता. त्याच्या बाणाने सत्यकीला भोवळ आली. परंतु, ते फार काळ नव्हते. तो लवकरच शुद्धीवर येतो व प्रतिहल्ला करतो. ते द्वंद्व पहाण्यासारखे होते. रक्ताने ते दोघे चिंब भिजलेले होते. कुंत्नीभोजाच्या बाणामुळे जखमी झालेला अलमवुष राक्षस त्याच्या रक्ताने पूर्णपणे भिजलेला होता. तोसुद्धा कुंत्नीभोजाला अनेक बाण मारत असतो. ते असे होते जसे इंद्र व असुर जंभा ह्यांचे द्वंद्व असावे. माद्रीची दोन मुलं शकूनीच्या गांधार सैनिकांचा फडशा पाडत असतात. ते एक भयंकर दृष्य होते. कोणाला कोणाची दया माया नव्हती. फक्त ते मारत होते. तुझ्या मुलांनी सुरू केलेला पांडवांचा क्रोध, ज्याला कर्णाने व शकूनीने खतपाणी घातले तो फारच वाढलेला दिसत होता. त्या क्रोधाने सगळी पृथ्वी भस्मसात होणार कीं काय असें वाटत होते. नकूल व सहदेवांच्या मारापुढे ते टिकू शकले नाहीत व अखेरीस ते द्रोणाच्या संरक्षणाखाली जातात. घटोत्कच त्याच्या मायावी व वेगांने धावणार्या घोड्यावरून राक्षस अलमवुषकडे चाल करतो. त्या दोघांतील द्वंद्व पूर्वी होऊन गेलेल्या राम व रावण युद्धाची आठवण

करून देत होते. राजा युधिष्ठीर सल्याला जखमी करतो. त्यानंतर सल्य व युधिष्ठीर ह्यांच्यातील द्वंद्व मोठे पहाण्या सारखे होते. अहो भारता, त्या द्वंद्वाची तुलना प्राचीन काळी होऊन गेलेल्या संवर व असुरांच्या लढाईशी करत होते आकाशातील प्रेक्षक. दुसरीकडे तुमचे विविंसती, चित्रसेन आणि विकर्ण भिमसेनाला भिडले होते.

जयद्रथ वध पर्व भाग त्र्यांण्णवावा संपला.

## जयद्रथ वध पर्व

## भाग चौर्याणवावा

संजय पुढे सांगतो, त्या युद्धात कौरवांचे सैन्य तीव भागात विभागलेले होते त्यावर पांडवांच्या फौजा तुटून पडतात. भिमसेन महाप्रतापी जलासंधावर जातो आणि युधिष्ठीर कृतवर्मनावर जातो त्याची सगळी पलटण घेऊन. धृष्टद्युम्न द्रोणांवर लक्ष केंद्रीत करतो. दोनही बाजूचे धनुर्धारी एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत असतात. त्यामुळें आकाशात बाणांचे धुके तयार झालेले होते. त्यातून कांहीं दिसू शकत नव्हते. द्रोण पांचालांवर चाल करून जातो. ते त्यांच्या सैनिकांची मुंडकी उडवत असतात. त्या धारातीर्थी असंख्य नरमुंड सगळीकडे पडलेली दिसत होती. त्याशिवाय असंख्य मौल्यवान दागिने तेथे पलेले दिसत होते. रथांचे तुटलेले भाग, ध्वजांचे फाटलेले तुकडे रक्ताने माखलेले सगळीकडे विखरून पडलेले दिसत होते. त्याशिवाय तलवारीचे द्वंद्व सुद्धा ठिकठिकाणी पहावयाला मिळत होती. माणसांची डोकी नसलेली धड ठिकठिकाणी पडलेली होती. कांहींच्या हातात तलवारी, ढाली, भाले अशी आयुध धरलेली दिसत होती. आकाशांत गिधाडं घिरट्या घालू लागली होती. त्याशिवाय जमिनीवर कोल्हे, रानटी कुत्री, तरसं, लांडगे मेलेल्यांची चिरफाड करण्यात गुंतलेली दिसत होती. परंतु, त्या सैनिकांच्या अंगावरील चिलखतांमुळें ते त्याना सहजपणे करता येत नव्हते. ते होत असतांना त्या कडे पूर्णपणे दुर्लक्ष करत योद्धे त्यांचे नरसंहाराचे काम करत होते. जिंकण्यासाठी लढण्याचा त्यांचा निर्धार विलक्षण होता. फरशा, तलवारी, ढाली, भाले अशी विविध आयुध तेथे विखरून पडलेली होती. कांहीं क्षत्रिय नुसत्या हाताने मारामारी करत होते. कांहीं शत्रूचा गळा आवळून त्याला मारण्याचा प्रयत्न करत होते. रथी रथीला मारत होते, पाईक पाईकाला मारत होते, हत्तीदलाचे हत्तीदलावर वार करत होते. ओरडणे किंचाळणे सगळीकडे सतत ऐकू येत होते. असे युद्ध होत असतांना धृष्टद्युम्न त्याचे घोडे द्रोणांच्या घोड्यात घालतो व त्यांचा रथ अडकवून टाकतो. त्याचे घोडे शुभ्र रंगाचे होते. द्रोणांचे लाल रंगाचे होते. तसे अडकलेले ते दोन रथ पहाण्यास सुंदर होते. आता ते दोघे एकमेकांच्या इतके नजिक आले कीं बाण मारणे

शक्य नव्हते. धृष्टद्युम्न धनुष्य टाकतो व तलवार व ढाल घेतो. तो द्रोणांच्या रथाचा दांडा पकडून त्यांच्या रथात शिरतो. त्याच्या हालचाली इतक्या चपळाईने होत होत्या कीं त्याच्यावर वार करणे द्रोणांना शक्य नव्हते. पहाणार्यासाठी ते प्रेक्षणिय होते. जसे वनात घार सावजाला खेळवते तसे तो करत आहे असें वाटत होते. द्रोणांचा वध करण्यासाठी तो त्यांना भिडणार होता. तितके जवळ असूनही द्रोण त्याची तलवार व ढाल त्याच्या हातातून उडवतात. आणखीन कांहीं बाण मारून ते त्याच्या शुभ्र घोड्याला जखमी करतात. त्यानंतर त्वरेने त्याचा ध्वज उडवतात. आता द्रोण धृष्टद्युम्नाला जवळून बाण मारणार तेवढ्यात सत्यकी द्रोणांचे धनुष्य तोडतो. अशारितीने तो वृश्नी योद्धा यज्ञसेनाच्या मुलाला थोडक्यात वाचवतो. जसे वाघाच्या तावडीतून हरणाची सुटका व्हावी. त्यामुळें चिडलेले द्रोण सत्यकीवर कांहीं बाण मारतात. परंतु, त्यामुळे त्याचे कांहीं बिघडत नाही. तो द्रोणांवर सहा जोरदार बाण मारतो व त्याना जखमी करतो. ते पाहून पांचाल त्वरीत धृष्टद्युम्नाला युद्धातून बाहेर काढतात. त्याचवेळी द्रोणांना हरवल्याचे ते ओरडून सांगू लागतात.

जयद्रथ वध पर्व भाग चौर्याण्णवावा संपला.

**- द्रोणपर्व भाग दुसरा संपला -**

## भाषांतरकाराचा  परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

**ई साहित्य प्रतिष्ठान -**

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप

ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून  देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद